
# शिक्षक क्षमतावृद्‌धी प्रशिक्षण २.०


## घटकसंच



राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

# शिक्षक क्षमतावृद्धी प्रशिक्षण २.०

## घटकसंच



राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

# मनोगत

राष्ट्रीय शिक्षण धोरण-२०२० च्या अनुषंगाने राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे या संस्थेमार्फत शैक्षणिक गुणवत्ता वृद्धिंगत करण्यासाठी संपूर्ण राज्यात वैविध्यपूर्ण उपक्रमांची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

रविंद्रनाथ टागोर म्हणाले होते, एक प्रज्वलित दिवाच दुसऱ्या दिव्याला प्रकाशमान करू शकतो. त्यानुसार जागतिक स्तरावर विविध क्षेत्रांमध्ये होणाऱ्या आमूलाग्र बदलांचा विचार करता नवनवीन आव्हानांना सामोरे जाण्यासाठी विद्यार्थ्यांना तयार करायचे असेल, तर अगोदर शिक्षक सक्षमीकरण करणे गरजेचे आहे.

राष्ट्रीय शिक्षण धोरण-२०२० मध्ये उल्लेखित केल्याप्रमाणे शिक्षक हा शिक्षणव्यवस्थेमधील मूलभूत बदलाच्या केंद्रस्थानी असल्याने पायाभूत स्तरापासून माध्यमिक स्तरापर्यंत प्रत्येक शिक्षकाचे तसेच पर्यवेक्षकीय यंत्रणेचेही सक्षमीकरण होणे अत्यंत महत्त्वाचे आहे. धोरणातील तरतुदींनुसार शिक्षकांचा सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास होण्याच्या दृष्टीने सर्व स्तरांवरील शिक्षक क्षमतावृद्धी प्रशिक्षण २.० निश्चितच उपयुक्त ठरेल असा मला विश्वास वाटतो.

सदर प्रशिक्षणामध्ये एकात्मिक दृष्टिकोनाच्या माध्यमातून विविध विषयांचा समावेश करण्यात आला आहे. त्यामध्ये प्रामुख्याने राष्ट्रीय शिक्षण धोरण-२०२० : राज्य अभ्यासक्रम आराखडा - शालेय शिक्षण (SCF-SE), राज्य अभ्यासक्रम आराखडा - पायाभूत स्तर (SCF-FS), समग्र प्रगतिपत्रक (HPC), क्षमता आधारित मूल्यांकन, क्षमता आधारित अध्ययन-अध्यापन प्रक्रिया, क्षमता आधारित मूल्यांकनाची कार्यनीती, प्रश्ननिर्मितीचे प्रकार, क्षमता आधारित प्रश्ननिर्मिती कौशल्ये, उच्चस्तरीय विचारप्रवर्तक प्रश्न, शाळा गुणवत्ता मूल्यांकन आणि आश्वासन आराखडा : २०२४-२५ (SQAAF) इत्यादी विषयांच्या अनुषंगाने मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

सदर प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर शिक्षक निश्चितच प्रत्यक्ष वर्गांमध्ये प्राप्त नवीन ज्ञानाचा आणि कौशल्यांचा उपयोग करतील, ज्यायोगे विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता उंचावण्यास मदत होईल अशी मला खात्री वाटते.

या प्रशिक्षणाच्या यशस्वी पूर्ततेसाठी आपणास शुभेच्छा!

**राहूल रेखावार (भा.प्र.से.)**
**संचालक,**
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,
महाराष्ट्र, पुणे.

# प्रास्ताविक

आपल्या राज्यात राष्ट्रीय शिक्षण धोरण–२०२० ची अंमलबजावणी सुरू आहे. त्या अनुषंगाने सन २०२३–२४ या शैक्षणिक वर्षात शिक्षकांच्या क्षमतावृद्धीसाठी निवडक विषयांवर आधारित प्रशिक्षणाचे आयोजन राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे मार्फत करण्यात आले होते. यावर्षी उर्वरित विषयांचे शिक्षक क्षमतावृद्धी प्रशिक्षण २.० चे आयोजन करण्यात येत आहे. त्यामधून सर्व स्तरावरील शिक्षकांची क्षमता बांधणी करून शैक्षणिक गुणवत्ता वृद्धिंगत करण्याचा मुख्य उद्देश आहे, तसेच शैक्षणिक गुणवत्तावृद्धीसाठी पर्यवेक्षीय यंत्रणेचेही सक्षमीकरण करणे महत्त्वाचे आहे.

या धोरणामध्ये राष्ट्रीय शिक्षण शिक्षक सक्षमीकरणावर विशेष भर देण्यात आलेला आहे. प्रत्येक मूल शिकले पाहिजे, त्याचा सर्वांगीण विकास झाला पाहिजे असे ध्येय जेव्हा आपण ठरवतो, तेव्हा त्यासाठी शिक्षकांनी नवनवीन विचारप्रवाह, विषयज्ञान, अध्यापनशास्त्र, विविध धोरणे इ. विषयी अद्ययावत असणे आवश्यक आहे. तसेच राष्ट्रीय शिक्षण धोरण–२०२० मधील तरतुदींनुसार परिच्छेद क्र. ५.१५ आणि ५.१६ मध्ये नमूद केल्यानुसार प्रत्येक शिक्षकाचा सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास (CPD) होण्याच्या दृष्टीने शैक्षणिक वर्षामध्ये किमान ५० तासांचे प्रशिक्षण होणे अपेक्षित आहे.

जागतिक स्तरावर विविध क्षेत्रांमध्ये होणाऱ्या आमूलाग्र बदलांचा विचार करता नवनवीन आव्हानांना सामोरे जाण्यासाठी विद्यार्थी आणि शिक्षक यांना सक्षम करणे आवश्यक आहे. त्यासाठी त्यांना अध्ययन–अध्यापन व मूल्यमापन यांचा परस्परसंबंध आणि त्यानुसार मुलांचे अध्ययन कसे होते, तसेच वर्गातील आंतरक्रिया याचे अद्ययावत ज्ञान असणे आवश्यक आहे. ज्ञान आणि कौशल्ये शिक्षकांना आत्मसात व्हावीत आणि त्यांनी विद्यार्थ्यांना एकविसाव्या शतकातील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी तयार केले जावे. यासाठी शासकीय आणि खाजगी अनुदानित शाळेतील प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक स्तरावरील म्हणजेच इयत्ता पहिली ते बारावीच्या शिक्षकांना 'शिक्षक क्षमतावृद्धी प्रशिक्षण २.०' प्रशिक्षण देण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे. पर्यवेक्षकीय यंत्रणेचाही यात समावेश करण्यात आला आहे.

शासकीय आणि खाजगी अनुदानित शाळेतील प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक स्तरावरील शिक्षकांचे प्रशिक्षण हे विषयनिहाय नसून एकात्मिक स्वरूपाचे आहे. त्यामध्ये राष्ट्रीय शिक्षण धोरण–२०२०, राज्य अभ्यासक्रम आराखडा– पायाभूत स्तर (SCF-FS), राज्य अभ्यासक्रम आराखडा : शालेय शिक्षण (SCF-SE) २०२४, समग्र प्रगतिपत्रक (HPC), क्षमता आधारित मूल्यांकन, क्षमता आधारित अध्ययन–अध्यापन प्रक्रिया, क्षमता आधारित मूल्यांकनाची कार्यनीती, प्रश्ननिर्मितीचे प्रकार, क्षमता आधारित प्रश्ननिर्मिती कौशल्ये, उच्चस्तरीय विचारप्रवर्तक प्रश्न, शाळा गुणवत्ता मूल्यांकन आणि आश्वासन आराखडा : २०२४–२५ (SQAAF) इत्यादी विविध घटकांचा समावेश करण्यात आलेला आहे.

शासकीय आणि खाजगी अनुदानित शाळेतील प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक स्तरावरील शिक्षकांच्या प्रशिक्षणाचे नियोजन राज्य स्तर, जिल्हा स्तर आणि तालुका स्तर असे करण्यात आलेले आहे. या प्रशिक्षणाच्या

माध्यमातून शासकीय आणि खाजगी अनुदानित शाळेतील इयत्ता पहिली ते बारावीच्या सर्व शिक्षकांचे सक्षमीकरण करणे हा उद्देश असून त्या दृष्टीने या प्रशिक्षणाच्या मार्गदर्शिकेची निर्मिती करण्यात आलेली आहे.

**प्रशिक्षणाची उद्दिष्टे :**

१) राज्यातील पायाभूत, पूर्वतयारी, पूर्वमाध्यमिक, माध्यमिक स्तरावरील शिक्षकांचा सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास करणे.

२) राष्ट्रीय शिक्षण धोरण–२०२० व राज्य अभ्यासक्रम आराखडा २०२३ नुसार अपेक्षित क्षमता, कौशल्ये, ज्ञान विकसित होण्यासाठी शिक्षकांना सक्षम बनविणे.

३) बदलत्या परिस्थितीनुसार क्षमता वृद्धी व स्वयंविकसन यांबाबतच्या विविध संधी उपलब्ध करून देणे.

४) राज्य अभ्यासक्रम आराखडा– पायाभूत स्तर २०२३, राज्य अभ्यासक्रम आराखडा–शालेय शिक्षण २०२४ याची माहिती करून देणे.

५) सर्व स्तरांवरील शिक्षकांना विविध नावीन्यपूर्ण अध्यापन पद्धतीचे तंत्रे, आधुनिक तंत्रज्ञान यांचा अध्ययन–अध्यापनात प्रत्यक्ष वापर करण्याकरिता सक्षम करणे.

६) बदलत्या मूल्यमापनाचे विविध दृष्टिकोन, पैलू व मूल्यमापनाची साधने यांची माहिती करून देणे.

७) SQAAF आराखड्याची ओळख करून देणे, त्यातून शाळांच्या मूल्यांकनाचे निकष समजावून घेणे. शाळा मूल्यांकनाच्या माध्यमातून शाळांची गुणवत्ता वाढविण्यासाठी शाळा विकास आराखडा तयार करण्याविषयी माहिती देणे.

**फलनिष्पत्ती :**

**या प्रशिक्षणानंतर प्रशिक्षणार्थी शिक्षक...**

१) राष्ट्रीय शिक्षण धोरण–२०२० ची वैशिष्ट्ये समजून घेतील.

२) राज्य अभ्यासक्रम आराखडा : शालेय शिक्षण (SCF-SE) समजून घेतील.

३) राज्य अभ्यासक्रम आराखडा : पायाभूत स्तर (SCF-FS) समजून घेतील.

४) विद्यार्थ्यांचे क्षमता आधारित मूल्यांकन व शाळा स्तर मूल्यांकन करतील.

५) विद्यार्थी मूल्यांकनामध्ये समग्र प्रगतिपत्रकाचा वापर करतील.

६) अनुभवजन्य व खेळ आधारित पद्धतींचा अध्यापनामध्ये वापर करतील.

७) एकविसाव्या शतकातील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी विद्यार्थ्यांना सक्षम बनवतील.

८) शाळांचे स्वयं–मूल्यांकन व बाह्य–मूल्यांकनासाठी SQAAF आराखड्याचा वापर करतील.

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | प्रकरण | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १) | राष्ट्रीय शिक्षण धोरण - २०२० | १ |
| २) | राज्य अभ्यासक्रम आराखडा - पायाभूत स्तर २०२३ | १३ |
| ३) | राज्य अभ्यासक्रम आराखडा - शालेय शिक्षण २०२४ | २३ |
| ४) | शाळा गुणवत्ता मूल्यांकन आणि आश्वासन आराखडा (SQAAF) - प्रस्तावना व संरचना | २९ |
| ५) | शाळा गुणवत्ता मूल्यांकन आणि आश्वासन आराखडा (SQAAF) - क्षेत्र क्र. १ ते ६ | ३१ |
| ६) | शाळा गुणवत्ता मूल्यांकन आणि आश्वासन आराखडा (SQAAF) - परिशिष्टे १ ते ८ | ३५ |
| ७) | क्षमता आधारित अध्ययन व अध्यापन प्रक्रिया | ३८ |
| ८) | क्षमता आधारित मूल्यांकन - संकल्पना | ४० |
| ९) | क्षमता आधारित मूल्यांकन कार्यनीती | ४३ |
| १०) | क्षमता आधारित प्रश्नप्रकार | ४६ |
| ११) | क्षमता आधारित प्रश्ननिर्मिती कौशल्ये | ५९ |
| १२) | विचारप्रवर्तक प्रश्न (TPQ) | ६५ |
| १३) | अध्ययन निष्पत्तीनुसार प्रश्ननिर्मिती | ७२ |
| १४) | समग्र प्रगतिपत्रक (HPC) - संकल्पना व पार्श्वभूमी | ७४ |
| १५) | समग्र प्रगतिपत्रक (HPC) - स्तरनिहाय स्वरूप | ७८ |
| १६) | समग्र प्रगतिपत्रक (HPC) - प्रात्यक्षिक | ८४ |
| १७) | समग्र प्रगतिपत्रक (HPC) - प्रात्यक्षिक | ८६ |
| १८) | गटनिहाय सादरीकरण | ८८ |

# १. राष्ट्रीय शिक्षण धोरण – २०२०

**प्रस्तावना :**

राष्ट्रासमोर असणाऱ्या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी मनुष्यबळ हे सर्वांत महत्त्वपूर्ण संसाधन आहे. याचाच अर्थ जर राष्ट्रातील नागरिक सक्षम असतील, तर ते राष्ट्र आव्हानांचे रूपांतर संधीमध्ये करू शकतात. त्यामुळे राष्ट्रातील नागरिकांना सक्षम बनविणे अत्यंत महत्त्वाचे आहे. यासाठीचे एकमेव साधन म्हणजे, शिक्षण होय. याच उद्देशाने प्रत्येक राष्ट्र आपले स्वतंत्र असे 'राष्ट्रीय शिक्षण धोरण' ठरवत असते.

भारतात सर्वांत पहिले राष्ट्रीय शिक्षण धोरण १९६८ साली, तर दुसरे राष्ट्रीय शिक्षण धोरण १९८६ साली राबविण्यात आले. याच धोरणात १९९२ साली काही सुधारणा करण्यात आल्या आणि त्या आजतागायत अमलात आणल्या जात आहेत. मागील ३४ वर्षांपासून राष्ट्राच्या शिक्षण धोरणामध्ये आमूलाग्र असा बदल झालेला दिसून येत नाही. याउलट देशाच्या व नागरिकांच्या सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक गरजा मात्र वेगाने बदलत आहेत. त्यातूनच राष्ट्रासमोर अनेक आव्हाने आणि संधी निर्माण होत आहेत. भविष्यातील या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी आणि येणाऱ्या संधींचा उपयोग करून घेण्यासाठी राष्ट्रातील नागरिकांना कुशल बनवणे अत्यंत गरजेचे आहे. या बाबी लक्षात घेऊन राष्ट्रीय शिक्षण धोरण–२०२० ची मांडणी करण्यात आली आहे.

या धोरणाचे एक ठळक वैशिष्ट्य म्हणजे, विविधता व स्थानिक परिस्थितीचा आदर. हा आदर अभ्यासक्रम, अध्यापन व धोरणामध्ये दिसून येतो. भारतासारख्या देशात जेथे भाषिक, सांस्कृतिक व भौगोलिक विविधता आहे. हे लक्षात घेऊनच या गोष्टीला महत्त्व दिलेले आहे.

शिक्षण हे समाज परिवर्तनाचे साधन आहे म्हणूनच, शिक्षण केवळ समाजातील विशिष्ट घटकांपुरते राहून चालणार नाही, तर समाजातील सर्व घटकांना याचा लाभ मिळाला पाहिजे समाजातील सर्व घटकांना शिक्षणव्यवस्थेत समावून घेतले पाहिजे हे ठळकपणे या धोरणात नमूद केले आहे.

शिक्षणव्यवस्था ही सामाजिक व्यवस्था आहे म्हणूनच, शिक्षणप्रक्रियेमध्ये सामाजिक सहभाग वाढला पाहिजे असे येथे आग्रहाने नमूद केले आहे. समाजाचा सहभाग जितका वाढेल, तितकी समाजाला ही व्यवस्था आपली वाटू लागेल व परिणामी शिक्षणाचा दर्जा उंचावण्यास याची मदत होईल.

हल्लीच्या युगात तंत्रज्ञानाचा जो वापर होत आहे याची दखल घेऊन शिक्षणाची धोरणे, अध्ययन–अध्यापन मूल्यमापन यांमध्ये तंत्रज्ञानाचा वापर केला जावा असे अपेक्षिलेले आहे. इतकेच नव्हे, तर दिव्यांगांना अध्ययनात येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी देखील याचा वापर व्हावा अशी अपेक्षा व्यक्त केलेली आहे.

सध्याच्या माहिती–तंत्रज्ञान युगामध्ये माहिती मिळण्याचे विविध व अनेक स्रोत उपलब्ध झालेले आहेत. त्यामुळे अभ्यासक्रमातील माहितीचे ओझे कमी करून, अध्यापनामध्ये संकल्पनांच्या आकलनावर भर दिला पाहिजे असे नमूद केले आहे. वर्गातील विद्यार्थ्यांच्या विविध क्षमतांचा शोध घेऊन त्यांच्या विकासासाठीचे उपक्रम आयोजित केले पाहिजेत.

राष्ट्रीय शिक्षण धोरणामध्ये सर्वांत अधिक भर चिकित्सक व सर्जनशील विचारशक्ती विकसित करण्यावर दिला आहे. विद्यार्थ्यांच्या या क्षमतांच्या विकासाला प्रोत्साहन देणे अपेक्षित आहे. इतकेच नव्हे, तर धोरणाची अंमलबजावणी करताना वेळोवेळी आढावा घेणे अपेक्षित आहे.

## अध्ययन निष्पत्ती

१) राष्ट्रीय शिक्षण धोरण–२०२० ची ध्येये स्पष्ट करतील.
२) राष्ट्रीय शिक्षण धोरण–२०२० ची वैशिष्ट्ये सांगतील.
३) प्रारंभिक बाल्यावस्थेतील शिक्षणाचे स्वरूप सांगतील.
४) राष्ट्रीय शिक्षण धोरण–२०२० नुसार तयार झालेल्या अभ्यासक्रम आराखड्याचे स्वरूप व जुनी रचना यातील फरक सांगतील.
५) नावीन्यपूर्ण अध्यापनशास्त्र समजावून घेऊन अध्यापन प्रकियेत परिवर्तन करतील.
६) भारताबद्दलचे ज्ञान व भारतीय ज्ञान परंपरेची वैशिष्ट्ये सांगतील.
७) राष्ट्रीय शिक्षण धोरण–२०२० नुसार मूल्यांकन पद्धतीत झालेल्या बदलाची दखल घेतील.
८) शिक्षक शिक्षण व शिक्षक सक्षमीकरणासाठी योजना सांगतील.

| उपघटक | आशय | सुलभक–प्रशिक्षणार्थी आंतरक्रिया | चिंतनात्मक प्रश्न |
|---|---|---|---|
| १) राष्ट्रीय शिक्षण धोरण – २०२० ध्येये. (१० मि.) | १) गुणवत्तापूर्ण शिक्षणाद्वारे समन्यायी व उत्साही समाजासाठी शिक्षणप्रणालींचे विकसन करणे.<br>२) देशाची एकात्मता जोडून ठेवणारा,<br>• बदलत्या जगातील आपली भूमिका व जबाबदारी यांची जाणीव असणारे नागरिक घडविणे. | • सुलभक 'समन्यायी' संकल्पना चर्चेद्वारे स्पष्ट करतात, तसेच PPT च्या माध्यमातून उत्साही व स्थितिप्रिय समाज यांबाबत चर्चा घडवून आणतात.<br>• देशाच्या एकात्मतेच्या आवश्यकतेचे महत्त्व प्रशिक्षणार्थ्यांना विचारतात. संविधानातील मूल्ये विचारून घेतात व त्याप्रति आदरभाव का बाळगला पाहिजे याविषयी चर्चा करतात. | १) शिक्षणामध्ये 'समन्यायी' संकल्पना कशी राबवता येईल?<br>२) उत्साही समाज व स्थितिप्रिय समाज यांपैकी आपण उत्साही समाज का पसंत कराल? |

| उपघटक | आशय | सुलभक–प्रशिक्षणार्थी आंतरक्रिया | चिंतनात्मक प्रश्न |
|---|---|---|---|
| | • संविधानात्मक मूलभूत अधिकाराची जाणीव असणारा, तसेच कर्तव्य व संविधानातील मूल्यांबद्दल आदर निर्माण करणे.<br>३) मानवी हक्क, चिरंतन विकास आणि राहणीमान विश्वकल्याण यासाठीच्या वृत्तींचा विकास करणे.<br>• जागरूक, जागतिक नागरिक होण्यासाठी साहाय्यभूत कौशल्य विकसित करणे. | • चिरंतन विकासाप्रति निष्ठा, तसेच चिरंतन विकास व विश्वकल्याण यातील संबंध स्पष्ट करतात.<br>• जागतिक नागरिक होण्यासाठीची आवश्यकता स्पष्ट करतात, तसेच त्यासाठी कोणकोणती कौशल्ये विकसित करावीत यासंबंधी चर्चा करतात. | ३) चिरंतन विकास या संकल्पनेचा आपल्या दैनंदिन जीवनाशी संबंध कसा जोडाल?<br>४) 'जागतिक नागरिक' ही संकल्पना काय आहे?<br>५) जागतिक नागरिक होण्यासाठी विद्यार्थ्यांमध्ये कोणती कौशल्ये विकसित केली पाहिजेत? |
| २) राष्ट्रीय शिक्षण धोरण – २०२० मुख्य वैशिष्ट्ये. (१० मि.) | १) विविधता व स्थानिक संदर्भांना महत्त्वाचे स्थान<br>२) समता व समावेशकता<br>३) सामाजिक सहभाग<br>४) तंत्रज्ञानाचा वापर<br>५) संकल्पनात्मक आकलनावर भर<br>६) व्यक्तिभिन्नतेनुसार विविध क्षमता<br>७) चिकित्सक विचार व सर्जनशीलता<br>८) सातत्यपूर्ण आढावा | • सुलभक प्रशिक्षणार्थींना स्थानिक संदर्भ विचारतात.<br>• समता व समावेशकता या दोन संकल्पनांमधील संबंधाबाबत चर्चा करतात.<br>• तंत्रज्ञानाचा वापर अध्ययन, अध्यापन नियोजनामध्ये कसा करता येईल यासंबंधी चर्चा करतात.<br>• व्यक्तिभिन्नतेनुसार विविध क्षमता कशा ओळखाव्यात व त्यांचा विकसन कसे करता येईल यासंबंधी मार्गदर्शन करतात.<br>• सर्जनशीलतेला कोठे व कसा | १) स्थानिक संदर्भांना तुम्ही अध्ययनात कसे स्थान द्याल?<br>२) 'सामाजिक सहभाग' घेण्यासाठी तुम्ही कसा प्रयत्न कराल?<br>३) 'संकल्पना व माहिती' यामध्ये नेमका फरक काय?<br>४) विद्यार्थ्यांमध्ये चिकित्सक वृत्ती/सर्जनशीलता विकसित व्हावी |

| उपघटक | आशय | सुलभक-प्रशिक्षणार्थी आंतरक्रिया | चिंतनात्मक प्रश्न |
|---|---|---|---|
| | | वाव देता येईल यासंबंधी विवेचन करतात. | यासाठी तुम्ही काय कराल? |
| ३) अभ्यासक्रम व अध्यापन-शास्त्रीय रचनेत बदल (५ मि.) | १) पायाभूत स्तर<br>२) पूर्वतयारी स्तर<br>३) मध्य स्तर (पूर्वमाध्यमिक)<br>४) माध्यमिक स्तर | • सुलभक पायाभूत स्तर दोन गटात कसा विभागला गेला आहे हे PPT च्या साहाय्याने स्पष्ट करतात व या स्तराला अध्यापन कसे करावे याबाबत प्रशिक्षणार्थ्यांची मते घेतात. पूर्वतयारी स्तरावर (८ ते ११ वर्षे) पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान हे अक्षरज्ञान खेळ, शोध आणि कृती आधारित पद्धतीने कसे देणे अपेक्षित आहे याबाबतीत सुलभक मार्गदर्शन करतात.<br>• या स्तरावर तीन भाषा शिकाव्या लागणार आहेत यासंबंधी प्रशिणार्थींसोबत सुलभक चर्चा करतात. सुलभक पूर्वमाध्यमिक स्तरावरील विषयरचना समजावून देतात व येथे अनुभवजन्य अध्ययनाचा वापर कसा अपेक्षित आहे हे स्पष्ट करतात याच स्तरावरील व्यवसाय शिक्षणाच्या सुरुवातीबाबत प्रशिक्षणार्थींची मते अजमावतात.<br>• माध्यमिक स्तरावरील झालेल्या बदलांबाबत चर्चा करतात. | १) लहान वयात मुले भाषा लवकर शिकतात याबाबतची आपली मते व्यक्त करा.<br>२) प्रत्येक बालकाला किमान तीन भाषांचा अभ्यास करावा लागणार आहे. याबद्दल आपले मत व्यक्त करा.<br>३) कार्यानुभव व व्यवसाय शिक्षणात नेमका कोणता फरक केला आहे असे आपणास वाटते?<br>४) माध्यमिक स्तरावर विद्यार्थ्यांना जास्तीत जास्त विषय निवडीचे स्वातंत्र्य कसे देता येईल?<br>५) अभ्यासक्रम रचनेतील 'पायाभूत स्तर' दोन गटात विभागला गेला आहे त्याबद्दल तुम्हांला काय वाटते? |

| उपघटक | आशय | सुलभक–प्रशिक्षणार्थी आंतरक्रिया | चिंतनात्मक प्रश्न |
|---|---|---|---|
| | | | ६) इयत्ता पहिलीपासून विद्यार्थ्यांना ३ भाषांच्या अभ्यासाचे ओझे होईल असे वाटते काय?<br>७) अकरावी, बारावी स्तरावर शाखा भेद न ठेवल्यामुळे कोणत्या समस्या येतील असे आपणास वाटते? |
| ४) प्रारंभिक बाल्या–वस्थेतील संगोपन व शिक्षण (ECCE) (५ मि.) | १) सार्वत्रिक प्रवेश<br>२) पायाभूत शिक्षण अभ्यासक्रम<br>३) बहुपैलूत्व<br>४) पूर्वाध्ययन वर्ग | • वय वर्षे ३ ते ६ वयोगटातील मुलांसाठी अंगणवाडी, बालवाडी, बालवाटिका इ. ठिकाणी मोफत, सुरक्षित व दर्जेदार शिक्षणासाठी प्रवेशाची सोय कशी करण्यात येत आहे हे सुलभक सांगतात.<br>• पूर्वीची व्यवस्था व आताची नवीन व्यवस्था यामधील फरक सुलभक लक्षात आणून देतात, तसेच प्रशिक्षणार्थ्यांची याबद्दल मते व्यक्त करण्यास सांगतात.<br>• ३ ते ६ वयोगट ही बालवाटिका व ६ ते ८ वयोगट म्हणजे पहिली, दुसरी.<br>• ३ वर्षापासून ते ६ वर्षापर्यंतच्या मुलांच्या शिक्षणाची व्यवस्था शासनाने का केली आहे यावर चर्चा करतात. | १) सध्या ६ वर्षांपूर्वी–पर्यंतच्या बालकांच्या शिक्षणाची व्यवस्था काय आहे?<br>२) अंगणवाडी/ बालवाडी प्राथमिक शाळांना जोडल्याने कोणता फायदा होईल?<br>३) या बालकांना अध्यापन करण्यासाठी कोणत्या गोष्टीवर भर द्यावा? |

| उपघटक | आशय | सुलभक–प्रशिक्षणार्थी आंतरक्रिया | चिंतनात्मक प्रश्न |
|---|---|---|---|
| ५) प्रारंभिक बाल्या–वस्थेतील शिक्षण (५ मि.) | १) जिज्ञासा निर्माण करणे.<br>२) तार्किक विचार आणि समस्या निराकरण<br>३) कला, हस्तकला आणि संगीत<br>४) निसर्गाशी नाते<br>५) रंग, आकार, मुळाक्षरे आणि संख्या<br>६) सांघिक कार्य आणि सहयोग<br>७) नीतितत्त्वे<br>८) स्वतःची ओळख<br>९) शिष्टाचार, वर्तन आणि भावनिक विकास | • सुलभक जिज्ञासूवृत्तीचे महत्त्व विशद करतात व तुम्ही या वयातील विद्यार्थ्यांची जिज्ञासा कशी जागृत ठेवाल? याविषयी चर्चा करतात. संगीत, चित्रकला यांचा निसर्गाशी असणारा संबंध सुलभक लक्षात आणून देतात.<br>• सांघिक कार्य व सहयोग यांतील फरक स्पष्ट करण्यासाठी सुलभक चर्चा घडवून आणतात.<br>• विद्यार्थ्यांचा भावनिक विकास होण्याच्या दृष्टीने कोणते उपक्रम घेता येतील यावर चर्चा करतात. समाजमान्य शिष्टाचाराबाबत प्रशिक्षणार्थ्यांसोबत चर्चा करतात. | १) 'तीन वर्षे वयाच्या मुलाला शाळेत पाठविण्याऐवजी घरातूनच शिक्षण द्यावे' या विधानाबाबत साधकबाधक चर्चा करा.<br>२) ३ ते ६ वर्षे वयोगटातील मुलांच्या सर्वांगीण विकासाकडे अधिक लक्ष देणे का आवश्यक आहे?<br>३) ३ ते ६ वर्षे वयोगटातील मुलांना केवळ मध्यान्ह भोजनच नव्हे, तर अत्यंत पौष्टिक (प्रथिनेयुक्त) नाश्ताही का दिला पाहिजे?<br>४) 'विद्यार्थ्यांमध्ये जन्मतःच जिज्ञासू वृत्ती असते ती आपण आपल्या वर्तनाने दाबून टाकतो' या विधानाशी आपण सहमत आहात का? असल्यास कसे? |

| उपघटक | आशय | सुलभक-प्रशिक्षणार्थी आंतरक्रिया | चिंतनात्मक प्रश्न |
|---|---|---|---|
| | | | ५) तुम्ही निसर्गातील पाने, फुले, वनस्पती, प्राणी व कला यांचा समन्वय घटक शिकविताना कसा साधाल?<br>६) प्रारंभिक बाल्यावस्थेमध्ये शिष्टाचार तुम्ही कसे रुजवाल?<br>७) या वयोगटातील मुलांशी वागताना तुम्ही कोणती काळजी घ्याल? |
| ६) पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान (FLN) (१० मि.) | १) प्रारंभिक शिक्षण वाचन-लेखन व गणित यावर विशेष लक्ष<br>२) ग्रंथ प्रवर्धन -<br>३) शालेय ग्रंथालयाचा विस्तार<br>४) राष्ट्रीय मोहीम- पायाभूत साक्षरता आणि संख्याज्ञान यासाठी राष्ट्रीय मोहीम<br>५) पायाभूत कौशल्ये<br>६) पायाभूत अध्ययन कौशल्याचे सार्वत्रिक संपादन<br>७) ३ महिन्यांची खेळ आधारित शाळा | • FLN वर आधारित पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान याबाबतच्या अभियानाबाबत सादरीकरण करतात.<br>• SCERT महाराष्ट्र, पुणे मार्फत इयत्ता पहिली ते पाचवीसाठी भाषा आणि गणित विषयांसंदर्भात कार्यपुस्तिका व शिक्षकांसाठी कृती हस्तपुस्तिका देण्यात आलेल्या आहेत. याबाबतचे आपले अनुभव सांगण्यासाठी काही प्रश्न विचारतात. उदा.<br>१) कार्यपुस्तिकांचा परिणामकारक वापर कसा केला? | १) 'पायाभूत साक्षरता' ही संकल्पना तुम्ही कशी विचारात घ्याल?<br>२) राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेने या संदर्भात आणखी कोणते प्रयत्न करावेत असे आपणास वाटते?<br>३) शिक्षक हस्तपुस्तिकेमध्ये कोणत्या सुधारणा केल्या पाहिजेत असे आपणास वाटते? |

| उपघटक | आशय | सुलभक-प्रशिक्षणार्थी आंतरक्रिया | चिंतनात्मक प्रश्न |
| --- | --- | --- | --- |
| | ८) राष्ट्रीय संचयिका<br>९) डिजिटल ग्रंथालय<br>१०) ग्रंथालयाचा लाभ | २) शिक्षक कृती हस्तपुस्तिकेचा वापर आपण कसा केला?<br>३) यामधील कोणत्या गोष्टी महत्त्वपूर्ण वाटल्या? | |
| ७) अध्ययन क्षमता, निष्पत्ती आणि विषय यांचे एकात्मीकरण (७ मि.) | १) क्षमताधिष्ठित शिक्षण.<br>२) विषयांचे एकात्मीकरण कला, क्रीडा, ICT एकात्मिक आणि कथाकथन यावर आधारित अध्यापनशास्त्र.<br>३) वैज्ञानिक वृत्तीची जोपासना, वैज्ञानिक वृत्तीचा विकास, संविधानातील मूल्यांचे ज्ञान व वापर.<br>४) विषयांमध्ये कठोर विभाजन नाही.<br>५) बहुभाषिक अध्यापनास प्रोत्साहन. | • सुलभक क्षमता व अध्ययन निष्पत्ती यांमधील संबंध स्पष्ट करतात. कला, क्रीडा, ICT यांचा एकात्मिकरीत्या वापर अध्यापनात कसा करता येईल याविषयी चर्चा करतात.<br>• वैज्ञानिक वृत्ती विकसित करण्यासाठी काय करता येईल यासंबंधी चर्चा करतात.<br>• विविध विषयांचे एकात्मीकरण करणे का गरजेचे असते हे सुलभक स्पष्ट करतात.<br>• एखादा घटक शिकविताना बहुभाषिकत्वाचा उपयोग कसा करता येईल याविषयी विवेचन करतात. | १) 'अध्ययन निष्पत्ती' हे क्षमता विकसनाचे व्यक्त रूप होय' हे विधान स्पष्ट करा.<br>२) ICT व कथाकथन यांचे एकात्मीकरण कसे कराल? दोन उदाहरणे द्या.<br>३) वैज्ञानिक वृत्तीचा विकास करण्यासाठी शाळेमध्ये तुम्ही कोणते उपक्रम योजाल?<br>४) महाराष्ट्रात बहुभाषिकत्वास प्राधान्य द्यावे असे आपणास वाटते काय? असल्यास का व कसे? |

| उपघटक | आशय | सुलभक–प्रशिक्षणार्थी आंतरक्रिया | चिंतनात्मक प्रश्न |
|---|---|---|---|
| ८) शारीरिक व मानसिक आरोग्य आणि स्वास्थ्य (८ मि.) | १) आरोग्य तपासणी<br>२) शालेय दप्तराचे ओझे कमी करणे.<br>३) अत्यावश्यक कौशल्ये : आरोग्य व निरोगीपणा.<br>४) शाळेमध्ये समुपदेशन<br>५) दिव्यांग विद्यार्थ्यांवर लक्ष<br>६) शाळेत काळजीवाहू संस्कृती | • आरोग्य तपासणीची गरज सुलभक विशद करतात व ही तपासणी कशी करून घेता येईल याबाबत चर्चा करतात.<br>• विद्यार्थ्यांचे आरोग्य उत्तम राहण्यासाठी त्यांनी कोणती कौशल्ये आत्मसात केली पाहिजेत याबाबत चर्चा करतात.<br>• शाळेमध्ये समुपदेशकाद्वारा समुपदेशन करण्यासाठी समुपदेशकाची नियुक्ती कशी करता येईल हे सांगतात.<br>• वर्गातील दिव्यांग विद्यार्थी शोधून आवश्यकतेप्रमाणे त्यास मदत करणे कसे गरजेचे आहे हे स्पष्ट करतात.<br>• शाळेमध्ये शिक्षक, विद्यार्थी, पालक यांच्यामध्ये सौहार्दाचे वातावरण निर्माण करून विद्यार्थ्यांची शारीरिक व मानसिक काळजी घेण्यासाठीची व्यवस्था कशी असली पाहिजे याविषयी ऊहापोह करतात. | १) शाळेत आरोग्य तपासणी करण्यासाठी तुम्ही डॉक्टर कसे उपलब्ध करून घ्याल ?<br>२) शाळेत समुपदेशक नसेल तर शिक्षकाने समुपदेशन करताना कोणती काळजी घेतली पाहिजे ?<br>३) शाळेतील विद्यार्थ्यांना 'भावनिक सुरक्षितता' वाटेल यासाठी तुम्ही काय कराल ? |
| ९) नावीन्यपूर्ण अध्यापन–शास्त्र (५ मि.) | १) अनुभवात्मक अध्ययन.<br>२) एकात्मिक अध्यापनशास्त्र.<br>३) समवयस्कातील अभ्यासास प्रोत्साहन. | • सुलभक अनुभवात्मक अध्ययनाची गरज व महत्त्व पटवून देतात.<br>• अध्यापनात कला, क्रीडा यांचा समावेश कसा करता येईल याबाबत चर्चा करतात. | १) अनुभवात्मक अध्ययनाची दोन उदाहरणे द्या.<br>२) कला व क्रीडेचा वापर अध्यापनात कसा करता येईल |

| उपघटक | आशय | सुलभक–प्रशिक्षणार्थी आंतरक्रिया | चिंतनात्मक प्रश्न |
|---|---|---|---|
| | ४) समान महत्त्व.<br>५) दप्तराविना शाळा (आनंददायी शनिवार)<br>६) तंत्रज्ञानाचा वापर आणि एकात्मीकरण. | • समवयस्क विद्यार्थ्यांनी एकमेकांच्या साहाय्याने अध्ययन कसे करावे व त्यात शिक्षकांनी प्रोत्साहन कसे द्यावे याबाबत चर्चा करतात.<br>• दप्तराविना शाळा म्हणजे सुट्टी नव्हे, तर विद्यार्थ्यांच्या छंदाची जोपासना करण्याविषयी व्यवस्था आहे हे सुलभक पटवून देतात.<br>• तंत्रज्ञानाचा वापर अध्ययन, अध्यापनात कसा करता येईल याबाबत चर्चा करतात. | याची आपल्या विषयासाठीची दोन उदाहरणे द्या.<br>३) 'दप्तराविना शाळा' अंतर्गत तुम्ही कोणकोणते उपक्रम आयोजित कराल? |
| १०) भारतीय ज्ञान–प्रणाली (५ मि.) | १) भारतातील वैज्ञानिक व इतर महापुरुष.<br>२) भारतीय पारंपरिक मूल्ये<br>३) मूलभूत व संविधानातील मूल्ये.<br>४) भारताचे संविधान.<br>५) जनजातीविषयक ज्ञान<br>६) शिक्षणाचे देशी व पारंपरिक मार्ग<br>७) प्राचीन औषधोपचार पद्धती, वनव्यवस्थापन सेंद्रिय पीक लागवड.<br>८) अल्कोहोल, तंबाखू, अमलीपदार्थ, दुष्परिणाम | • भारतातील विविध वैज्ञानिकांची माहिती प्रशिक्षणार्थ्यांकडून विचारून घेतात.<br>• संविधानातील मूलभूत मूल्यांविषयी विद्यार्थ्यांमध्ये आदर कसा निर्माण करता येईल याविषयी चर्चा करतात.<br>• भारतातील विविध धर्म व जाती, त्यांची संस्कृती याबद्दल माहिती देतात.<br>• भारतातील शिक्षण घेण्याचे पारंपरिक मार्ग कोणते याबद्दल चर्चा करतात.<br>• वनव्यवस्थापन व सेंद्रिय शेतीबद्दलची जाणीव जागृती निर्माण करतात. | १) भारतातील महापुरुषां–बद्दल आदर निर्माण करण्यासाठी तुम्ही तुमच्या शाळेत कोणते उपक्रम योजाल?<br>२) भारतीय संविधानातील मूल्ये विद्यार्थ्यांमध्ये रुजविण्यासाठी अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तके व प्रत्यक्ष अध्यापनामध्ये कोणते बदल करावे लागतील?<br>३) भारतातील प्राचीन औषधोपचार |

| उपघटक | आशय | सुलभक-प्रशिक्षणार्थी आंतरक्रिया | चिंतनात्मक प्रश्न |
|---|---|---|---|
| | | • सुलभक मादक पदार्थांच्या दुष्परिणामाबाबतचे ज्ञान विद्यार्थ्यांपर्यंत कसे पोहोचविता येईल यावर चर्चा घडवून आणतात. | पद्धतीची तुमच्या परिचयातील उदाहरणे द्या. |
| ११) मूल्यांकन पद्धतीत बदल (८ मि.) | १) अध्ययन निष्पत्तीचा सातत्यपूर्ण शोध.<br>२) बोर्ड परीक्षेतील लवचीकता<br>३) मूल्यांकनात मूलभूत संकल्पना व उच्चश्रेणीय कौशल्यावर भर<br>४) राष्ट्रीय मूल्यांकन केंद्र<br>५) स्वयं-मूल्यांकन व सहाध्यायी मूल्यांकन<br>६) राष्ट्रीय चाचणी अभिसरण (NTA)<br>७) समग्र प्रगतिपत्रक | • प्रत्येक विद्यार्थ्याला त्या-त्या विषयाच्या अध्ययन निष्पत्ती प्राप्त झाल्याचा शोध कसा घेता येईल याविषयी चर्चा करतात.<br>• सध्याच्या बोर्ड परीक्षेची व्यवस्था व अपेक्षित लवचीकता याविषयी सुलभक भाष्य करतात.<br>• स्वयं-मूल्यांकन व सहाध्यायी मूल्यांकन या संकल्पना सुलभक स्पष्ट करतात.<br>• समग्र प्रगतिपत्रकासंदर्भात सुलभक चर्चा घडवून आणतात. | १) प्रत्येक विद्यार्थ्यांच्या अध्ययन निष्पत्तींचा शोध घेण्यात कोणत्या अडचणी येतील व त्यावर मात कशी कराल?<br>२) सध्याच्या बोर्ड परीक्षेच्या व्यवस्थेत कोणत्या उणीवा जाणवतात?<br>३) स्वयं-मूल्यांकनाचा विद्यार्थ्याला स्वतःला कसा उपयोग होतो?<br>४) सहाध्यायी मूल्यांकन हे शिक्षकाने करावयाच्या मूल्यांकनास कसे साहाय्यभूत ठरते?<br>५) सध्याचे प्रगती पुस्तक व समग्र प्रगतिपत्रक यात नेमका काय फरक आहे? |

| उपघटक | आशय | सुलभक–प्रशिक्षणार्थी आंतरक्रिया | चिंतनात्मक प्रश्न |
|---|---|---|---|
| १२) शिक्षक शिक्षण (७ मि.) | १) ४ वर्षांचे एकात्मिक बी.एड.<br>२) २ वर्षांचे बी.एड.<br>३) १ वर्षाचे बी.एड. | • ४ वर्षांच्या एकात्मिक बी.एड. अभ्यासक्रम प्रवेशासाठीची आवश्यक शैक्षणिक पात्रता व महत्त्व यांविषयी चर्चा करतात.<br>• २ वर्षांच्या बी.एड. चे स्वरूप, प्रवेशपात्रता व महत्त्व याविषयी चर्चा करतात.<br>• विशेष विषयात पदव्युत्तर पदवी प्राप्त केली आहे किंवा ४ वर्षीय पदवी परीक्षा कोर्स पूर्ण केला आहे, अशा व्यक्तींसाठी हा अभ्यासक्रम आहे. | १) एक वर्षाच्या बी.एड. च्या तुलनेत ४ वर्षांचा एकात्मिक बी.एड. अभ्यासक्रम अधिक प्रभावी व परिणामकारक असेल याबाबत आपले मत व्यक्त करा.<br>२) ४ वर्षांच्या एकात्मिक बी.एड. अभ्यासक्रमाला विद्यार्थी कितपत पसंती देतील असे आपणास वाटते? |
| १३) शिक्षकांचे सक्षमीकरण (५ मि.) | १) तंत्रज्ञान आधारित सर्वसमावेशक नियोजन.<br>२) विविध स्तरांवरील शिक्षकांसाठी व्यवसाय विकासासाठी संधी उपलब्धता.<br>३) शिक्षकांची स्वायत्तता<br>४) शिक्षकांचा व्यावसायिक विकास. | • शिक्षकांना तंत्रस्नेही बनविण्यासाठी शासनाने कोणत्या योजना आखल्या आहेत व कोणत्या योजाव्यात याबाबत चर्चा करतात.<br>• पायाभूत स्तरापासून माध्यमिक स्तरापर्यंत सर्वच शिक्षकांना व्यावसायिक विकासाची का गरज आहे याबाबत सुलभक मार्गदर्शन करतात.<br>• शिक्षकांच्या व्यावसायिक विकासासाठी दरवर्षी ५० घड्याळी तासाच्या प्रशिक्षणाची व्यवस्था केलेली आहे. त्यामधील उपक्रमांबाबत सुलभक चर्चा करतात. | १) शिक्षकांचे अध्यापन प्रभावी होण्यासाठी तंत्रज्ञान कसे साहाय्यभूत ठरू शकते?<br>२) शिक्षकांचा व्यावसायिक विकास होण्यासाठी शासनाने कोणकोणते उपक्रम हाती घ्यावेत असे आपणास वाटते?<br>३) शासनाने शिक्षकांच्या व्यावसायिक विकासासाठी ५० तासांची व्यवस्था निर्माण केलेली आहे. ती पुरेशी आहे असे आपणास वाटते का? |

# २. राज्य अभ्यासक्रम आराखडा – पायाभूत स्तर २०२३

## प्रस्तावना

स्वातंत्र्योत्तर कालखंडानंतर देशातील शिक्षणप्रक्रियेचा सर्वांगीण विकास केंद्रबिंदू मानून विविध धोरणे व आयोग आखले गेले. बदलत्या काळानुसार आवश्यक गरजा आणि अपेक्षा यांना पूर्ण करण्यासाठी शिक्षण धोरणांची नव्याने मांडणी केली जाते. त्यामुळे 'राष्ट्रीय शिक्षण धोरण–२०२०' देखील विविध नावीन्यपूर्ण अपेक्षा, संकल्पना आणि शिक्षणप्रक्रियेमध्ये अपेक्षित असणारा आमूलाग्र बदल, एकविसाव्या शतकाचे झपाट्याने बदलणारे स्वरूप, आधुनिक तंत्रज्ञान यांना समोर ठेवून मांडले गेले.

या धोरणांमध्ये प्रामुख्याने विविध संशोधने आणि सर्वेक्षणे यांना आधार मानून वयोगट ३ ते ८ वर्षातील बालकांचे पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान याची खात्री होणे, त्याकरिता हेतुपूर्वक प्रयत्न करणे हे अधोरेखित केले आहे.

बालकांच्या पुढील शिक्षणासाठी हा वयोगट पाया असल्याने या स्तरातील बालकांच्या संगोपनाबरोबरच त्यांच्या शिक्षणप्रक्रियेविषयी शिफारशी धोरणामध्ये मांडण्यात आल्या आहेत. त्यामुळे शैक्षणिक स्तरांची ५+३+३+४ अशी पुनर्रचना करण्यात आली. त्यामध्ये सुरुवातीच्या ५ वर्षांच्या कालखंडास 'पायाभूत स्तर' असे संबोधले आहे. या स्तराकरिता 'देशातील पहिला' राष्ट्रीय अभ्यासक्रम आरखडा–पायाभूत स्तराची निर्मिती करण्यात आली.

सदर आराखड्यामध्ये दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार महाराष्ट्रामध्ये राज्याच्या स्थानिक गरजांचा संदर्भ लक्षात घेऊन 'राज्य अभ्यासक्रम आराखडा–पायाभूत स्तर' (SCF-FC) विकसित करण्यात आला आहे. सदर आराखड्यामधील महत्त्वाच्या संकल्पना, शिफारशी, या स्तरावरील अध्ययन–अध्यापन प्रक्रिया, आशय, आवश्यक अध्ययन–अध्यापन साहित्य यांविषयी सविस्तर माहिती या प्रशिक्षणाकरिता विकसित करण्यात आलेल्या वाचन साहित्यामध्ये देण्यात आलेली आहे. सदर प्रशिक्षण घटकसंच हा पायाभूत स्तरावरील शिक्षकांना या स्तरावरील महत्त्वपूर्ण दृष्टिकोन, स्तराचे महत्त्व माहीत होण्याकरिता विकसित करण्यात आला आहे.

## प्रशिक्षण अध्ययन निष्पत्ती :

**सदर प्रशिक्षण आत्मसात केल्यानंतर शिक्षकास :**

१) पायाभूत स्तरावरील बालकांच्या अध्ययन प्रक्रियेविषयी आवश्यक सैद्धांतिक/तात्विक पार्श्वभूमी माहिती होईल.

२) पायाभूत स्तरावरील अध्ययन–अध्यापन प्रक्रिया, अभ्यासक्रम ध्येये, क्षमता आणि अध्ययन निष्पत्ती यामधील सहसंबंध स्पष्ट करता येईल.

३) राज्य अभ्यासक्रम आराखडा-पायाभूत स्तर निर्मितीमागील तत्त्वे, महत्त्वाच्या संकल्पना स्पष्ट करता येतील.

४) पायाभूत स्तरावरील बालकांच्या शिक्षण/अध्ययन प्रक्रियेच्या चर्चेत भाग घेतील.


५) पायाभूत स्तरावरील भाषा शिक्षण व गणित शिक्षणविषयक दृष्टिकोन अनुदेशनाचे आयाम प्रत्यक्ष वर्गात वापरण्यास सक्षम होतील.

६) पायाभूत स्तरावरील नावीन्यपूर्ण अध्ययन-अध्यापन कार्यनीती अभ्यासून प्रत्यक्षात वर्गअध्यापन करताना उपयोजनात आणता येईल.

७) पायाभूत स्तराकरिता आवश्यक वर्गवातावरण, बालकांची सुरक्षा व सुरक्षितता, मूल्यांकन प्रक्रिया यांविषयी जागरूक होतील.

| उपघटक | आशय | सुलभक प्रशिक्षणार्थी आंतरक्रिया | चिंतनात्मक प्रश्न |
|---|---|---|---|
| राज्य अभ्यासक्रम आराखडा पायाभूत स्तर (निर्मिती मागील भूमिका, पायाभूत स्तर रचना)<br>(८ मि.) | • देशातील पायाभूत स्तराकरिता पहिलाच आराखडा.<br>पायाभूत स्तरावरील सैद्धांतिक पार्श्वभूमी, मेंदूशास्त्राचे महत्त्व, विकासाची तत्त्वे<br>**पायाभूत स्तर रचना**<br>**वय ० ते ३ वर्षे**<br>• प्रामुख्याने घरातील वातावरण<br>• कुटुंब प्राधान्य<br>• पोषक आहार<br>• चांगल्या आरोग्य सवयी<br>• सुरक्षा व संरक्षण, सुजाण संगोपन<br>• संभाषण, खेळ<br>• हालचाल, संगीत<br>**वय ३ ते ६ वर्षे**<br>• ३ ते ४ वर्षे (बालवाटिका १)<br>• ४ ते ५ वर्षे (बालवाटिका २)<br>• ५ ते ६ वर्षे (बालवाटिका ३) | • सुलभक पायाभूत स्तरामागील पार्श्वभूमी, रचना तसेच सद्य:स्थितीमधील रचना, नवीन रचना यामागील भूमिका, महत्त्व फरक चर्चेद्वारे स्पष्ट करतील. | • पायाभूत स्तरामध्ये बालकांची अध्ययन-अध्यापन प्रक्रियेकरिता इयत्ता दुसरीपर्यंतचेच वर्ग निश्चित करण्यामागे कोणती कारणे असावीत? |



| उपघटक | आशय | सुलभक प्रशिक्षणार्थी आंतरक्रिया | चिंतनात्मक प्रश्न |
|---|---|---|---|
| | • ६ ते ७ वर्षे (इयत्ता पहिली)<br>• ७ ते ८ वर्षे (इयत्ता दुसरी)<br>प्रामुख्याने बालवाटिका/अंगणवाडी/शाळा यांमध्ये व्यतीत होणारा कालावधी<br>**शिक्षण**<br>**वय वर्षे ३ ते ८**<br>• आरोग्य<br>• सुरक्षितता<br>• संगोपन<br>• पोषण<br>• स्वमत कौशल्ये<br>• कारक कौशल्ये<br>• स्वच्छता<br>• व्यायाम<br>• भावना व्यवस्थापन<br>• खेळ<br>• प्रारंभिक संख्याज्ञान व साक्षरता | • पायाभूत स्तराकरिता कोणत्या बाबींवर बालकाच्या विकासाच्या दृष्टीने भर दिला जावा याबाबत चर्चा करतील. | • पायाभूत स्तरातील अध्ययन प्रक्रियेचे महत्त्व ओळखल्यामुळे शिक्षणप्रक्रियेमध्ये कोणते गुणात्मक बदल होतील असे आपल्याला वाटते?<br>• अंगणवाडी आणि शाळा एकाच आवरात असण्याचे कोणकोणते फायदे आहेत? |
| पायाभूत स्तरावरील आराखड्याचे प्रमुख ध्येय व तत्त्वे<br>(८ मि.) | **पायाभूत स्तरावरील आराखड्याचे प्रमुख ध्येय**<br>• वय वर्ष ३ ते ८ या वयोगटातील प्रत्येक बालकाला लवकरात लवकर मोफत, सुरक्षित, गुणवत्तापूर्ण आणि वैकासिकदृष्ट्या सुयोग्य वातावरण मिळवून देणारे प्रारंभिक बाल्यावस्था संगोपन व शिक्षण सहज उपलब्ध करून देणे.<br>**पायाभूत स्तरावरील आराखड्याची प्रमुख तत्त्वे** | • सुलभक पायाभूत स्तराचे अध्ययन–अध्यापन प्रक्रियेचे शिक्षणविषयक ध्येये, आराखडा प्रमुख तत्त्वे याविषयी पीपीटीआधारे चर्चा करतील. प्रत्येक तत्त्वाकरिता मते जाणून घेतील. वर्गाध्यापनामध्ये या तत्त्वांचा अवलंब कसा करू शकतात? याविषयी स्वत:चे अभिप्राय वाचन साहित्यामध्ये नोंदवतील. | • प्रत्येक बालक शिकू शकते, या तत्त्वामुळे शिक्षणप्रक्रियेकडे पाहण्याचा दृष्टिकोन कसा बदलेल?<br>• या तत्त्वांपैकी सर्वांत महत्त्वाचे तत्त्व आपल्याला कोणते वाटते? |


| उपघटक | आशय | सुलभक प्रशिक्षणार्थी आंतरक्रिया | चिंतनात्मक प्रश्न |
|---|---|---|---|
| आराखड्या-मागील महत्त्वाच्या सैद्धांतिक संकल्पना (५ मि.) |   पंचकोश विकास | • पंचकोश आणि त्यांचे बालकांच्या विकासातील स्थान, भारतीय ज्ञानप्रणाली याविषयी चर्चा करतील. पंचकोशाचे प्रत्येक कोशानुसार वैयक्तिक पैलू यांच्याशी सहसंबंध याविषयी व्यक्त होतील. | • पंचकोश आणि बालकांच्या विकासाची क्षेत्रे यांचा सहसंबंध माहीत असणे का महत्त्वाचे आहे? |
| पायाभूत स्तरावरील बालके कशी शिकतात? (५ मि.) |   | • पायाभूत स्तरावरील बालक कसे शिकते या विषयी प्रशिक्षणार्थ्यांच्या प्रत्यक्ष अनुभवातून, उदाहरणातून जाणून घेतील. प्रशिक्षणार्थी त्यांच्या अनुभवाआधारे या स्तरावरील बालकांची अध्ययन प्रक्रिया व स्रोत स्पष्ट करतील. | • पायाभूत स्तरावरील बालक अध्ययन-अध्यापनाच्या स्वरूपामध्ये कोणते महत्त्वपूर्ण बदल करावे लागतील? |
| शिक्षणाच्या लक्ष्यापासून अध्ययन निष्पत्तीपर्यंत (५ मि.) | शिक्षणाची लक्ष्ये<br>↓<br>अभ्यासक्रम ध्येये<br>↓<br>क्षमता<br>↓<br>अध्ययन निष्पत्ती | • लक्ष्यापासून अध्ययन निष्पत्तीपर्यंतचा प्रवास व बालकांचे केंद्रस्थान याविषयी प्रत्यक्ष उदाहरणे देऊन चर्चा करतील. | |
| भाषा शिक्षण व साक्षरतेबाबत दृष्टिकोन | **प्रारंभिक साक्षरता घटक**<br>• उदयोन्मुख साक्षरता कौशल्ये<br>• मौखिक भाषेचा विकास<br>• ध्वनिविषयक जागरूकता (उच्चारशास्त्राची जाणीव)<br>• निःसांकेतिकरण | • उदयोन्मुख साक्षरता कौशल्येविषयक बालकांच्या कृती, त्याविषयी शिक्षकांची जाणीव प्रगल्भ करतील. | • बालकांच्या भाषा शिक्षणामध्ये उदयोन्मुख साक्षरता कौशल्ये कशी महत्त्वपूर्ण आहेत? |

| उपघटक | आशय | सुलभक प्रशिक्षणार्थी आंतरक्रिया | चिंतनात्मक प्रश्न |
|---|---|---|---|
| | • समजपूर्वक वाचन<br>• ओघवते वाचन<br>• लेखन<br>• वाचनाची इच्छा किंवा सवय विकसित करणे<br>**साक्षरतेचा संतुलित दृष्टिकोन**<br>• शब्द ओळखणे आणि शब्द लिहिण्यात अचूकता (निम्नस्तरीय कौशल्ये)<br>• भाषा आकलन आणि अभिव्यक्ती (उच्चस्तरीय कौशल्ये)<br>➢ मौखिक भाषा विकास<br>➢ निःसांकेतिकरणासाठी निर्देश आणि अक्षरध्वनी वापरून शब्द वाचन<br>• वाचन कार्यनीती<br>➢ प्रकटवाचन<br>➢ सहभागी वाचन<br>➢ मार्गदर्शित वाचन<br>➢ स्वतंत्र वाचन<br>• लेखन कार्यनीती<br>➢ लेखनाचे प्रात्यक्षिक<br>➢ सहभागी लेखन<br>➢ मार्गदर्शित लेखन<br>➢ स्वतंत्र लेखन | • या कौशल्यांकडे पाहण्याचा नावीन्यपूर्ण दृष्टिकोन विकसित करतील.<br>• साक्षरतेचा संतुलित दृष्टिकोन याविषयी प्रशिक्षणार्थीची पूर्वकल्पना जाणून घेतील. दृष्टिकोनाचे सर्व घटक व महत्त्व स्पष्ट करतील.<br>• प्रत्यक्ष गटचर्चेच्या माध्यमातून प्रत्येक प्रकाराविषयी व्यक्त होतील. | • उदयोन्मुख साक्षरता संदर्भात पालकांमध्ये जागरूकता कशी आणता येईल?<br>• साक्षरतेचा संतुलित दृष्टिकोन भाषा शिक्षणास कसा साहाय्यभूत ठरेल? |

| उपघटक | आशय | सुलभक प्रशिक्षणार्थी आंतरक्रिया | चिंतनात्मक प्रश्न |
|---|---|---|---|
| (१० मि.) | **भाषा साक्षरता अनुदेशनाचे चार आयाम**<br>**मौखिक भाषाविकास**<br>• चित्रवाचन<br>• अनुभव सामायिक करणे<br>• गोष्ट सांगणे.<br>• नाट्य आणि भूमिका<br>**शब्द ओळखणे**<br>• ध्वनीची जाणीव होणाऱ्या कृती<br>• अक्षरे ओळखणे<br>• आवाज-चिन्ह संबंध<br>• कौशल्यकेंद्रित लेखन (अक्षरे व शब्द)<br>• अक्षरे व शब्दवाचन<br>**वाचन**<br>• मोठ्याने वाचणे (प्रकट वाचन)<br>• सहभागी वाचन<br>• मार्गदर्शित वाचन<br>• स्वतंत्र वाचन<br>**लेखन**<br>• नमुना लेखन (प्रात्यक्षिक लेखन)<br>• सहभागी लेखन<br>• मार्गदर्शित लेखन<br>• स्वतंत्र लेखन | • भाषा साक्षरता अनुदेशनाचे आयाम, स्पष्ट करतील. आवश्यकतेनुसार चर्चा घडवून आणतील.<br>• प्रत्येक आयामासाठी संबंधित कार्यनीती स्पष्ट करतील. | |
| गणित शिक्षणविषयक दृष्टिकोन (१० मि.) | गणित अध्यापन दृष्टिकोन (ELPS)<br>E - अनुभव (Experiences)<br>L - बोलीभाषा (Spoken Language)<br>P - चित्रे (Picture)<br>S - लिखित चिन्हे (Written Symbol) | • गटचर्चा घडवून आणतील. प्रत्येक आयाम व आवश्यक कार्यनीती, आशय, शिक्षक भूमिका याविषयी चर्चा करतील. | • पायाभूत स्तरावर गणित गप्पाकरिता कोणता आशय/संबोध साहाय्यभूत ठरेल? |

| उपघटक | आशय | सुलभक प्रशिक्षणार्थी आंतरक्रिया | चिंतनात्मक प्रश्न |
| --- | --- | --- | --- |
| | **आयाम १**<br>**मौखिक गणिती चर्चा**<br>(गणिताचे गाणे/कविता म्हणणे, तोंडी गणन, बालकांचे अनुभव)<br>**आयाम २**<br>**कौशल्य अध्यापन**<br>(प्रभुत्व संपादनाच्या पैलूंचे एकत्रीकरण)<br>**आयाम ३**<br>**कौशल्य सराव**<br>(प्रक्रियात्मक, संकल्पनात्मक, समस्या निराकरण, तर्क)<br>**आयाम ४**<br>**गणितीय खेळ**<br>(अध्ययनाचे दृढीकरण, समस्या निराकरण) | • प्रत्येक आयामावर गटचर्चा व सदर आयाम वर्गात उपयोगात आणण्याची प्रक्रिया याविषयी चर्चा करतील. | • गणित गप्पा, गणित खेळ, कोडी यांचे पायाभूत स्तरावरील महत्त्व काय? |
| पायाभूत स्तरावरील अध्यापनशास्त्र<br>१० मि. | • अध्यापनशास्त्राची प्रमुख तत्त्वे.<br>• पायाभूत स्तरावरील अध्यापन कार्यनीती<br>• गोष्टी सांगणे.<br>• खेळ आधारित अध्यापन<br>• गाणी–बडबडगीते<br>• संगीत व तालबद्ध हालचाली<br>• कला व हस्तकला<br>• वर्गातील खेळ<br>• निसर्ग सान्निध्य<br>• क्षेत्रभेटी | • अध्यापनशास्त्राची तत्त्वे त्यांचे महत्त्व, यावषयी चर्चा करतील.<br>• पायाभूत स्तरावरील सध्या कार्यनीती प्रशिक्षणार्थी वर्गात कसे वापरत आहेत. याविषयी अभिप्राय घेतील.<br>• प्रत्येक कार्यनीतीनिहाय गट तयार करतील व प्रशिक्षणार्थ्यांच्या गटात जाऊन प्रत्यक्ष वर्गात कशी वापरता येईल याविषयी चर्चा घडवून आणतील. | • बालवाटिका स्तराकरिता वापरण्यात येणाऱ्या अध्यापन कार्यनीती इयत्ता पहिली आणि दुसरीकरिता वापरणे का आवश्यक आहे? |

| उपघटक | आशय | सुलभक प्रशिक्षणार्थी आंतरक्रिया | चिंतनात्मक प्रश्न |
|---|---|---|---|
| वर्गवातावरण (८ मि.) | • सकारात्मक वर्गवातावरणाची गरज<br>• वर्गात सकारात्मक वातावरण निर्मितीतील अंतर्भूत घटक<br> | • सकारात्मक वर्गवातावरणाची गरज ही संकल्पना स्पष्ट करतील.<br>• दोन भिन्न वर्गवातावरणाची slide दाखवून आदर्श/योग्य वर्गवातावरण कोणते असावे याबाबत चर्चा घडवून आणतील.<br>• वर्गात सकारात्मक वातावरण निर्मितीतील अंतर्भूत घटक स्पष्ट करतील. | • वर्गात वातावरण निर्मितीतील अंतर्भूत घटक सकारात्मक वातावरण निर्मितीसाठी कसे परिणामकारक ठरतील? |
| अध्ययन-अध्यापन साहित्य (LTM) (०८ मिनिटे) | • अध्ययन-अध्यापन साहित्याची गरज<br>• पायाभूत स्तरावर LTM निवडीची तत्त्वे<br><br>• अध्ययन-अध्यापन साहित्य प्रकार<br>१) शिक्षकनिर्मित साहित्य<br>२) बालकनिर्मित साहित्य<br>३) स्थानिक स्तरावरील खरेदी करता येणारे साहित्य | • पायाभूत स्तरावर अध्ययन-अध्यापन साहित्याची गरज संकल्पना PPT द्वारे स्पष्ट करतील.<br>• पायाभूत स्तरावर अध्ययन-अध्यापन साहित्य निवडीची तत्त्वे स्पष्ट करतील.<br>• अध्ययन-अध्यापन साहित्याचे प्रकार उदाहरणासहित स्पष्ट करतील. | • पायाभूत स्तरावर शिक्षक कोणकोणते LTM स्वत: तयार करतील? |

| उपघटक | आशय | सुलभक प्रशिक्षणार्थी आंतरक्रिया | चिंतनात्मक प्रश्न |
|---|---|---|---|
| | ४) पुस्तकालय/ बालसाहित्य<br>५) तंत्रज्ञान, डिजिटल आणि दृक्श्राव्य साहित्य | • निवडक व्हिडिओ दाखवून अध्ययन-अध्यापन साहित्य वापराबाबत चर्चा घडवून आणतील. | |
| पालक आणि समुदायाची भूमिका (०५ मिनिटे) | अ) पालकांची भूमिका<br>• पालकसभा/गृहभेटी<br>• अध्ययन संपादणूक<br>ब) समुदायाची भूमिका<br><br> | • पालकांची भूमिका संकल्पना स्पष्ट करतील.<br>• समुदायाची भूमिका स्पष्ट करतील.<br>• पालकांची व समुदायाची मदत घेण्यासाठी शिक्षक म्हणून भूमिका यावर चर्चा घडवून आणतील. | • शालेय विकासात पालक व समुदायाचा सहभाग वाढविण्यासाठी कोणते उपाय करता येतील? |
| शाळेतील सुरक्षा आणि सुरक्षितता (०३ मिनिटे) | • शाळेतील सुरक्षा आणि सुरक्षितता गरज.<br>• शाळेतील सुरक्षा आणि सुरक्षितताविषयक विचारात घ्यावयाचे मुद्दे. | • शाळेतील सुरक्षा आणि सुरक्षितता यांची गरज स्पष्ट करतील.<br>• शाळेतील सुरक्षा आणि सुरक्षितताविषयक विचारात घ्यावयाचे मुद्दे स्पष्ट करतील.<br>• समुदाय व पालक यांची मदत घेण्याबाबत महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा घडवून आणतील. | • पायाभूत स्तरावर बालकांच्या सुरक्षिततेला प्रथम प्राधान्य द्यावे यासाठी समुदाय व पालकांची मदत कशी घेता येईल? |

| उपघटक | आशय | सुलभक प्रशिक्षणार्थी आंतरक्रिया | चिंतनात्मक प्रश्न |
|---|---|---|---|
| पायाभूत स्तरावरील मूल्यांकन (०५ मिनिटे) | • पायाभूत स्तरावरील मूल्यांकनाचे उद्देश<br><br><br>• मूल्यांकन करताना लक्षात घ्यावयाच्या बाबी<br>१) ताणविरहित मूल्यांकन<br>२) बालके व त्यांच्या शिकण्यातील विविधता यांचा विचार<br>३) मूल्यांकनाची नोंद व दस्तऐवजीकरण<br>• मूल्यांकनाच्या पद्धती आणि साधने<br>१) बालकांचे निरीक्षण<br>२) कलाकृती व कृतिपत्रिकांचे विश्लेषण<br>३) समग्र प्रगतिपत्रक (HPC) | • पायाभूत स्तरावरील मूल्यांकनाचे उद्देश हा मुद्दा स्पष्ट करतील.<br>• मूल्यांकन करताना लक्षात घ्यावयाच्या बाबी स्पष्ट करतील.<br>• मूल्यांकनाच्या पद्धती व साधने स्पष्ट करतील.<br>• कलाकृती व कृतिपत्रिकांचे नमुने दाखवून चर्चा घडवून आणतील.<br>• समग्र प्रगतिपत्रक याबद्दल माहिती स्पष्ट करतील. | • ताणविरहित मूल्यांकन कसे साध्य करता येईल? |
| समारोप | • सत्राचा थोडक्यात आढावा. | • सुलभक सत्रातील प्रमुख मुद्द्यांचा थोडक्यात आढावा घेतील. | • प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर याचा वर्गात कसा उपयोग करावा? |

# ३. राज्य अभ्यासक्रम आराखडा – शालेय शिक्षण २०२४

राष्ट्रीय शिक्षण धोरण – २०२० ची उद्दिष्टे प्रत्यक्षात अमलात आणण्यासाठी राज्य अभ्यासक्रम आराखडा विकसित करण्यात आला आहे आणि सर्व राज्यांसाठी राज्य अभ्यासक्रम आराखडा एक महत्त्वपूर्ण दस्तऐवज आहे.

राष्ट्रीय शिक्षण धोरणातील शिफारशींनुसार बदललेल्या आकृतिबंधाप्रमाणे पहिल्या पाच वर्षांसाठी म्हणजेच पायाभूत स्तरासाठी व पुढील दहा वर्षांसाठी म्हणजेच शालेय शिक्षण स्तरासाठी, असे दोन स्वतंत्र राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडे प्रसिद्ध करण्यात आले आहेत. या राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखड्यांना अनुसरून महाराष्ट्र शासनाने केंद्रशासनाच्या शालेय शिक्षणाच्या अभ्यासक्रम आराखड्यानुसार महाराष्ट्राच्या गरजा, वैशिष्ट्ये व सद्यःस्थिती विचारात घेऊन शालेय शिक्षणाचा राज्य अभ्यासक्रम आराखडा प्रसिद्ध करण्यात आला आहे. सदर आराखडा तयार करण्यासाठी विविध शालेय विषय, आंतरविद्याशाखीय विषय, तसेच सर्वच विषयांतून एकात्मिकपणे शिकविल्या जाणाऱ्या विविध घटकांचा विचार केला आहे. तज्ज्ञांच्या कृती गटांनी तयार केलेल्या आराखड्यात महाराष्ट्रातील जनतेच्या भविष्यवेधी दृष्टिकोनाचे प्रतिबिंब दिसावे यासाठी प्रारंभिक मसुदा जनतेसमोर ठेवून, त्यावर अभिप्राय मागवण्यात आले. या सर्व सूचनांचा विचार करून आवश्यक सूचना योग्य ठिकाणी क्षेत्रनिहाय समाविष्ट करण्यात आल्या आहेत. विद्यार्थी हिताच्या दृष्टीने सकारात्मक अशा राज्य अभ्यासक्रम आराखड्याच्या आधारे अभ्यासक्रम व पाठ्यक्रम विकसनाचे कामकाज सद्यःस्थितीत सुरू आहे.

(सदर शालेय शिक्षणाच्या राज्य अभ्यासक्रम आराखड्याबाबत माहिती आपण या सत्रामध्ये घेणार आहोत.)

आपल्या समाजाचे रूपांतर अधिक न्याय्य, समतावादी, समृद्ध, शाश्वत आणि भारतीय संस्कृतीचा अभिमान असलेल्या समाजात करणे हे ध्येय समोर ठेवून आर्थिक विकास, सामाजिक न्याय आणि समता, संशोधन व ज्ञानाची निर्मिती, वैज्ञानिक आणि तांत्रिक प्रगती, पर्यावरणीय शाश्वतता व संस्कृती जतन आणि चैतन्य याबाबतीत जागतिक स्तरावर सक्षम भारतीय नेतृत्व तयार करणे ही दृष्टी राज्य अभ्यासक्रम आराखड्याद्वारे ठेवण्यात आली आहे.

याकरिता विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या सर्व पैलूंचा व क्षमतांचा विकास होण्यास मदत होईल. अधिक सर्वव्यापी, उपयुक्त असे परिपूर्ण शिक्षण मिळवून देणारा अभ्यासक्रम विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न आराखड्याच्या माध्यमातून करण्यात आला आहे. यासाठी विविध विषयांतील संकल्पना व त्यांचे परस्पर संबंध यांचे सखोल आकलन होण्यासाठी व क्षमता प्राप्त करण्यास सक्षम असा विद्यार्थी घडविण्यासाठी अध्यापनशास्त्र अधिक प्रभावी कसे होईल यावर विचार करून अनुभव आधारित, शोधोन्मुख, चर्चा आधारित व कृती आधारितशास्त्र वापरून अधिकाधिक समृद्ध अध्ययन अनुभवासाठी अभ्यासक्रमातील अध्यापनशास्त्र, शालेय वातावरण, संस्कृती यांवरही भर देण्यात आला आहे. हे करत असताना विद्यार्थ्यांच्या सामाजिक,

आर्थिक पार्श्वभूमीचा विचार न करता केवळ क्षमता बांधण्यासाठी विद्यार्थ्यांना अधिकाधिक प्रवृत्त करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

## अध्ययन निष्पत्ती

१) प्रशिक्षणार्थी राज्य अभ्यासक्रम आराखडा – शालेय शिक्षण मधील शालेय शिक्षणाची लक्ष्ये व अभ्यासक्रम क्षेत्रे, स्तर रचना, अध्ययन मानके, संकल्पना समजावून घेतो.

२) प्रशिक्षणार्थी आंतरसमवाय क्षेत्राचा अध्ययन–अध्यापनात एकात्मिक पद्धतीने कसा वापर करायचा हे सांगतो.

३) प्रशिक्षणार्थी राज्य अभ्यासक्रम आराखडा – शालेय शिक्षणमधील प्रमुख वैशिष्ट्ये समजावून घेतो.

४) प्रशिक्षणार्थी शालेय संस्कृती व प्रक्रियेचा विद्यार्थी संपादणुकीवर होणारा परिणाम स्पष्ट करतो.


५) प्रशिक्षणार्थी शैक्षणिक ध्येयपूर्तीसाठी साहाय्यभूत परिसंस्था निर्माण करण्याची आवश्यकता स्पष्ट करतो.

**एकूण – ९० मिनिटे**

| उपघटक | आशय | सुलभक – प्रशिक्षणार्थी आंतरक्रिया | चिंतनात्मक प्रश्न |
|---|---|---|---|
| राज्य अभ्यासक्रम आराखडा – शालेय शिक्षण : शालेय शिक्षणाची लक्ष्ये व अभ्यासक्रम क्षेत्रे (१० मि.) | **शालेय शिक्षणाची लक्ष्ये :**<br>• तर्कसंगत विचार व स्वायत्तता<br>• आरोग्य व निरामयता<br>• लोकशाही व सामुदायिक सहभाग<br>• आर्थिक सहभाग<br>• सांस्कृतिक सहभाग<br>**अभ्यासक्रम क्षेत्रे** : एकूण आठ (भाषा शिक्षण, गणित शिक्षण, विज्ञान शिक्षण, सामाजिक शास्त्रे शिक्षण, कलाशिक्षण, शारीरिक शिक्षण व निरामयता, व्यावसायिक शिक्षण, आंतरविद्याशाखा शिक्षण.) | • सुलभक पीपीटीवरून शालेय शिक्षणाची लक्ष्ये व अभ्यासक्रम क्षेत्रे स्पष्ट करतात.<br>• प्रशिक्षणार्थी लक्षपूर्वक ऐकतात व चर्चेत भाग घेतात. | • कोणत्या नवीन अभ्यासक्रम क्षेत्रांचा समावेश करण्यात आला आहे? काय कारण असू शकते? |
| स्तर रचना (५ मि.) | चार स्तर<br>१) पायाभूत स्तर<br>२) पूर्वतयारी स्तर<br>३) पूर्वमाध्यमिक स्तर<br>४) माध्यमिक स्तर | • सुलभक शालेय शिक्षणाची स्तर रचना पीपीटी वरून स्पष्ट करतात.<br>• प्रशिक्षणार्थ्यांबरोबर चर्चा घडवून आणतात. | शालेय स्तरांची रचना करताना कोणत्या बाबींचा विचार करण्यात आला आहे? |

| उपघटक | आशय | सुलभक – प्रशिक्षणार्थी आंतरक्रिया | चिंतनात्मक प्रश्न |
| --- | --- | --- | --- |
| अध्ययन मानके (१० मि.) | • **अध्ययन मानके :** अध्ययन मानके चार भागांत विभाजित केली आहेत.<br>१) शालेय शिक्षणाची लक्ष्ये<br>२) अभ्यासक्रम ध्येये<br>३) क्षमता<br>४) अध्ययन निष्पत्ती<br>• पंचकोश विकास<br>• **अध्ययनाची पंचपदी संकल्पना** :<br>१) अदिती (परिचय)<br>२) बोध (संकल्पनात्मक भावना)<br>३) अभ्यास (सराव)<br>४) प्रयोग (उपयोजन)<br>५) प्रसार (विस्तार) | • सुलभक पीपीटीवरून शालेय शिक्षणाची लक्ष्ये अभ्यासक्रमाची ध्येये, क्षमता अध्ययन निष्पत्ती स्पष्ट करतात.<br>• सुलभक पंचकोशाधारित शिक्षकाची संकल्पना स्पष्ट करतात.<br>• प्रशिक्षणार्थी लक्षपूर्वक ऐकतात, समजून घेतात व चर्चेत भाग घेतात.<br>• सुलभक अध्ययनाची पंचपदी स्पष्ट करतो. | १) शालेय शिक्षणाच्या विविध स्तरांवरील अध्यापनशास्त्राचा प्रभावी दृष्टिकोन कोणता?<br>२) क्षमता व निष्पत्ती यामध्ये काय फरक आहे?<br>३) अध्ययन मानकातील घटकांचा परस्परांशी काय संबंध आहे?<br>४) पंचकोश विकास भारतीय परंपरेचा पाया असे का म्हटले आहे?<br>५) पंचपदी संकल्पना काय आहे? |
| आंतरसमवाय क्षेत्रे (१५ मि.) | **आंतरसमवाय क्षेत्रे**<br>१) भारतीय ज्ञानप्रणाली.<br>२) मूल्य आणि स्वभाववृत्ती.<br>३) पर्यावरणविषयक अध्ययन आणि काळजी.<br>४) शाळांमधील समावेशन.<br>५) शाळांमध्ये मार्गदर्शन आणि समुपदेशन.<br>६) शाळेतील शैक्षणिक तंत्रज्ञान.<br>**सदर क्षेत्रे ही कोणत्याही एका विषयाशी किंवा शालेय व्यवस्थापनाशी निगडित नसून, ती सर्व अभ्यासक्रमांवर प्रभाव टाकणारी आहेत.** | • सुलभक पीपीटीच्या साहाय्याने सहा आंतरसमवाय क्षेत्रांचे स्पष्टीकरण करतात.<br>• प्रशिक्षणार्थी चर्चेत भाग घेतात आणि सहा क्षेत्रे समजावून घेतात. | १) शाळेमध्ये कोणती मूल्ये रुजवावीत व का?<br>२) शालेय विषयातून आंतरसमवाय क्षेत्रांचे कशा पद्धतीने एकात्मिकरण करावे? |

| उपघटक | आशय | सुलभक – प्रशिक्षणार्थी आंतरक्रिया | चिंतनात्मक प्रश्न |
|---|---|---|---|
| | विविध क्षेत्रांतील योगदानाबाबत भारतीयांचा समृद्ध इतिहास माहिती करून घेणे. भारतीय ज्ञानप्रणालीने विविध ज्ञानशाखेद्वारे दिलेल्या ज्ञानाचा अभिमान बाळगणे व जोपासणे, विद्यार्थ्यांमध्ये पारंपरिक भारतीय मूल्ये, (सत्य, अंहिसा, निष्काम कर्म, न्याय, स्वातंत्र्य, समानता, बंधुता इत्यादी.) विकसित करणे, पर्यावरण व मानवी जीवन सहसंबंध, पर्यावरणविषयक जागरूकता, समस्या व आव्हानांची वैचारिक जागरूकता विकसित करणे, शिक्षणप्रक्रियेमध्ये सर्वांना समान संधी, मार्गदर्शन व समुपदेशन अभ्यासक्रमाचा स्वतंत्र भाग नाही, तर एकूण अभ्यासक्रमाचा पूरक भाग आहे. तसेच मार्गदर्शन व समुदेशन हे विद्यार्थ्यांचे वैयक्तिक शिक्षण, आरोग्य व गरजांवर लक्ष केंद्रित करणारे असेल. शालेय शिक्षणात ICT चा उपयोग, गैरवापर, दुरूपयोग याबाबत खबरदारी घेणे. | | |
| शालेय विषय प्रमुख वैशिष्ट्ये (३० मि.) | **राज्य अभ्यासक्रम आराखड्यात भर देण्यात आलेली क्षेत्रे :**<br>• कला शिक्षण<br>• शारीरिक शिक्षण व निरामयता<br>• व्यावसायिक शिक्षण<br>• आंतरविद्याशाखा क्षेत्रातील शिक्षण<br>• भाषा शिक्षण<br>• गणित शिक्षण<br>• विज्ञान शिक्षण<br>• सामाजिक शास्त्रे शिक्षण<br>• विषय योजना इ. तिसरी ते बारावी<br>• विषयनिहाय ठळक वैशिष्ट्ये | • सुलभक पीपीटीच्या साहाय्याने भाषा, गणित, विज्ञान, सामाजिक शास्त्रे, कला, शारीरिक शिक्षण व निरामयता, व्यावसायिक शिक्षण, आंतरविद्याशाखा या विषयांतील प्रमुख वैशिष्ट्ये स्पष्ट करतात. | |

| उपघटक | आशय | सुलभक – प्रशिक्षणार्थी आंतरक्रिया | चिंतनात्मक प्रश्न |
|---|---|---|---|
| | | • सुलभक पीपीटीच्या साहाय्याने विषय योजना स्पष्ट करतात.<br>• प्रशिक्षणार्थी लक्षपूर्वक ऐकून चर्चेत सहभागी होतात, समजावून घेतात. | विषय योजनेत काही विषय नव्याने समाविष्ट करण्याचे काय प्रयोजन असेल? |
| शालेय संस्कृती व प्रक्रिया आणि विद्यार्थी संपादणूक (१० मि.) | **शाळा संस्कृती – दोन पैलू**<br>१) मूल्ये, मानके, श्रद्धा<br>२) वर्तणूक, नातेसंबंध, कार्यपद्धती<br>हे तीन श्रेणीमध्ये दिसून येतात.<br>१) परस्परसंबंध/नातेसंबंध<br>२) प्रतीके<br>३) व्यवस्था व पद्धती | • सुलभक पीपीटीच्या साहाय्याने शालेय संस्कृतीचे महत्त्वपूर्ण घटक, वैशिष्ट्ये तसेच शालेय संस्कृती व प्रक्रियेचा विद्यार्थी संपादणुकीवर होणारा परिणाम स्पष्ट करतात.<br>• प्रशिक्षणार्थी चर्चेत सहभाग घेतात. | शालेय संस्कृतीचा विद्यार्थ्यांच्या संपादणुकीवर कसा प्रभाव पडतो? |
| साहाय्यभूत परिसंस्था निर्मिती (१० मि.) | <br>• राज्य अभ्यासक्रम आराखड्याची अंमलबजावणी करण्यासाठी शिक्षक व मुख्याध्यापक यांना प्रशिक्षित करणे. | • सुलभक पीपीटीच्या साहाय्याने शाळांमधील शिक्षणप्रक्रिया विद्यार्थ्यांच्या अध्ययनाला पूरक व शैक्षणिक ध्येयपूर्ती अनुकूल असणे यादृष्टीने पूरक यंत्रणा | १) समाज व कुटुंबाची विद्यार्थी विकासात कशी महत्त्वाची भूमिका आहे?<br>२) विद्यार्थी विकासात अध्ययनपूरक वातावरण कसे महत्त्वाचे आहे? |

| उपघटक | आशय | सुलभक – प्रशिक्षणार्थी आंतरक्रिया | चिंतनात्मक प्रश्न |
|---|---|---|---|
| | • पालकांच्या व समाजाच्या दृष्टीने गुणवत्ता, पुरेसा वेळ व पायाभूत सुविधांची निर्मिती व देखभाल आवश्यक आहे.<br>• शिक्षकांनी व्यावसायिक प्रगती करणे हा शिक्षणव्यवस्थेचा महत्त्वाचा पैलू आहे.<br>• शिक्षक हे सर्व शैक्षणिक सुधारणेचे पथदर्शक असले पाहिजेत. त्यामुळे शिक्षकांना सर्वतोपरी सक्षम व प्रेरित केले पाहिजे.<br>• मुलांच्या सर्वांगीण शिक्षणासाठी व संगोपनासाठी पालक व समाजाचा सहभाग आवश्यक आहे. पालक व समाजातील सदस्यदेखील प्रेरक व्यक्ती म्हणून काम करू शकतात. शाळा व्यवस्थापन समिती (SMC) उत्तमरीत्या कार्यरत ठेवली पाहिजे. | व साहाय्यभूत परिसंस्था निर्मितीची आवश्यकता स्पष्ट करतात.<br>• प्रशिक्षणार्थी चर्चेत सहभाग घेऊन समजावून घेतात. | ३) शिक्षणक्षेत्रात गुणात्मक सुधारणा घडविण्यासाठी शिक्षक सक्षमीकरण कसे महत्त्वाचे ठरते? |
| चर्चा व समारोप (५ मि.) | • राज्य अभ्यासक्रम आराखडा शालेय शिक्षण–२०२४ थोडक्यात आढावा व चर्चा | • राज्य अभ्यासक्रम आराखडा–शालेय शिक्षण २०२४ यांचा थोडक्यात आढावा घेतात व चर्चा घडवून आणतात.<br>• प्रशिक्षणार्थी चर्चेत सहभागी होतात.<br>• शंकांचे निरसन करून घेतात. | – |

◈◈◈

## ४. शाळा गुणवत्ता मूल्यांकन आणि आश्वासन आराखडा (SQAAF) : प्रस्तावना व संरचना

**अध्ययन निष्पत्ती :**

१) प्रशिक्षणार्थी शालेय गुणवत्ता मूल्यांकन व आश्वासन आराखडा समजून घेतात.

२) प्रशिक्षणार्थी मूल्यांकन व आश्वासन आराखड्याची मार्गदर्शक तत्वे समजून घेतात.

३) प्रशिक्षणार्थी मूल्यांकन व आश्वासन आराखडा वापरताना लक्षात ठेवण्याच्या बाबी समजून घेतात.

४) प्रशिक्षणार्थी मूल्यांकन प्रणालीचा अहवाल व उद्देश समजून घेतात.

५) प्रशिक्षार्थी कार्यप्रणालीची मार्गदर्शक तत्वे समजून घेतात.

६) प्रशिक्षणार्थी शाळा गुणवत्ता मूल्यांकन आणि आश्वासन आराखडा (SQAAF) संरचना समजून घेतात.

७) प्रशिक्षणार्थी कामगिरी निर्देशकांचे चार स्तर समजून घेतात.

८) प्रशिक्षणार्थी शाळा गुणवत्ता मूल्यांकन आणि आश्वासन आराखडा (SQAAF) एकूण भारांश/गुणांकन समजून घेतात.

९) प्रशिक्षणार्थी राज्य शाळा मानक प्राधिकरण (SSSA) आणि शाळा गुणवत्ता मूल्यांकन आणि आश्वासन आराखडा (SQAAF) शासन निर्णय समजून घेतात.

| उपघटक | आशय | सुलभक – प्रशिक्षणार्थी आंतरक्रिया | चिंतनात्मक प्रश्न |
|---|---|---|---|
| गुणवत्ता मूल्यांकन मार्गदर्शक तत्वे | १) मूल्यांकन का करायचे?<br>२) राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० आणि मूल्याकंन. | • सुलभक शालेय गुणवत्ता मूल्यांकन व आश्वासन आराखडा आणि शाळा सिद्धी यातील बदल समजावून देतील.<br>• मानकविधाने, विद्यार्थी विकास, राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० मधील मार्गदर्शक शिफारशी यांना प्रशिक्षण यांची चर्चा करतील.<br>• आराखडा वापरताना लक्षात ठेवायच्या बाबीवर चर्चा घडून येईल. | • शालेय गुणवत्ता मूल्यांकनाची आवश्यकता का आहे?<br>• आराखडा वापरताना कोणती काळजी घ्यावी असे वाटते? |

| उपघटक | आशय | सुलभक प्रशिक्षणार्थी आंतरक्रिया | चिंतनात्मक प्रश्न |
|---|---|---|---|
| शाळा गुणवत्ता मूल्यांकन आणि आश्वासन आराखडा (SQAAF) संरचना | १) क्षेत्र<br>२) उपक्षेत्र<br>३) मानके<br>४) वर्णन विधाने<br>५) स्तर<br>६) मार्गदर्शक तत्त्वे/धोरणे<br>७) पुरावे<br>८) उपक्षेत्रनिहाय मानकांची संख्या व त्यासाठीची गुण रचना<br>९) श्रेणी तक्ता | • सुलभक आशयातील सर्व घटकावर सविस्तर विवेचन करतील आणि चिंतनात्मक प्रश्न सुलभक प्रशिक्षणार्थी यांना विचारतील व प्रशिक्षणार्थी चर्चेत सहभागी होतील. | • मूल्यांकनात पहावयाच्या पुराव्यांमध्ये कोणकोणत्या बाबींचा समावेश असेल?<br>• मूल्यांकन क्षेत्रातील उपक्षेत्रे, पायाभूत, पूर्वतयारी, पूर्व माध्यमिक, माध्यमिक या स्तरांवर समान प्रमाणात लागू होईल का? |

◈◈◈

## ५. शाळा गुणवत्ता मूल्यांकन आणि आश्वासन आराखडा (SQAAF) : क्षेत्र क्र. १ ते ६

**अध्ययन निष्पत्ती :**

१) प्रशिक्षणार्थी क्षेत्रे, उपक्षेत्रे, मानके, चार स्तर, वर्णन विधाने, पुरावे, मार्गदर्शन तत्त्वे व धोरण यांची माहिती जाणून घेतात.

२) प्रशिक्षणार्थी क्षेत्रे क्र. १ मधील मानकांची वर्णन विधाने समजून घेतात.

३) प्रशिक्षणार्थी क्षेत्रे क्र. २ मधील मानकांची वर्णन विधाने समजून घेतात.

४) प्रशिक्षणार्थी क्षेत्रे क्र. ३ मधील मानकांची वर्णन विधाने समजून घेतात.

५) प्रशिक्षणार्थी क्षेत्रे क्र. ४ मधील मानकांची वर्णन विधाने समजून घेतात.

६) प्रशिक्षणार्थी क्षेत्रे क्र. ५ मधील मानकांची वर्णन विधाने समजून घेतात.

५) प्रशिक्षणार्थी क्षेत्रे क्र. ६ मधील मानकांची वर्णन विधाने समजून घेतात.

| उपघटक | आशय | सुलभक – प्रशिक्षणार्थी आंतरक्रिया | चिंतनात्मक प्रश्न |
|---|---|---|---|
| १) अभ्यासक्रम अध्यापन–शास्त्र आणि मूल्यमापन | १.१) अभ्यासक्रम नियोजन.<br>१.२) अध्ययन–अध्यापन प्रक्रिया आणि पर्यावरण पूरककृती जीवनशैलीशी सांगड.<br>१.३) कौशल्य आधारित/ व्यावसायिक शिक्षण कार्यक्रम<br>१.४) आरोग्य व शारीरिक शिक्षण<br>१.५) मूल्ये आणि नैतिकता : भारताचे ज्ञान<br>१.६) अध्ययन सक्षमीकरण कार्यक्रम<br>१.७) पूर्व बाल्यावस्था संगोपन व शिक्षण (ECCE)<br>१.८) पायाभूत साक्षरता आणि संख्याज्ञान (FLN) | • सुलभक प्रशिक्षणार्थ्यांशी अभ्यासक्रम, अध्यापनशास्त्र आणि मूल्यमापन या क्षेत्रातील सर्व ११ उपक्षेत्रांचे प्रारंभिक, प्रगतशील, प्रगत आणि प्रवीण या चार स्तरानुसार चर्चा करतील. | • शाळा एक नवकल्पनांचे केंद्र संकल्पना स्पष्ट करा.<br>• देश अथवा जगाचे ज्ञान अजमावण्यासाठी शाळा कोणते उपक्रम राबवते असे आपणांस वाटते ? |

| उपघटक | आशय | सुलभक – प्रशिक्षणार्थी आंतरक्रिया | चिंतनात्मक प्रश्न |
|---|---|---|---|
| | १.९) मानसिक आरोग्य, कल्याण (समृद्ध जीवन)आणि करिअरसाठी समुपदेशन.<br>१.१०) एकविसाव्या शतकातील अध्ययन कौशल्ये आणि माहिती कोशल्ये.<br>१.११) नागरिकत्व मूल्ये, संविधानातील मूल्ये | | |
| २) पायाभूत सुविधा | २.१) वर्गखोल्या, ग्रंथालय, प्रयोगशाळा व इतर खोल्या<br>२.२) मुख्याध्यापक कार्यालय, कर्मचारी कक्ष<br>२.३) आरोग्य सेवा आणि व्यवस्थापन<br>२.४) पाणी, स्वच्छता सुविधा आणि कचरा व्यवस्थापन<br>२.५) शालेय फर्निचर<br>२.६) आपत्ती व्यवस्थापन<br>२.७) पर्यावरणपूरक शाळा<br>२.८) क्रीडांगण व सुविधा<br>२.९) वसतिगृहे<br>२.१०) शाळा उपाहारगृह<br>२.११) आयसीटी पायाभूत सुविधा<br>२.१२) शाळाप्रवेश योग्यता | राष्ट्रीय शिक्षण धोरण–२०२० मधील अपेक्षांनुसार क्षमताधारित मूल्यांकन ही संकल्पना समजून घेतात. | • अध्ययन–अध्यापन प्रक्रियेमध्ये पाठ्यपुस्तकांमधील दिलेल्या संदर्भांपेक्षा नवीन संदर्भांचा समावेश कसा कराल?<br>• शिकण्याचा परिणाम आपण कसा अनुभवाल?<br>• क्षमताधारित मूल्यांकनाची गरज का आहे? |
| ३) मानव संसाधन आणि शालेय नेतृत्व | ३.१) शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी<br>३.२) अध्यापनशास्त्रीय नेतृत्व<br>३.३) सहयोगी नेतृत्व<br>३.४) गुणवत्ता व्यवस्थापनासाठी प्रणाली | • शिक्षक अथवा शिक्षकेतर कर्मचारी यांच्या पात्रता व संचमान्यता यांवर चर्चा केली जाते. | • शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांच्या कामाच्या मूल्यांकन करण्याच्या कोणत्या पद्धती उपलब्ध आहेत? |

| उपघटक | आशय | सुलभक – प्रशिक्षणार्थी आंतरक्रिया | चिंतनात्मक प्रश्न |
| --- | --- | --- | --- |
| | ३.५) शिक्षकांचा व्यावसायिक विकास | • सुलभक व प्रशिक्षणार्थी यांच्यात मूल्यांकन उद्‌बोधन आणि प्रशंसनीय कामाबद्दल असणारी पारितोषिके या विषयांवर चर्चा घडविली जाते. | |
| ४) समावेशित पद्‌धती आणि लिंगसमभाव | ४.१) अडथळामुक्त वातावरण (भौतिक दृष्टीने)<br>४.२) खेळ मनोरंजन सुविधा<br>४.३) वाहतूक सुविधा<br>४.४) अडथळ्यांवर मात<br>४.५) प्रतिभावान मुलांचे निरीक्षण आणि मार्गदर्शन<br>४.६) विशेष शिक्षक<br>४.७) शाळाबाह्य विद्यार्थी विरहित शाळा<br>४.८) बोलीभाषेमध्ये शैक्षणिक साहित्य<br>४.९) तपासणी शिबिर<br>४.१०) मुलींना समान संधी<br>४.११) विशेष समावेशक धोरण | • दिव्यांगांसाठीच्या योजना, मूल्यमापन पद्‌धती यांवर चर्चा घडवून आणली जाते.<br>• प्रतिभावान विद्यार्थ्यांसाठीचे उपक्रम चर्चेत आणले जातात.<br>• मुलींच्या शिक्षणासाठी शासकीय योजनांवर सविस्तर विवेचन केले जाते.<br>• सामाजिकदृष्ट्या वंचित व आर्थिकदृष्ट्या वंचित घटकांतील विद्यार्थ्यांच्या अध्ययन निष्पत्तीच्या सुधारणांवर चर्चा घडविली जाते. | • दिव्यांगांसाठी कोणकोणत्या भौतिक सुविधांची उपलब्धता करून देणे आवश्यक आहे, असे आपणांस वाटते?<br>• सामाजिक व आर्थिकदृष्ट्या वंचित घटकांच्या अध्ययन निष्पत्तीत सुधारणा झाल्याचे कोणत्या पुराव्यावरून समजू शकेल? |

| उपघटक | आशय | सुलभक – प्रशिक्षणार्थी आंतरक्रिया | चिंतनात्मक प्रश्न |
|---|---|---|---|
| ५) व्यवस्थापन सनियंत्रण आणि प्रशासन | ५.१) दृष्टी आणि ध्येय विधान<br>५.२) नियोजन यंत्रणा<br>५.३) प्रभावी समन्वय<br>५.४) संसाधन व्यवस्थापन<br>५.५) संबंध व्यवस्थापन<br>५.६) उपक्रमांचे व्यवस्थापन<br>५.७) माहिती व अभिलेखे; देखभाल व जतन<br>५.८) संप्रेषण प्रणाली<br>५.९) वित्तीय प्रशासन<br>५.१०)प्रवेशप्रक्रिया<br>५.११)गुणवत्ता आणि बदल व्यवस्थापनासाठी प्रणाली<br>५.१२)राष्ट्रीय/राज्य स्तरीय पोर्टलवर माहिती भरणे. | • दृष्टी आणि ध्येय विधान यातील फरक चर्चेद्‌वारा स्पष्ट केला जाईल.<br>• मानव संसाधनात समन्वयक साधण्यासाठी घ्यावयाची खबरदारी यावर चर्चा होईल.<br>• शालेय अभिलेखे, संप्रेषण प्रणाली, वित्तीय प्रशासन या घटकांवर चर्चा होईल.<br>• राष्ट्रीय/राज्य स्तरावरील शैक्षणिक पोर्टल संदर्भात चर्चा घडून येईल. | • शाळा, शालेय माहिती व अभिलेखाचे जतन करण्यासाठी कोणती प्रणाली वापरली जाऊ शकते?<br>• शैक्षणिक संप्रेषणासाठी शाळा स्तरावर कोणकोणत्या प्रणाली उपलब्ध असाव्यात?<br>• राज्य/राष्ट्रीय स्तरावर शैक्षणिक माहितीचे संकलनासाठी कोणकोणते पोर्टल उपलब्ध असल्याची आपणांस माहिती आहे? |
| ६) लाभार्थ्यांचे समाधान | ६.१) विद्यार्थ्यांचे समाधान<br>६.२) शिक्षकांचे समाधान<br>६.३) कर्मचारी वर्गाचे समाधान<br>६.४) मुख्याध्यापकांचे समाधान<br>६.५) माजी विद्यार्थी व पालकांचे समाधान<br>६.६) समाजाचे समाधान<br>६.७) व्यवस्थापनाचे समाधान | • विद्यार्थी समाधान तपासण्याच्या बाबींची चर्चा होईल.<br>• शिक्षकांचे समाधान कशात लपले आहे यावर चर्चा होईल.<br>• समाजाचे समाधान ठरवण्याच्या निकषांवर चर्चा होईल.<br>• व्यवस्थापनाचे समाधान घडेल तेव्हा काय घडले यांवर चर्चा होईल. | • माजी विद्यार्थी, पालक समाधान ठरवण्याचे निकष काय मिळू शकतील?<br>• समाजाचे आणि व्यवस्थापनाचे शैक्षणिक समाधान कशात लपले आहे? |

# ६. शाळा गुणवत्ता मूल्यांकन आणि आश्वासन आराखडा (SQAAF) : परिशिष्टे १ ते ८

## अध्ययन निष्पत्ती

१) प्रशिक्षणार्थी शाळा गुणवत्ता मूल्यांकन आणि आश्वासन आराखडा (SQAAF) अंमलबजावणी मार्गदर्शक तत्त्वे समजतात.

२) प्रशिक्षणार्थी अहवाल प्रपत्र समजून घेतात.

३) प्रशिक्षणार्थी मूल्यांकन पश्चात क्षेत्रनिहाय अपेक्षा समजून घेतात.

४) प्रशिक्षणार्थी शाळा सुधारणा/विकास योजनेसाठीचा आकृतिबंध समजून घेतात.

५) प्रशिक्षणार्थी शाळा सुरक्षितता – सर्वसमावेशक पडताळा सूची समजून घेतात.

६) प्रशिक्षणार्थी समावेशित अध्ययनासाठी शालेय सुरक्षिततेची मार्गदर्शक तत्त्वे समजून घेतात.

७) प्रशिक्षणार्थी शालेय सुरक्षा प्रतिज्ञा समजून घेतात.

८) प्रशिक्षणार्थी शिक्षक पालक संघाची रचना (PTA) समजून घेतात.

| उपघटक | आशय | सुलभक – प्रशिक्षणार्थी आंतरक्रिया | चिंतनात्मक प्रश्न |
|---|---|---|---|
| १) शाळा मूल्यांकन अंमल–बजावणीची मार्गदर्शक तत्त्वे. | १) शाळा मूल्यांकनपूर्व कृती.<br>२) शाळा मूल्यांकन दरम्यान कृती.<br>३) शाळा मूल्यांकन पश्च्यात कृती.<br>४) माहिती उपलब्धतेचे स्रोत.<br>• निरीक्षणे<br>• अनौपचारिक चर्चा<br>• मुलाखती<br>• दस्तऐवज<br>• बातम्या, ब्लॉग, वेबसाईट | • निर्धारक आणि शाळा यांचे दरम्यान मूल्यांकन पूर्व मूल्यांकन दरम्यान मूल्यांकन पश्चात घडणाऱ्या कृतींवर चर्चा होईल.<br>• शालेय माहिती संकलनासाठी वापरात आणल्या जाणाऱ्या साधनतंत्रांची माहिती व वापर यावर चर्चा घडवून आणली जाईल. | • शाळा मूल्यांकनापूर्वी निर्धारक आणि शाळा यांनी कोणत्या कृती करणे अपेक्षित आहे?<br>• प्रत्यक्ष मूल्यांकन दरम्यान कोणत्या बाबी घडणे आवश्यक आहे?<br>• शालेय माहिती संकलनासाठी कोणकोणत्या साधनतंत्रांचा वापर केला जाईल? |

| उपघटक | आशय | सुलभक – प्रशिक्षणार्थी आंतरक्रिया | चिंतनात्मक प्रश्न |
|---|---|---|---|
| २) मूल्यांकन अहवाल प्रपत्र | १) शाळेची मूलभूत माहिती<br>२) पट व उपस्थिती<br>३) मूल्यांकन पश्चात एकदंरीत वर्णनाची स्पष्ट करणारी क्षेत्रनिहाय विधाने. | • सुलभक पोर्टलवर स्वयंमूल्यांकन अहवाल भरणे यासाठीची माहिती निर्धारकाशी संवाद साधतील.<br>• पट आणि उपस्थितीची सारणी वर्गनिहाय, जातनिहाय व लिंगनिहाय माहिती भरणे यांबाबत चर्चा होईल. | • एकंदर मूल्यांकनामध्ये निर्धारकाने शाळेच्या नियोजनाचे पुढील मार्ग कशाच्या अनुषंगाने निश्चित करावेत? |
| ३) शाळा सुधार/ विकास योजनेसाठीचा आकृतिबंध | १) सद्य:स्थितीची पातळी<br>२) आकांक्षित पातळी<br>३) आवश्यक सुधारणा<br>४) सुधारणांचा प्राधान्यक्रम<br>५) प्रस्तावित योजना<br>६) प्रस्तावित योजना सुधारसाठी आवश्यक घटक<br>७) योजना पूर्ततेचा अपेक्षित दिनांक. | • आशयामध्ये सूचविलेल्या बिंदूवर अथवा मुद्द्यांवर चर्चा घडून येईल. | • आपल्या शाळेचा शाळा विकास योजनेचा आराखडा बनवताना केलेल्या बाबीचा विचार होईल? |
| ४) शाळा सुरक्षितता सर्वसमावेशक पडताळा सूची | १) शालेय सुरक्षा व संरक्षण कार्यक्रम<br>२) इमारत, क्रीडांगण आणि सुविधा<br>३) मनोसामाजिक सुरक्षा आणि समर्थन | • सुरक्षा आणि संरक्षण यामधील फरकांबाबत चर्चा होईल.<br>• सुरक्षेसाठी करावयाच्या विविध उपाय योजनांवर चर्चा घडून येईल. | • शालेय इमारत, क्रीडांगण इतर सुविधांमध्ये कोणकोणत्या बाबी लक्षात घेणे आवश्यक असते? |

| उपघटक | आशय | सुलभक – प्रशिक्षणार्थी आंतरक्रिया | चिंतनात्मक प्रश्न |
|---|---|---|---|
| | ४) आरोग्य व शारीरिक सुरक्षितता<br>५) शालेय वाहतूक<br>६) दिव्यांगांना आधार<br>७) सायबर सुरक्षा धोरण<br>८) उद्बोधन आणि प्रशिक्षण<br>९) शालेय सुरक्षा समिती रचना<br>१०) शालेय सुरक्षा प्रतिज्ञा | • सुरक्षेसाठी दर्शक फलकांची यादी बनवून घेतात.<br>• शालेय सुरक्षा समिती रचनेवर आणि बैठकांवर चर्चा करतात.<br>• शालेय सुरक्षा प्रतिज्ञेचे प्रात्यक्षिक घेतले जाईल. | • मनोसामाजिक सुरक्षा म्हणजे काय?<br>• सायबर सुरक्षा धोरणात कोणत्या बाबीचा समावेश होईल.<br>• शालेय वाहतुकीमध्ये सुरक्षेचे कोणते उपाय योजावेत, असे आपणास वाटते? |
| ५) समावेशित अध्ययनासाठी शालेय सुरक्षा याबाबत मार्गदर्शक तत्त्वे | १) सूचक दृष्टिकोन :<br>• विद्यार्थी मुलाखत<br>• गटकार्य<br>• निरीक्षण नोंदी<br>• विचार चिंतन कृती<br>२) मूल्यांकन | • शालेय भौतिक सुविधांच्या यादीवर व निकषांवर सविस्तर चर्चा होईल.<br>• प्रशिक्षणार्थ्यांना शालेय सुरक्षा याबाबत विचार चिंतन करण्यास सुलभक प्रवृत्त करतील. | • शालेय भौतिक सुविधांची मूल्यमापनासाठी कोणकोणती साधनतंत्रे वापरता येतील?<br>• शालेय सुरक्षा याबाबत विचार चिंतनशील मुद्दे कोणते ठरतील? |

# ७. क्षमता आधारित अध्ययन व अध्यापन प्रक्रिया

## अध्ययन निष्पत्ती

१) क्षमता आधारित अध्ययनाची संकल्पना समजून घेतात.

२) क्षमता आधारित अध्ययनाची तत्त्वे समजून घेतात.

३) क्षमता आधारित अध्ययन व प्रचलित अध्ययन यांतील फरक समजून घेतात.

४) विषयनिहाय क्षमता आधारित अध्ययन समजून घेऊन कृतीशी सांगड घालतात.

| उपघटक | आशय | सुलभक – प्रशिक्षणार्थी आंतरक्रिया | चिंतनात्मक प्रश्न |
|---|---|---|---|
| शिक्षणाच्या लक्ष्यांपासून अध्ययन निष्पत्तीपर्यंत | • शिक्षणाची लक्ष्ये अभ्यासक्रमाची ध्येये, क्षमता व अध्ययन निष्पत्ती सहसंबंध. | प्रशिक्षणार्थी सहसंबंध समजून घेतात. | |
| संकल्पना व्याख्या | • क्षमता आधारित अध्ययन– अध्यापनामुळे विद्यार्थ्यांच्या ज्ञान, कौशल्ये व दृष्टिकोन यांमध्ये होणारे बदल. | Knowledge, Skills, Attitude या घटकांचा विचार करून क्षमता ही संकल्पना समजून घेतात.<br>पायाभूत – Foundational<br>कार्यात्मक – Functional<br>व्यावसायिक – Professional<br>यावर चर्चा घडवून उदाहरणे लिहिली जातात. | • Value/Attitude कसे विकसित करता येईल?<br>• वैयक्तिक क्षमता (Personal) कोणत्या वर्गीकरणात येतील? |
| गरज व महत्त्व | • विद्यार्थ्यांनी शिकण्याच्या उद्दिष्टांची पूर्तता करण्याची अंतर्दृष्टी मिळवण्यासाठी मूल्यांकन. | सर्वंकष/समग्र विकासातील घटक/सर्वांगीण शिक्षण, बौद्धिक, सामाजिक, शारीरिक, नैतिक आणि भावनिक विकास होतो. | |
| क्षमता आधारित शिक्षण | • क्षमता आधारित अध्ययन व प्रचलित अध्ययन फरक. | पुढील मुद्द्यांच्या आधारे फरक समजून घेतात, चर्चा, संवाद.<br>• घोकंपट्टीकडून प्रत्यक्ष अनुभवावर भर. | • क्षमता आधारित कृती/घटक यासाठी Bloom's Taxonomy चा वापर करून क्षमतांचे वर्गीकरण कसे करता येईल? |

| उपघटक | आशय | सुलभक – प्रशिक्षणार्थी आंतरक्रिया | चिंतनात्मक प्रश्न |
|---|---|---|---|
| | | • शिकवण्यापेक्षा शिकण्यावर भर<br>• खंडित शिक्षणापेक्षा अखंडित शिक्षणावर भर<br>• ज्ञान, कौशल्ये, वृत्ती यांवर भर<br>• स्वतःच्या गतीने शिकण्यावर भर<br>• शिकण्याची कौशल्ये व आजन्म शिकण्याची वृत्ती वाढीस लागते. | |
| क्षमता आधारित अध्ययन कृती | • क्षमता विकसनासाठी विविध कृती, उपक्रम व कार्य. | पुढील मुद्द्यांच्या आधारे संवाद पद्धतीने समजून घेणे. क्षमता आधारित अध्ययन कसे घडते?<br>• अनुभवावर आधारित<br>• कृती आधारित<br>• चर्चात्मक/संवादात्मक<br>• विश्लेषणात्मक<br>• सर्जनशील विचार | • क्षमता आधारित अध्ययनासाठी वर्ग/शाळा पातळीवर कोणते उपक्रम राबविता येतील? |
| क्षमता आधारित अध्ययन–अध्यापन | • क्षमता आधारित अध्ययन – अध्यापन विषयनिहाय, स्तरनिहाय | विषयनिहाय/स्तरनिहाय प्रशिक्षणार्थी क्षमता आधारित अध्ययन–अध्यापन स्पष्ट करतात. | |
| समारोप | • महत्त्वाचे मुद्दे – संकलन | सुलभक मुद्द्यांचे संकलन होईल अशी चर्चा करून महत्त्वाचे मुद्दे फलकावर लिहितात. | • क्षमता आधारित अध्ययनासाठी शिक्षक म्हणून आपणास काय तयारी करावी लागेल? |

◈◈◈

## ८. क्षमता आधारित मूल्यांकन – संकल्पना

**अध्ययन निष्पत्ती :**

१) मूल्यमापन व मूल्यांकन यांमधील सहसंबंध समजून घेतात.

२) ध्येय, क्षमता, अध्ययन अनुभव, अध्यापनाची साधने, मूल्यांकन साधने, निकष, क्षमतावर्धक कृती ही रचना समजून घेतात.

३) क्षमताधारित मूल्यांकनाची गरज व हेतू समजून घेतात.

४) 'क्षमता' ही संकल्पना समजून घेतात.

५) विषयनिहाय क्षमता समजून घेतात.

६) क्षमताधारित शिक्षणाचे फायदे समजून घेतात.

| उपघटक | आशय | सुलभक – प्रशिक्षणार्थी आंतरक्रिया | चिंतनात्मक प्रश्न |
|---|---|---|---|
| क्षमता आधारित शिक्षण संकल्पना | • प्रस्तावना<br>• मूल्यमापन } फरक<br>• मूल्यांकन }<br>• क्षमता<br>• क्षमता आधारित मूल्यांकन | क्षमता आधारित मूल्यांकन ही संकल्पना समजून घेतात. | • विद्यार्थी नेमके काय शिकले याचे मापन कसे कराल?<br>• विद्यार्थ्यांची योग्यता म्हणजे काय?<br>• क्षमतेचा वास्तविक जीवनाशी संबंध कसा जोडता येईल?<br>• मूल्यमापन, मूल्यांकन क्षमता इ. बाबींमधील साम्य व भेद स्पष्ट करा. |
| क्षमता आधारित मूल्यांकनाची प्रक्रिया | • शिक्षणाचे लक्ष्य<br>• अभ्यासक्रमाचे ध्येय<br>• क्षमता<br>• अध्ययन निष्पत्ती | शिक्षणाचे लक्ष्य अध्यासक्रमाचे ध्येय, क्षमता व अध्ययन निष्पत्ती या आधारे क्षमता आधारित मूल्यांकनाची प्रक्रिया स्पष्ट करतात. | • सद्य:परिस्थितीतील मूल्यांकन प्रक्रिया व क्षमता आधारित मूल्यांकन प्रक्रिया यात काय फरक आहे? |

| उपघटक | आशय | सुलभक – प्रशिक्षणार्थी आंतरक्रिया | चिंतनात्मक प्रश्न |
|---|---|---|---|
| क्षमता आधारित मूल्यांकनाची उद्दिष्टे | • NEP-2020 च्या उद्दिष्टांनुसार मूल्यांकन पद्धतीत बदल घडवून आणणे.<br>• मूल्यांकन प्रक्रियेमधील चार मूलभूत घटक.<br>• गुणवत्ता सुधारणा प्रक्रियेचा महत्त्वाचा घटक. | मूल्यांकन प्रक्रियेतील मूलभूत घटक समजून घेतात. त्यानुसार CBA ची उद्दिष्टे स्पष्ट करतात. | • गुणवत्ता सुधारणेसाठी मूल्यांकनाची कोणती उद्दिष्टे महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात? |
| क्षमता आधारित मूल्यांकन गरज व महत्त्व,<br>क्षमता आधारित (CBA) संरचित दृष्टिकोन व वैशिष्ट्ये | • शैक्षणिक दृष्टिकोन आणि अनुभवांना पुनरुज्जीवित करणारी एक परिणामकारक प्रक्रिया<br>• अभ्यासक्रम व पाठ्यपुस्तकां-मधील दिलेल्या संदर्भाच्या पलीकडे जाणारे विस्तारित स्वरूप<br>• अध्ययनाचे परिणाम, क्षमता व उद्दिष्टांशी सुसंगत असणे. | राष्ट्रीय शिक्षण धोरण-२०२० मधील अपेक्षांनुसार क्षमताधारित मूल्यांकन ही संकल्पना समजून घेतात.<br>क्षमता आधारित मूल्यांकन परंपरागत आणि CBA मूल्यांकन यावर चर्चा करतात. | • अध्ययन-अध्यापन प्रक्रियेमध्ये पाठ्यपुस्तकांमधील दिलेल्या संदर्भांपेक्षा नवीन संदर्भाचा समावेश कसा कराल?<br>• अध्ययनाचा परिणाम आपण कसा अनुभवाल?<br>• क्षमताधारित मूल्यांकनाची गरज का आहे? |
| क्षमता आधारित शिक्षण व पारंपरिक शिक्षण यातील फरक | • नवीन विषयात प्रगती, सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन, विद्यार्थिकेंद्रित शिक्षण, एखाद्या विषयातील उच्च दर्जाची क्षमता/प्रभुत्व, जीवनकौशल्यांचा विकास, विद्यार्थी व शिक्षकांसाठी सूचना इ. मुद्दे लक्षात घेऊन क्षमताधारित शिक्षण व पारंपरिक शिक्षण यांमधील फरक | आशयातील दिलेल्या व याव्यतिरिक्त अन्य मुद्दे लक्षात घेऊन फरक स्पष्ट करतात. | • विद्यार्थ्यांना विविध कौशल्ये आत्मसात व्हावीत यासाठी कोणते नवीन बदल करावे लागतील?<br>• प्रचलित शिक्षणातून उच्च दर्जाची क्षमता साधता येईल का? |
| विविध अभ्यासक्रम क्षेत्रातील प्रमुख क्षमता | • विविध विषयांशी संबंधित कौशल्ये, ज्ञान व रचनाक्षेत्रे विशिष्ट क्षमतांच्या संचाद्वारे संप्रेषित करणे. | विविध विषयांतील क्षमता सोदाहरण स्पष्ट करतात. | • बहुभाषिक क्षमता येण्यासाठी आपण काय प्रयत्न कराल? |

| उपघटक | आशय | सुलभक – प्रशिक्षणार्थी आंतरक्रिया | चिंतनात्मक प्रश्न |
|---|---|---|---|
| | • भाषा, गणित, विज्ञान, सामाजिक शास्त्रे अशा विविध विषयांमधील क्षमता. | | • कविता किंवा लेख लिहिताना आपण काय विचार करतो?<br>• एखादे गृहीतक मांडून प्रयोगनिर्मिती करताना कोणत्या बाबींचा विचार करता येईल?<br>• सामाजिक सलोखा राखण्यासाठी कोणते प्रयत्न कराल?<br>• निरोगी जीवन जगण्यासाठी सभोवतालचे वातावरण कसे स्वच्छ ठेवाल? |
| मूल्यांकनाचे स्वरूप | • अध्ययनासाठी मूल्यांकन (Assessment for Learning)<br>• मूल्यांकनातून अध्ययन (Assessment as Learning)<br>• अध्ययनाचे मूल्यांकन (Assessment of Learning) | • सर्वांगीण विकासासाठी प्रगतीचे मूल्यांकन समजून घेतात.<br>• मूल्यांकनाचे विविध पैलू समजून घेतात. | • विद्यार्थ्यांच्या शिकण्याच्या प्रगतीत बदल होत आहे हे कसे ओळखाल?<br>• विद्यार्थ्यांसाठी ज्ञानाची संसाधने शोधण्यासाठी काय मदत कराल?<br>• मूल्यांकन अधिकृत करण्यासाठी काय कराल? |
| क्षमता आधारित मूल्यांकनाचे फायदे | • प्रभावी शिक्षण<br>• स्वगतीने काम करूनही कौशल्य विकास<br>• स्वविकास होण्यासाठी लागणारा कमीत कमी वेळ व साधनसामग्री | क्षमता आधारित मूल्यांकनाचे फायदे समजून घेतात. | • क्षमता आधारित मूल्यांकनामुळे कोणते फायदे होतील? |

◈◈◈

# ९. क्षमता आधारित मूल्यांकन कार्यनीती

**अध्ययन निष्पत्ती :**

१) क्षमता आधारित मूल्यांकनासाठीची कार्यपद्धती सांगता येते.

२) क्षमता आधारित मूल्यांकनाचे घटक सांगता येणे.

३) क्षमता आधारित मूल्यांकनाच्या प्रक्रियेतील टप्पे सांगता येणे.

४) क्षमता आधारित मूल्यांकनाची साधने व तंत्र सांगता येणे.

५) क्षमता आधारित मूल्यांकनाचे फायदे सांगता येणे.

| उपघटक | आशय | सुलभक – प्रशिक्षणार्थी आंतरक्रिया | चिंतनात्मक प्रश्न |
|---|---|---|---|
| १) क्षमता आधारित मूल्यांकना–साठीची कार्यपद्धती (२० मि.) | • क्षमतांची निश्चिती<br>• अध्ययन निष्पत्ती निश्चिती<br>• मूल्यांकनाचे निकष निश्चित करणे.<br>• मूल्यांकनाच्या पद्धतीची निवड.<br>• सप्रमाणतेची खात्री.<br>• सूचना सुस्पष्टपणे देणे.<br>• संमिश्र (ब्लेंडेड) पद्धतीचा वापर.<br>• प्रत्याभरण आणि अहवाल<br>• सातत्यपूर्ण सुधारणा | विद्यार्थ्यांमध्ये कोणत्या क्षमता विकसित होणे गरजेचे आहे यावर चर्चा होईल. मूल्यांकनाच्या विविध पद्धती कोणत्या यावर चर्चा होईल. मूल्यांकनासाठी वापरलेल्या साधनांचे अधिप्रमाणन यावर चर्चा होईल. | • क्षमता आधारित मूल्यांकनामध्ये योग्य साधनाची निवड ही महत्त्वाची बाब का आहे?<br>• क्षमता आधारित मूल्यांकनाचे निकष काय असतात?<br>• क्षमता आधारित मूल्यांकनात प्रत्याभरण आणि नोंदी महत्त्वाच्या का आहेत? |
| २) क्षमता आधारित मूल्यांकनाचे घटक (१५ मि.) | • सुस्पष्ट अध्ययन निष्पत्ती<br>• मूल्यांकनासाठी रुब्रिक्स व निकष<br>• यथार्थ मूल्यांकन<br>• आवर्ती मूल्यांकन | रुब्रिक्सचा वापर प्रभावीपणे कसा करता येईल यावर चर्चा होईल.<br>विशिष्ट साधन वापरल्यानंतर त्याच्या वेळोवेळी नोंदी करून ठेवणे का गरजेचे आहे यावर चर्चा होईल. | • क्षमता आधारित मूल्यांकनात निरंतर प्रत्याभरण देणे गरजेचे का आहे?<br>• क्षमता आधारित मूल्यांकनात विद्यार्थ्यांमधील व्यक्तिभेदानुसार काही बदल होईल का? |

| उपघटक | आशय | सुलभक – प्रशिक्षणार्थी आंतरक्रिया | चिंतनात्मक प्रश्न |
| --- | --- | --- | --- |
| | | | • क्षमता आधारित मूल्यांकनात विद्यार्थी स्वतःची बलस्थाने आणि मर्यादा ओळखू शकतील का? |
| ३) क्षमता आधारित मूल्यांकनाच्या प्रक्रियेतील टप्पे (२० मि.) | • स्वयंमूल्यांकन<br>• विद्यार्थ्यांचे वर्गातील मूल्यमापन<br>• विकासात्मक गरजांची ओळख<br>• प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष अध्ययन<br>• प्रत्यक्ष काम करताना (सहाध्यायी) अध्ययन<br>• वर्गाबाहेरील अध्ययन<br>• पुनर्मूल्यांकन | विद्यार्थ्यांचे वर्गातील मूल्यांकन कोणकोणत्या मार्गांनी करता येते यावर चर्चा होईल.<br>सहाध्यायी अध्ययन म्हणजे काय यावर चर्चा होईल.<br>पुनर्मूल्यांकनाची गरज का असते यावर चर्चा होईल. | • सहाध्यायी अध्ययन महत्त्वाचे का असते?<br>• (hands on training) प्रत्यक्ष अनुभवांची/कृतीची आवश्यकता का असते?<br>• स्वयंमूल्यमापन सगळ्यात प्रभावी पद्धत आहे असे तुम्हांला वाटते का?<br>• अध्ययन पूर्ण झाल्यानंतर पुनर्मूल्यांकन महत्त्वाचे का असते?<br>• वर्गाबाहेर अध्ययनाच्या कोणत्या संधी उपलब्ध असतात? |
| ४) क्षमता आधारित मूल्यांकनाची साधने व तंत्रे (२० मि.) | • स्वयंमूल्यांकन प्रश्नावली (Self-evaluation Questionnaire)<br>• प्रत्याभरण सर्वेक्षण (Feedback Survey)<br>• कौशल्य चाचणी (Skills test)<br>• क्षमता आधारित मुलाखती (Competency-based interviews)<br>• कौशल्यातील अंतराचे विश्लेषण (Skills gap analysis) | मूल्यांकनाची संख्यात्मक साधने (लेखी परीक्षा, तोंडी परीक्षा, प्रात्यक्षिक चर्चा यांवर चर्चा होईल.<br>• निरीक्षण तंत्र : (पडताळा सूची, पदनिश्चयन श्रेणी, प्रासंगिक नोंदी, संकलित नोंद पुस्तक इत्यादी.)<br>• आत्मनिरीक्षण तंत्र समस्यासूची, अभिरुची प्रश्नावली, मुलाखत. | • याव्यतिरिक्त कोणती साधने वर्गाध्यापनात वापरता येतील?<br>• क्षमता आधारित मुलाखतीत कोणत्या प्रश्नांचा समावेश असेल?<br>• विषयानुसार कौशल्य चाचण्यांमध्ये कोणत्या बाबींचा समावेश होईल?<br>• मुलाखत हे तंत्र वापरताना काय काळजी घ्यायला हवी? |

| उपघटक | आशय | सुलभक – प्रशिक्षणार्थी आंतरक्रिया | चिंतनात्मक प्रश्न |
|---|---|---|---|
| | • मानसशास्त्रीय चाचण्या (Psychometric tests)<br>• ई –पोर्टफोलिओ (E-portfolios)<br>• अभिरूप आणि आभासी प्रयोगशाळा (Simulations and virtual labs) | • प्रक्षेपण तंत्र, वाक्यपूर्ती, गोष्ट पूर्ण करा, चित्रवाचन इत्यादी समाजमिती तंत्र.<br>या गुणात्मक साधनांवर चर्चा होईल. | • अभिरूप आणि आभासी प्रयोगशाळा कोणत्या विषयांसाठी प्रामुख्याने वापरल्या जातील? |
| ५) क्षमता आधारित मूल्यांकनाचे फायदे (१५ मि.) | • व्यक्तिविशिष्ट शिक्षण<br>• सुस्पष्ट अपेक्षा<br>• लवचीकता<br>• अध्ययनाचा प्रशस्त मार्ग<br>• निष्पक्षता आणि समानता<br>• वास्तव जगाची पूर्वतयारी<br>• सातत्यपूर्ण प्रत्याभरण आणि सुधारणा | अध्ययन–अध्यापन प्रक्रियेव्यतिरिक्त या पद्धतीचा वापर कोठे करता येईल? यावर चर्चा होईल. | • क्षमता आधारित मूल्यांकनात व्यक्तिविशिष्ट मूल्यांकन होते का?<br>• क्षमता आधारित मूल्यांकन अध्ययन–अध्यापन प्रक्रियेला दिशादर्शक ठरते असे तुम्हांला वाटते का?<br>• क्षमता आधारित मूल्यांकनात कोणकोणत्या बाबतीत लवचीकता आहे?<br>• सातत्यपूर्ण प्रत्याभरण आणि सुधारणा यांचा विद्यार्थ्यांना कशा प्रकारे फायदा होतो? |

# १०. क्षमता आधारित प्रश्न प्रकार

## अध्ययन निष्पत्ती

१) प्रश्नांचे प्रकार सांगता येणे.

२) प्रत्येक प्रश्न प्रकाराचा उपयोग व उद्देश स्पष्ट करता येणे.

३) प्रश्न विचारण्याच्या तंत्रांची मूलभूत माहिती सांगता येणे.

४) अध्ययन–अध्यापनात अध्ययन निष्पत्ती (Learning Outcomes) साध्य करण्यासाठी अचूक प्रश्न प्रकारांचा वापर करता येणे.

| उपघटक | आशय | सुलभक – प्रशिक्षणार्थी आंतरक्रिया | चिंतनात्मक प्रश्न |
|---|---|---|---|
| मूल्यांकनासाठी प्रश्ननिर्मिती | मूल्यांकनासाठी प्रश्ननिर्मिती करण्यापूर्वी शिक्षकाने पुढील गोष्टी लक्षता ठेवाव्यात.<br>• प्रश्न विचारप्रवर्तक असावेत.<br>• प्रश्न अतिसुलभ नसावेत, तसेच फार कठीण व गुंतागुंतीचेही नसावेत.<br>• प्रश्न संमिश्र स्वरूपाचे नसावेत. उदा. खडकांचे प्रकार किती व कोणते?<br>• प्रश्न निःसंदिग्ध व निश्चित स्वरूपाचे असावेत.<br>• प्रश्न सूचक नसावेत. (उदा. तुतारी ही कविता केशवसुतांनी लिहिली की, गोविंदाग्रजांनी?)<br>• हो/किंवा नाही अशी उत्तरे येणारे प्रश्न नसावेत. माहिती दिल्याबरोबर लगेचच त्याच मुद्द्यांवर आधारित प्रश्न विचारू नये.<br>• प्रश्नांची रचना सुबोध व नेमक्या शब्दांत असावी. त्यात केवळ पुस्तकी किंवा अलंकारिक भाषेचा किंवा अनावश्यक शब्दांचा वापर करू नये. ज्याप्रमाणे प्रश्न कसे असावेत हे आपण पाहिले, त्याच प्रमाणे प्रश्न कसे विचारावेत, हेही महत्त्वाचे आहे. | सुलभक प्रशिक्षणार्थ्यांना मूल्यांकनासाठी प्रश्ननिर्मिती करण्याबाबत कोणकोणत्या दक्षता घ्याव्यात, कोणकोणत्या बाबी लक्षात घ्याव्यात याबद्दल चर्चा करतात. | प्रश्न कसे नसावेत असे तुम्हांला वाटते याबद्दल चर्चा करा. |

| उपघटक | आशय | सुलभक – प्रशिक्षणार्थी आंतरक्रिया | चिंतनात्मक प्रश्न |
|---|---|---|---|
| | • प्रश्न सर्व वर्गाला ऐकू जाईल अशा रीतीने, सावकाश व स्पष्टपणे विचारावा. प्रश्नाचा वारंवार पुनरुच्चार करू नये. वर्गातील सर्व विद्यार्थ्यांना प्रश्न विचारावेत. तयार केलेले प्रश्न खाली नमूद केलेल्या तीन गुणांनीयुक्त असावेत.<br>१) प्रश्न प्रमाणित असावेत म्हणजेच ज्याचे मापन करायचे त्याचेच मापन करणारे हवेत.<br>२) प्रश्न विश्वसनीय असावेत म्हणजेच अनेक शिक्षकांनी तो प्रश्न अनेक विद्यार्थ्यांना विचारला तरी त्या उत्तरांचा आशय एकच असेल.<br>३) प्रश्नात वस्तुनिष्ठता असावी. म्हणजे भिन्न व्यक्तींनी एकच प्रश्न विचारला तरी त्याचे एक आणि एकच बरोबर उत्तर येईल. गुणांकन करताना व्यक्तिनिष्ठतेला वाव नसेल. | | |
| **प्रश्न प्रकार**<br>निबंधवजा–दीर्घोत्तरी (निबंध, कल्पनाविस्तार, पत्रलेखन, स्वअभिव्यक्ती) | या प्रश्न प्रकारांचे फायदे खालील प्रमाणे आहेत.<br>• विद्यार्थ्याला स्वतःचे विचार तर्कशुद्धपणे व्यक्त करता येतात.<br>• कल्पनाविस्तार करता येतो.<br>• विद्यार्थ्याला अभ्यास करण्याची सवय लागते.<br>• स्वतःचे मत मांडण्याची संधी मिळते लेखनशैलीच्या विकासाला वाव मिळतो. | सुलभक प्रशिक्षणार्थ्यांना निबंधवजा प्रश्नातील व दीर्घोत्तरी प्रश्नांमध्ये पत्रलेखन व कल्पना–विस्तार या बाबींचा समावेश होण्याबाबत चर्चा करतात. | प्रश्नांची सुरुवात काय, कोण, केव्हा अशा शब्दांनी करू नये याबाबत तुम्हांला काय वाटते? |

| उपघटक | आशय | सुलभक – प्रशिक्षणार्थी आंतरक्रिया | चिंतनात्मक प्रश्न |
| --- | --- | --- | --- |
| | • प्रश्नपत्रिका तयार करण्यास सोपी होते.<br>• योग्य अध्ययन सवयींना उत्तेजन मिळते. | | |
| लघुत्तरी (व्याख्या, शास्त्रीय कारणे, टीपा लिहा.) | • प्रश्नांची संख्या वाढविता येते.<br>• पाठ्यपुस्तकातील जास्तीत जास्त धड्यावर प्रश्न विचारता येतात.<br>• उत्तरातील संदिग्धता कमी होते, त्यामुळे मूल्यांकनात वस्तुनिष्ठता येते. | सुलभक प्रशिक्षणार्थ्यांना लघुत्तरी प्रश्नामुळे मूल्यांकनात वस्तुनिष्ठता येते, याबाबत चर्चा करतात. | |
| वस्तुनिष्ठ | • प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात एक–दोन शब्दांत देता येतात, त्यामुळे संपूर्ण अभ्यासक्रमावर आधारित प्रश्न विचारता येतात.<br>• विद्यार्थ्यांना सर्व धड्यांचा अभ्यास करावा लागतो.<br>• या प्रश्नांची उत्तरे निश्चित ठरविता येतात. एकच पेपर निरनिराळ्या परीक्षकांनी तपासला तरी गुणात फरक पडत नाही म्हणून परीक्षा विश्वसनीय ठरते. | वस्तुनिष्ठ प्रश्नांची उत्तरे निश्चित असलेल्या विद्यार्थ्यांच्या मूल्यमापनात व्यक्तिनिष्ठता येत नाही याबाबत सुलभक प्रशिक्षणार्थ्यांशी चर्चा करतात. | |
| **प्रश्नांचे प्रकार** | | | |
| १) मुक्त प्रकारचे प्रश्न (Open Ended Questions) | • यामध्ये उत्तर खुल्या स्वरूपाचे असते. उत्तर देणाऱ्या व्यक्तीला त्याच्या विचारांची मोकळीक दिली जाते.<br>**उदाहरण :** तुम्हांला शिक्षणामध्ये काय बदल अपेक्षित आहेत?<br>उत्तरासाठी अधिक विचार आवश्यक असतो. सखोल चर्चा, कल्पनाशक्ती आणि मुद्दे मांडण्यासाठी असे प्रश्न उपयुक्त आहेत. | सुलभक प्रशिणार्थ्यांना विविध प्रश्न विचारतात. प्रशिक्षणार्थी आपल्या पूर्वानुभवावरून प्रश्न प्रकार ओळखतात. | प्रश्न का विचारायचे असतात?<br>प्रश्न पडणे ही बाब कशी आहे?<br>अ) विचाराधीन<br>ब) कृत्रिम<br>क) नैसर्गिक |

| उपघटक | आशय | सुलभक – प्रशिक्षणार्थी आंतरक्रिया | चिंतनात्मक प्रश्न |
|---|---|---|---|
| | • अभ्यास, संशोधन किंवा मुलाखतींमध्ये अशा प्रश्नांमुळे एखाद्या विषयाचे सखोल विश्लेषण शक्य होते. | | |
| २) बद्ध प्रकारचे प्रश्न (Closed Ended Questions) | • उत्तर निश्चित स्वरूपाचे असते. (हो/नाही, संख्यात्मक किंवा एक विशिष्ट निवड)<br>**उदाहरण** : तुम्हांला वाचनाची आवड आहे का?<br>• जलद उत्तर मिळते. मत, सर्वेक्षणे, चाचण्या किंवा ठोस माहिती गोळा करण्यासाठी उपयुक्त आहे.<br>• प्रश्नमालिका या जलद उत्तर देण्यासाठी व विशिष्ट माहिती गोळा करण्यासाठी वापरतात.<br>**उदा.** दोन पर्यायांतून उत्तर शोधणे (होय/नाही, सत्य/असत्य, चूक/बरोबर)जोड्या लावा, बहुपर्यायातून उत्तर शोधणे. (उत्तर शोधणे, अपूर्ण विधान पूर्ण करणे.) | सुलभक प्रशिक्षणार्थ्यांना बद्ध प्रकारच्या प्रश्नांचे स्वरूप व त्याबद्दलचे उदाहरण यावर चर्चा घडवून आणतात. | प्रश्न करणे/विचारणे ही बाब कशी आहे?<br>अ) विचाराधीन<br>ब) कृत्रिम<br>क) नैसर्गिक |
| ३) आवर्ती प्रश्न (Recuring Questions) | • या प्रश्नांमध्ये उत्तराला विशिष्ट दिशेने नेले जाते. उत्तरांवर सूचक प्रभाव पडतो.<br>• प्रश्न विशिष्ट प्रतिक्रिया मिळवण्यासाठी विचारले जातात. मत तयार करणे किंवा निश्चित मुद्द्यांवर चर्चा करणे.<br>• एखादी संकल्पना विद्यार्थ्याला कळली आहे का नाही हे शिक्षकाला कळण्यासाठी विद्यार्थ्याला पुन्हा पुन्हा | सुलभक प्रशिक्षणार्थ्यांना प्रश्न विचारून उत्तराच्या विशिष्ट दिशेने नेण्यासाठी प्रोत्साहित करतात. विशिष्ट प्रतिक्रिया मिळवण्यासाठी प्रश्न विचारतात. | विद्यार्थ्यांचे मूल्यमापन करताना शिक्षक विद्यार्थ्यांसाठी आवर्ती प्रश्नांचा वापरतात का? |

| उपघटक | आशय | सुलभक – प्रशिक्षणार्थी आंतरक्रिया | चिंतनात्मक प्रश्न |
| --- | --- | --- | --- |
| | प्रश्न विचारले जातात. उदा. घनाचे घनफळ काढण्याचे सूत्र काय? हे प्रश्न विद्यार्थ्याला विचारायला गेला आणि त्याला प्रश्नाचे उत्तर जर सांगता आले नाही तर शिक्षक काय काय प्रश्न विचारू शकतात आणि विद्यार्थ्याला उत्तरापर्यंत आणतात.<br>१) 'घन' ही द्विमितीय आकृती आहे का त्रिमितीय?<br>२) घनाच्या मिती कोणत्या?<br>३) घनाच्या मितींबद्दल तुम्हांला काय माहीत आहे?<br>४) घनाचे प्रत्येक पृष्ठ कोणत्या आकाराचे असते?<br>५) चौरसाच्या क्षेत्रफळाचे सूत्र सांगा.<br>६) घनफळ म्हणजे काय?<br>७) घनाच्या घनफळाचे सूत्र सांगा. | | |
| ४) स्वनिर्मितीला चालना देणारे प्रश्न | • या प्रश्नांमध्ये विद्यार्थी स्वतः उदाहरणे तयार करू शकतात. एकच उत्तर येणारे अनेक प्रश्न ते तयार करू शकतात.<br>• एकापेक्षा अनेक संकल्पनांचा वापर करू शकतात. त्यांच्या विचारांना येथे मर्यादा घातली जात नाही. | विद्यार्थ्यांना उत्तर लिहिण्यासाठी पाठांतराचा उपयोग न होता विद्यार्थी वेगवेगळे विचार कसे करतील ते बघण्यासाठी प्रश्नांची निर्मिती कशी गेली पाहिजे यावर चर्चा करतील. | |
| ५) विषयानुरूप गप्पा (गणितीय गप्पा) Maths talk) | • विद्यार्थ्यांना एखादे चित्र देऊन त्याचे गणित भाषेत वर्णन करण्यास सांगणे. एखादी वस्तू देऊन त्याबद्दल मॅथेमॅटिकल स्पष्टीकरण देण्यास सांगणे. | विद्यार्थ्यांपुढे एखादे चित्र किंवा एखादा प्रसंग उभा केला असता विद्यार्थी विषयानुरूप त्या | |

| उपघटक | आशय | सुलभक – प्रशिक्षणार्थी आंतरक्रिया | चिंतनात्मक प्रश्न |
|---|---|---|---|
| | • व्यवहारातील कोणत्याही गोष्टीमध्ये कोणते गणित दडलेले आहे याचे वर्णन करणे. एखादी संकल्पना वर्गात सर्वांसमोर स्पष्ट करणे. फायदे – गणिताची भीती कमी होते.<br>• गणिताची जी भाषा आहे ती भाषा परिचित होण्यास मदत होते.<br>• वेगवेगळ्या गोष्टीत लपलेले गणित शोधण्याचा दृष्टिकोन विकसित होतो. | चित्राकडे कसे बघतील? त्या चित्रातून त्या विषयाबद्दल चे ज्ञान, माहिती कशी मिळवतील? या संदर्भात चर्चा घडवून आणतील. | |
| **प्रश्नांचे स्तर** | | | |
| १) निम्नस्तर प्रश्न | • ज्या प्रश्नांचे उत्तर केवळ स्मरणाच्या आधारे यांत्रिकपणे दिले जाते.<br>• LOT ही मूलभूत कौशल्ये आहेत जी विद्यार्थ्यांना उच्चस्तरीय विचार कौशल्ये (HOT) पर्यंत पोहोचण्यापूर्वी आत्मसात करणे आवश्यक आहे. | सुलभक प्रशिक्षणार्थ्यांना मूलभूत कौशल्यांकडून उच्चस्तरीय विचार कौशल्ये (HOT) पर्यंत पोहोचण्यासाठी माहिती सांगतात. | |
| २) उच्चस्तरीय प्रश्न | • या प्रश्नाचे उत्तर देताना विद्यार्थ्याला ज्ञानाचे पृथक्करण करणे, कार्यकारणभाव शोधणे, संकलन करणे अशा उच्च प्रतीच्या क्रिया विचार करून कराव्या लागतात.<br>• उच्चस्तरीय विचार कौशल्ये प्रश्न (HOT) म्हणजे अशी विचारप्रक्रिया जी माहितीच्या केवळ पाठांतर किंवा समजुतीच्या पलीकडे जाऊन तिचा विश्लेषण, मूल्यमापन आणि सर्जनशीलतेने उपयोग करण्यावर भर देते.<br>• या कौशल्यांमुळे विद्यार्थ्यांना माहितीला व्यवस्थितपणे हाताळणे, समस्यांचे समाधान करणे, निर्णय घेणे आणि नवकल्पना करणे शक्य होते. | सुलभक प्रशिक्षणार्थ्यांना विश्लेषण, मूल्यमापन आणि सर्जनशीलतेने उपयोग करण्यावर भर देण्याबाबत माहिती सांगतात. | |

<table>
<tr><th>उपघटक</th><th>आशय</th><th>सुलभक – प्रशिक्षणार्थी आंतरक्रिया</th><th>चिंतनात्मक प्रश्न</th></tr>
<tr><td>३) पुस्तकासह चाचणी</td><td>• प्रश्नाचे स्वरूप व रचना अशी असते. की विद्यार्थी निश्चित केलेल्या वेळेत संबंधित संदर्भ साहित्याच्या पुरेपूर वापर करून प्रश्नांची उत्तरे सोडवणे अपेक्षित असते.<br>• विद्यार्थी केंद्रीत असते. आकलनावर भर असतो. समीक्षात्मक दृष्टीचा विकास होतो. ताणविरहित मूल्यमापन असते. संदर्भ पुस्तकांचे वाचन होते.<br>• वाचनाची आवड निर्माण होते. मूल्यमापनात सहजता येते. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात पोषक असते. स्वयंअध्ययनास प्रेरणा मिळते. भीती वाटत नाही. सर्जनशीलता वाढीस लागते.<br>• प्रगती करण्याची संधी असते. विद्यार्थी स्वावलंबी बनण्यास मदत होते. कमी वेळेत स्वतःचे मत मांडण्याचे स्वातंत्र्य असते.</td><td>सुलभक प्रशिक्षणार्थ्यांबरोबर पुस्तकासह चाचणी कशी घ्यावी? कोणती काळजी घेतली गेली पाहिजे? त्यासाठीची प्रश्न निर्मिती कशी असली पाहिजे याविषयी चर्चा करतील.</td><td></td></tr>
<tr><td colspan="4">राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० (NEP 2020) नुसार विद्यार्थ्यांचे ज्ञान, कौशल्य आणि सर्जनशीलता विकसित करण्यासाठी विचारलेल्या प्रश्नांचे प्रकार पुढीलप्रमाणे आहेत. प्रत्येक स्तरासाठी प्रश्न तयार करण्याचे काही नमुने दिले आहेत. याचा वापर करून विद्यार्थ्यांच्या ज्ञानाची, समजून घेण्याची, आणि विचार करण्याची क्षमता विकसित केली जाऊ शकते.</td></tr>
<tr><td>१) ज्ञान आधारित प्रश्न (Knowledge based Questions)</td><td>• हे प्रश्न मूलभूत माहिती तपासण्यासाठी असतात.<br>.............. म्हणजे काय?<br>.............. चे उदाहरण सांगा.<br>.............. च्या घटकांची यादी करा. व्याख्या लिहा.<br>उदाहरण : पंचायत म्हणजे काय?</td><td>• सुलभक प्रशिक्षणार्थ्यांना विविध प्रश्न विचारतात. प्रशिक्षणार्थी आपल्या पूर्वानुभवावरून प्रश्न प्रकार ओळखतात.</td><td>प्रश्न का विचारायचे असतात?</td></tr>
</table>

| उपघटक | आशय | सुलभक – प्रशिक्षणार्थी आंतरक्रिया | चिंतनात्मक प्रश्न |
|---|---|---|---|
| | | • प्रश्नांचे प्रकार ओळखणे. प्रत्येक प्रश्नाच्या प्रकाराचा उपयोग व उद्देश स्पष्ट करता येणे. प्रश्न विचारण्याच्या तंत्रांची मूलभूत माहिती मिळविणे. | |
| २) आकलनावर आधारित प्रश्न (Understanding based Questions) | • विद्यार्थ्यांची विषयाची समज तपासण्यासाठी हे प्रश्न विचारले जातात. विद्यार्थ्यांना संकल्पना समजली आहे की नाही हे तपासणे.<br>• **प्रश्न तयार करण्याची पद्धत :**<br>तुम्ही ...... कसे स्पष्ट कराल?<br>.......... चा अर्थ सांगून दाखवा.<br>......... च्या उपयोगाचा उलगडा करा.<br>**उदाहरण :** लोकशाहीचा अर्थ स्पष्ट करा. | • सुलभक प्रशिक्षणार्थ्यांना प्रश्नांच्या स्वरूपाचा व उपयोगाचा अर्थ समजावून सांगतात.<br>• प्रश्नाचे विश्लेषण करून त्यांचा सहसंबंध उद्दिष्टांशी जोडतात. प्रश्नांच्या स्वरूपाचा व उपयोगाचा अर्थ समजून घेणे.<br>• वेगवेगळ्या शैक्षणिक व सामाजिक परिस्थितीत योग्य प्रश्नांचा वापर कसा करावा. याबद्दल माहिती सांगणे. प्रश्नाचे विश्लेषण करून त्यांचा सहसंबंध उद्दिष्टांशी–जोडता येणे. | आशयाचे आकलन होण्यासाठी काय करावे, चर्चा करा? |

| उपघटक | आशय | सुलभक – प्रशिक्षणार्थी आंतरक्रिया | चिंतनात्मक प्रश्न |
|---|---|---|---|
| ३) उपयोजन–आधारित प्रश्न (Application based Questions) | • विद्यार्थ्याने शिकलेल्या संकल्पना प्रत्यक्ष जीवनात ते कशी वापरतात हे तपासण्यासाठी विद्यार्थ्यांनी शिकलेल्या ज्ञानाचा वापर रोजच्या जीवनात कसा करावा हे पाहणे.<br>• **प्रश्न तयार करण्याची पद्धत :**<br>तुम्ही .......... कसा वापराल?<br>.......... समस्येचे समाधान कसे कराल?<br>......... चा उपयोग दाखवा.<br>**उदाहरण :** चौकटीतून मिळालेल्या आकडेवारीचा वापर करून आलेख तयार करा. | • सुलभक प्रशिक्षणार्थ्यांना संवाद प्रभावी होण्यासाठी योग्य प्रश्न विचारतात. प्रश्न तयार करून विविध शैक्षणिक व व्यावसायिक परिस्थितींमध्ये त्यांचा उपयोग करता येणे.<br>• वाद–विवाद, चर्चासत्र, मुलाखत, किंवा चाचण्यांसाठी प्रश्नांची निर्मिती करता येणे. संवाद प्रभावी होण्यासाठी योग्य प्रश्न विचारता येणे. | आशयाचे आकलन होण्यासाठी प्रश्नांचे स्वरूप कसे असावे? |
| ४) विश्लेषणात्मक प्रश्न (Analytical Questions) | • **ध्येय :** विद्यार्थ्यांची विचारशक्ती आणि तार्किक क्षमता वाढवणे.<br>• **प्रश्न तयार करण्याची पद्धत :**<br>........ चे घटक कसे वेगळे कराल?<br>....... च्या मुख्य कारणांचा शोध घ्या.<br>........ च्या घटकांमध्ये साम्य आणि भेद ओळखा.<br>**उदाहरण :** ग्रामीण आणि शहरी जीवनात काय फरक आहे? | • सुलभक प्रशिक्षणार्थ्यांना उद्दिष्टांनुसार त्यांचे विश्लेषण करण्यासाठी नमुना प्रश्न देतात.<br>• दिलेल्या प्रश्नांचा प्रकार ओळखणे व त्यांच्या उद्दिष्टांनुसार त्यांचे विश्लेषण करता येणे. | विश्लेषणात्मक प्रश्न प्रकारातून मुलांपर्यंत असे कसा पोहोचल्या जाईल? |

| उपघटक | आशय | सुलभक – प्रशिक्षणार्थी आंतरक्रिया | चिंतनात्मक प्रश्न |
|---|---|---|---|
| | | • प्रश्न निर्मितीच्या प्रकारांचा वापर करणे योग्य आहे का, हे तपासता येणे.<br>• वेगवेगळ्या प्रश्नांच्या प्रकारांचे फायदे आणि मर्यादा स्पष्ट करता येणे. | |
| ५) सर्जनशीलता आधारित प्रश्न (Cerativity-based Questions) | • विद्यार्थ्यांची सर्जनशीलता तपासण्यासाठी.<br>• **प्रश्न तयार करण्याची पद्धत :**<br>• ........ साठी नवीन उपाय योजना सुचवा.'<br><br>....... वर एखादी गोष्ट तयार करा.<br>......... संदर्भात एखादी कथा तयार करा.<br>**उदाहरण :** वायू प्रदूषण कमी करण्यासाठी उपाययोजना सुचवा. | • सुलभक प्रशिक्षणार्थ्यांना अध्ययन प्रक्रियेसाठी उत्सुकता वाढवणारे व सखोल विचारास प्रवृत्त करून नवनिर्मिती साध्य होण्यासाठी चर्चा घडवून आणतात.<br>• नावीन्यपूर्ण व विषयानुसार प्रश्न तयार करता येणे. समस्या सोडवण्यासाठी किंवा नवीन कल्पना शोधण्यासाठी उपयुक्त प्रश्न तयार करता येणे.<br>• अध्ययन प्रक्रियेसाठी उत्सुकता वाढवणारे व सखोल विचारास | विद्यार्थ्यांची जिज्ञासा वाढवण्यासाठी प्रश्नांचे स्वरूप कसे असावे चर्चा करावे? |

| उपघटक | आशय | सुलभक – प्रशिक्षणार्थी आंतरक्रिया | चिंतनात्मक प्रश्न |
|---|---|---|---|
| | | प्रवृत्त करणारे प्रश्न तयार करता येणे.<br>**ध्येय :** विद्यार्थ्यांना कल्पकतेने नवीन माहिती तयार करण्यास प्रवृत्त करणे. | |
| ६) तर्काधिष्ठित आधारित प्रश्न (Reasoning beased Questions) | • विद्यार्थ्यांच्या तार्किक विचारांची क्षमता तपासण्यासाठी.<br>• **प्रश्न तयार करण्याची पद्धत :**<br>........ योग्य आहे का? का?<br>........ चे फायदे आणि तोटे सांगून निर्णय घ्या.<br>......... बद्दल तुमचे मत द्या.<br>**उदाहरण :** जैविक शेतीचा उपयोग करताना येणाऱ्या अडचणींचा विचार करा आणि त्यावर भाष्य करा. | • सुलभक प्रशिक्षणार्थ्यांना अध्ययन प्रक्रियेतील अध्ययन अनुभवातून योग्य प्रश्न निवडण्याचे कौशल्य प्राप्त करणेबाबत माहिती सांगतात.<br>• विविध परिस्थितीत प्रसंगानुरूप प्रश्न विचारण्याचे प्रभावी तंत्र विकसित करता येणे.<br>• उत्तरांची गुणवत्ता व प्रश्नांचे उद्दिष्ट यावर आधारित त्यांचे मूल्यांकन करता येणे.<br>• अध्ययन प्रक्रियेतील अध्ययन अनुभवातून योग्य प्रश्न निवडण्याचे कौशल्य प्राप्त करणे. | मूल्यमापनातील कोणत्या प्रश्नांचा प्रकार प्रभावी ठरतो? |

| उपघटक | आशय | सुलभक – प्रशिक्षणार्थी आंतरक्रिया | चिंतनात्मक प्रश्न |
| --- | --- | --- | --- |
| | | • बहुपर्यायी प्रश्न तयार करताना विकल्प देताना ते कसे असावेत आणि कसे नसावेत याबद्दल चर्चा घडवून आणतील. | |
| ७) बहुविध निवडीचे प्रश्न (Multiple Choice Questions MCQs) | • विद्यार्थ्यांच्या विचारक्षमता तात्काळ तपासण्यासाठी.<br>**उदाहरण :**<br>शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक कुठे पार पडला?<br>१) शिवनेरी<br>२) राजगड<br>३) रायगड<br>४) प्रतापगड | • बहुपर्यायी प्रश्नांची रचना करताना प्रश्न कशाप्रकारे विचारला गेला पाहिजे याविषयी चर्चा घडवून आणतील. | |
| ८) समस्यांवर आधारित प्रश्न (Problem-based Questions) | • विशेषकरून गणित व विज्ञान विषयांमध्ये समस्या सोडवण्यासाठी.<br>**उदाहरण :**<br>१० टनांची क्षमता असणाऱ्या मालवाहू ट्रकमध्ये A आणि B अशा दोन विशिष्ट वजनाच्या पेट्या भरलेल्या आहेत जर A प्रकारच्या १५० पेट्या व B प्रकारच्या १०० पेट्या भरल्या तर ट्रकची १० टनांची क्षमता पूर्ण होते. जर A प्रकारच्या २६० पेट्या भरल्या तर तो ट्रक त्याच्या १० टनांच्या पूर्ण क्षमतेने भरण्यास B प्रकारच्या ४० पेट्या लागतात. तर प्रत्येक पेटीचे वजन किती? | • दैनंदिन जीवनातील समस्या विद्यार्थ्यांसमोर उभी करून ते प्रश्न सोडवण्यासाठी कशा प्रकारचा प्रवाह तक्ता तयार केला गेला पाहिजे, याविषयी चर्चा घडवून आणतील. | |

| उपघटक | आशय | सुलभक – प्रशिक्षणार्थी आंतरक्रिया | चिंतनात्मक प्रश्न |
|---|---|---|---|
| ९) संवादात्मक प्रश्न (Interactive Questions) | • विद्यार्थ्यांच्या गट चर्चेत किंवा सहभागातून विचार करण्यासाठी.<br>**उदाहरण :** तुमच्या मित्रांसोबत एक प्रकल्प तयार करा ज्यामध्ये पर्यावरण संवर्धनाचे मुद्दे सादर करता येतील. | • एखाद्या विषयाचा सखोल अभ्यास करण्यासाठी, विद्यार्थ्यांमध्ये संवादात्मक प्रश्न विचारण्याची संधी कोणत्या विषयात व कशा उपलब्ध करून देता येतील याविषयी चर्चा घडवून आणतील. | |
| १०) दैनंदिन जीवनावर आधारित प्रश्न (Real-life Scenario Questions) | • विद्यार्थ्यांना त्यांच्या दैनंदिन जीवनाशी संबंधित समस्यांवर विचार करण्यासाठी.<br>**उदाहरण :** जर तुमच्या शाळेत पाण्याचा अपव्यय होत असेल तर तुम्ही त्यासाठी कोणती योजना आखाल? तुमच्या परिसरातील स्वच्छतेसाठी तुम्ही कोणते योगदान देऊ शकता? | • आपल्या रोजच्या आयुष्यात कोणकोणत्या समस्या आहेत? त्या समस्या सोडविण्यासाठी तुम्ही काय उपाययोजना कराल? असे कोणते प्रश्न, कोणत्या विषयात विचारले जाऊ शकतात यासंबंधी चर्चा घडवून आणतील. | |

❖❖❖

# ११. क्षमता आधारित प्रश्ननिर्मिती कौशल्ये

**अध्ययन निष्पत्ती :**

१) प्रश्न निर्मितीचा आधार म्हणून क्षमतांची आवश्यकता जाणतात.


२) क्षमता आधारित अध्ययन पडताळणारे प्रश्न निर्माण करण्यासाठी ब्लूमच्या अध्ययन पातळीचे आधार शोधतात.

३) क्षमता अंतर्गत अध्ययन निष्पत्तीच्या संदर्भाने प्रश्न निर्मितीचे तंत्र समजून घेतात.

४) क्षमता विधानाचे विश्लेषण करून प्रश्न निर्मितीसाठीचे मुद्दे निश्चित करतात.

५) क्षमता आधारित अध्ययन पडताळणारी प्रश्नपेढी विकसित करतात.

| उपघटक | आशय | सुलभक – प्रशिक्षणार्थी आंतरक्रिया | विचारात्मक प्रश्न |
|---|---|---|---|
| क्षमता आधारित प्रश्न निर्मितीची गरज | • NEP-2020 मधील मूल्यमापन निर्देशानुसार बालकांना शिक्षण व्यवस्थेत पाठांतरापासून दूर नेणे, आकलनात्मक विकासासोबत व्यक्तिमत्त्व विकास घडवणे, शिकवणे आणि शिकणे परस्पर संवादी व्हावे यासाठी प्रश्न विचारण्याला प्रोत्साहन, अनुभवात्मक शिक्षणावर भर, सहयोगात्मक आणि शोधक उपक्रमाच्या माध्यमातून शिक्षण यासारख्या निर्देशांची दखल घेण्यासाठी क्षमता आधारित प्रश्न निर्मितीची आवश्यकता.<br>• राज्य अभ्यासक्रम आराखडा २०२४ नुसार अध्ययन मानकाधारित दृष्टिकोन मांडण्यात आलेला आहे. यात शिक्षणाची लक्षे, अभ्यासक्रमाची ध्येये, क्षमता | • पीपीटीच्या माध्यमातून आशय स्पष्ट करतात. कौशल्यपूर्ण प्रश्न निर्मितीची गरज स्पष्ट करतात. | अध्ययन–अध्यापन प्रक्रियेत प्रश्नांचे स्थान काय आहे? |

| उपघटक | आशय | सुलभक – प्रशिक्षणार्थी आंतरक्रिया | विचारात्मक प्रश्न |
|---|---|---|---|
| | अध्ययन निष्पत्ती यांचा समावेश आहे. क्षमता या ठरावीक कालावधीत संपादन करावयाची असून ही क्षमता प्राप्त झाली किंवा नाही याचे अंतरिम निकष अध्ययन निष्पत्ती विधानात मांडलेली असतात. | | |
| प्रश्न निर्मितीचे हेतू | • माहिती मिळवणे<br>• चिकित्सक विचार करायला लावणे<br>• चर्चा घडवून आणणे<br>• संपादन पडताळणे<br>• निदान उपचार करणे<br>• शिकणे प्रमाणित करणे<br>• विद्यार्थ्यांची अध्ययनातील गती व आवड वाढविणे | सुलभक प्रश्न निर्मितीच्या हेतूची यादी प्रशिक्षणार्थींच्या मदतीने करतात. प्रशिक्षणार्थी प्रश्ननिर्मितीच्या हेतूबद्दल चर्चा करतात. | प्रश्न कसे असावेत?<br>प्रश्न का तयार करावेत? |
| प्रश्न निर्मितीचे शास्त्रीय (तात्त्विक) आधार | ब्लूमच्या सुधारित (बोधात्मक) वर्गीकरणानुसार सहा अध्ययन पातळ्या आहेत.<br> | सुलभक पीपीटीच्या माध्यमातून प्रश्न निर्मितीचे शास्त्रीय (तात्त्विक) आधार: ब्लूमच्या सुधारित (बोधात्मक) वर्गीकरणानुसार सहा अध्ययन पातळ्या यावर चर्चा घडवतात. | |
| समज पडताळणी व प्रश्नाचे स्तर | • आठवणे–ओळखणे.<br>• **समजून घेणे :** अर्थ लावणे, सारांश लिहिणे, अनुमान काढणे, तुलना करणे. | • सुलभक पीपीटीच्या आधारे अध्ययनाच्या पातळ्या व त्यावर आधारित क्षमता व | काठीण्य पातळी वाढवण्यासाठी प्रश्न कसे बदलाल? |

| उपघटक | आशय | सुलभक – प्रशिक्षणार्थी आंतरक्रिया | विचारात्मक प्रश्न |
|---|---|---|---|
| | • **उपयोजन :** सादर करणे, कृतीत उतरवणे, अंमलबजावणी करणे, अर्थ लावणे, भाकीत करणे.<br>• **विश्लेषण :** मांडणी करणे, तुलना करणे, प्रयोग करणे, फरक शोधणे, सहसंबंध मांडणे, परीक्षण करणे, चाचणी.<br>• **मूल्यमापन :** निवड करणे, प्रतिसाद करणे, भूमिका मांडणे, टीका करणे, अनुमान मांडणे, प्रमाणित करणे, पुनर्रचना करणे, निष्कर्ष काढणे.<br>• **नवनिर्मिती :** रचना करणे, जोडणी करणे, बांधणी करणे, विकसित करणे, लेखन करणे, शोध घेणे, एकत्रिकरण करणे, वर्गीकरण करणे, पुननिर्मिती करणे. | प्रश्ननिर्मितीसाठी त्याचा उपयोग यावर चर्चा घडवून आणतील.<br>• प्रशिक्षणार्थी चर्चेत सहभाग घेतील. | |
| प्रश्ननिर्मितीसाठी ओघतक्ता | • **ओघतक्त्याचे घटक :**<br>क्षमता निश्चित करणे.<br>↓<br>क्षमता विश्लेषण करून अध्ययन निष्पत्तींची निश्चिती करणे.<br>↓<br>अध्ययन निष्पत्ती संपादनासाठी पाठ्यांशाची निवड करणे.<br>↓<br>ढोबळमानाने किंवा मुक्तपणे प्रश्नसंच निर्मिती करणे. | • पीपीटीच्या माध्यमातून प्रश्ननिर्मितीसाठी ओघतक्त्यावर चर्चा घडवून आणतात. | • प्रश्न पेढीची गरज का आहे? |

| उपघटक | आशय | सुलभक – प्रशिक्षणार्थी आंतरक्रिया | विचारात्मक प्रश्न |
|---|---|---|---|
| | ↓<br>या प्रश्नांचे प्रश्नप्रकारानुसार वर्गीकरण करणे. (वस्तुनिष्ठ, लघुत्तरी, दीर्घोत्तरी)<br>↓<br>वरील प्रश्न प्रकारचे प्रतिसादाच्या स्वरूपानुसार वर्गीकरण करणे. (तोंडी, लेखी, प्रात्यक्षिक)<br>↓<br>यापैकी प्रत्येक प्रश्नाचे उद्दिष्टानुसार वर्गीकरण करणे. (ज्ञान, आकलन, उपयोजन कौशल्य, अभिरूची, अभिवृत्ती दृष्टिकोन)<br>↓<br>प्रत्येक उद्दिष्टांच्या प्रश्नांची स्तरानुसार मांडणी करणे. (निम्न, उच्च)<br>↓<br>प्रश्नांची भाषिक अंगाने सुधारणा करणे. (योग्य समर्पक शब्द)<br>↓<br>प्रत्येक प्रश्नांची निकषानुसार पडताळणी करणे. (वस्तुनिष्ठता, नेमकेपणा, नि:संदिग्धता, विश्वसनीयता)<br>↓<br>प्रश्नास अंतिम रूपात लिहिणे. | | |
| प्रश्ननिर्मिती | एक क्षमता निवडून त्यावर प्रश्न निर्माण करणे व त्याची निकषाधारित पडताळणी करणे. | सुलभक प्रश्ननिर्मितीसाठी आराखडा देतात व प्रश्न निर्माण करण्याचे गटकार्य देतात. | |

**इयत्ता : तिसरी** **विषय : गणित**

**काठिण्यपातळी** : सोपी ☐ मध्यम ☐ कठीण ☐

**संकल्पना** : गुणाकार

**उद्दिष्ट** : उपयोजन

**क्षमता** : संख्येवरील क्रिया समजपूर्वक करतो.

**अध्ययन निष्पत्ती** : गुणाकाराची उदाहरणे समजपूर्वक सोडवतो.

**प्रश्न** : पुढे दिलेले उदाहरण दुरुस्त करून लिहा.

$3 \times 5 = 12$

**इयत्ता : तिसरी** **विषय : मराठी**

**काठिण्यपातळी** : सोपी ☐ मध्यम ☐ कठीण ☐

**संकल्पना** : समजपूर्वक वाचन

**क्षमता** : विविध प्रकारचा मजकूर समजून घेण्यासाठी वेगवेगळ्या कार्यनीती वापरतो. (निष्कर्ष काढणे, अंदाज लावणे, दृश्य प्रतिमा निर्माण करणे इ.)

**अध्ययन निष्पत्ती** : उतारा वाचून त्याचा अचूक अंदाज लावून निष्कर्ष काढतो.

**उतारा**

रामपूर गावात दोन मित्र खूप प्रेमाने राहत होते. ते खूप जिवलग मित्र होते. ते दोघे गावातील शाळेत एकाच वर्गात शिकत होते. सध्या मे महिना सुरू होता. उन्हाचा पारा वाढलेला होता. पुढच्या वर्षी ते सहावीच्या वर्गात जाणार होते. त्या दोघांनाही खूप छान पोहता येत होते. ते नियमित नदीवर पोहायला जायचे.

एके दिवशी दुपारी ते नदीवर पोहायला गेले. ते नदीत मनसोक्त पोहत होते. त्यांना अचानक एका लहान मुलाचा रडण्याचा आवाज आला. ते लहान मूल आईवडिलांचा डोळा चुकवून नदीत आले होते. पाणी खोल असल्यामुळे ते बुडायला लागले होते. त्या दोघांनी त्या मुलाला वाचवले. गावातील सरपंचांनी त्यांचा त्याबद्दल सत्कार केला.

१) कोणत्या गावात दोन मित्र राहत होते? (आठवणे)

२) सध्या मुले कोणत्या वर्गात शिकत होती? (आकलन)

३) पुरामध्ये माणसे का वाहून जातात? (उपयोजन)

४) ते दोन मित्र त्या बुडणाऱ्या मुलाला कशामुळे वाचवू शकले? (विश्लेषण)

५) आजच्या काळात पोहायला शिकणे किती गरजेचे वाटते? (मूल्यमापन)

६) दुसऱ्यांचे प्राण वाचवणाऱ्या मुलांची माहिती मिळवून त्यांची नावे लिहा? अशा मुलांबद्दल तुमचे मत लिहा? (सर्जनशीलता)

◈◈◈

# १२. विचारप्रवर्तक प्रश्न (TPQ)

**अध्ययन निष्पत्ती :**


१) विद्यार्थ्यांचे विचारप्रवर्तन करण्यासाठी प्रश्नांची आवश्यकता नमूद करून प्रश्नांचे स्वरूप सांगतात.

२) निम्नस्तरीय विचार व उच्चस्तरीय विचार या संकल्पना स्पष्ट सांगतात.

३) निम्नस्तरीय विचार व उच्चस्तरीय विचार विकसित करण्यासाठी उपयोगात आणल्या जाणाऱ्या प्रश्नांच्या स्तरांबद्दल सांगतात.

४) निम्नस्तरीय विचार व उच्चस्तरीय विचार यातील फरक स्पष्ट करतात.

५) निम्नस्तरीय विचार व उच्चस्तरीय विचार स्तरांतर्गत येणाऱ्या प्रश्नांची निर्मिती करतात.


| उपघटक | आशय | सुलभक – प्रशिक्षणार्थी आंतरक्रिया | चिंतनात्मक प्रश्न |
|---|---|---|---|
| मानवी विचार (५ मि.) | मानवी विचार (Human Thinking) विचारप्रक्रिया दोन मुख्य प्रकारांमध्ये विभागली जाते.<br>• निम्नस्तरीय विचार (Lower Order Thinking - LOT)<br>• उच्चस्तरीय विचार (Higher Order Thinking - HOT) | मानवी विचारांबद्दल चर्चा करणे. | • उच्चस्तरीय विचारांचा अभ्यास विद्यार्थ्यांना कशा प्रकारे फायद्याचा ठरतो? |
| ब्लूमचे (बोधात्मक) सुधारित श्रेणीबद्ध वर्गीकरण |  | | |
| | **क्षेत्रे (Domains)**<br>ब्लूमचे श्रेणीबद्ध वर्गीकरण तीन क्षेत्रांमध्ये विभागलेली आहे. | ब्लूमचे श्रेणीबद्ध वर्गीकरण क्षेत्र आणि स्तर याबद्दल चर्चा करतात. | • बोधात्मक, भावात्मक आणि क्रियात्मक क्षेत्रे एकमेकांना कसे पूरक ठरतात? |

| उपघटक | आशय | सुलभक – प्रशिक्षणार्थी आंतरक्रिया | चिंतनात्मक प्रश्न |
|---|---|---|---|
| | • बोधात्मक (Cognitive) : बौद्धिक क्षमता, जसे की मौखिक किंवा दृश्य.<br>• भावात्मक (Affective) : भावना, मूल्ये आणि विश्वास.<br>• क्रियात्मक (Psychomotor) : शारीरिक कौशल्य क्षमता.<br>• आंतरक्रियात्मक (Interactive)<br>**पातळी/स्तर (Levels)**<br>• लक्षात ठेवणे (Remembering) : माहितीचे स्मरण करणे.<br>• समजून घेणे (Understanding) : माहितीचा अर्थ स्पष्ट करणे.<br>• अंमलबजावणी करणे (Applying) : ठोस परिस्थितींमध्ये संकल्पनांचा वापर.<br>• विश्लेषण करणे (Analysing) : एक संपूर्ण घटकांच्या भागांमध्ये विभागणे.<br>• मूल्यांकन करणे (Evaluating) : माहितीबद्दल निर्णय घेणे.<br>• नवनिर्मिती (Creating) : विविध समस्यांची त्यातून आत्मविष्कार, नवनिर्मिती करतो. | पातळी किंवा स्तरांचा अर्थबोध काय होतो याबद्दल चर्चा करतात. | |
| निम्न स्तर विचार (LOT)<br>(१० मि.) | **निम्न स्तर विचार (LOT)**<br>जे विद्यार्थ्यांना माहिती लक्षात ठेवण्यास, समजून घेण्यास आणि लागू करण्यास प्रोत्साहित करतात. | निम्न स्तर विचारामुळे कोणत्या प्रकारच्या प्रश्नांचा समावेश होतो, याबद्दल चर्चा करतात. | • समस्यांचे निराकरण करताना तुम्ही कोणत्या तंत्रांचा वापर करता आणि ते तंत्र तुमच्या विचारप्रक्रियेला कसा आकार देतात? |


| उपघटक | आशय | सुलभक - प्रशिक्षणार्थी आंतरक्रिया | चिंतनात्मक प्रश्न |
|---|---|---|---|
| | **लक्षात ठेवणे (Remembering)**<br>↓<br>**समजून घेणे (Understanding)**<br>↓<br>**लागू करणे/अंमलबजावणी करणे. (Applying)**<br>• LOT प्रश्न हे बहुधा वस्तुनिष्ठ मूल्यांकन असते, उदा. बहुपर्यायी प्रश्न, जोड्या जुळवा आणि रिक्त जागा भरा. केव्हा, कुठे, कोणते, किती आणि कोण यांसारखे प्रश्नोत्तरे असलेले प्रश्नांचा समावेश असतो.<br>• LOT हा मूलभूत प्रश्न विचार स्तर आहेत, जी विद्यार्थ्यांना उच्चस्तरीय विचार स्तरापर्यंत (HOT) पोहोचण्यापूर्वी त्यांना आत्मसात करणे आवश्यक आहे. | | |
| उच्चस्तरीय विचार प्रश्न (HOT) संकल्पना (१० मि.) | **उच्चस्तरीय विचार (HOT)** म्हणजे अशी विचारप्रक्रिया जी माहितीच्या केवळ पाठांतर किंवा समजुतीच्या पलीकडे जाऊन तिचा विश्लेषण, मूल्यमापन आणि सर्जनशीलतेने उपयोग करण्यावर भर देते. या प्रश्नांमुळे विद्यार्थ्यांना माहितीला/ज्ञानाला व्यवस्थितपणे हाताळणे, समस्यांचे समाधान करणे, निर्णय घेणे आणि नवकल्पना करणे शक्य होते. | उच्चस्तरीय विचार कोणत्या प्रकारच्या प्रश्नांचा समावेश होतो याबद्दल चर्चा करतात. | |

<table>
<tr><th>उपघटक</th><th>आशय</th><th>सुलभक – प्रशिक्षणार्थी आंतरक्रिया</th><th>चिंतनात्मक प्रश्न</th></tr>
<tr><td></td><td>

• (HOT) प्रश्न विद्यार्थ्यांना विश्लेषण, मूल्यमापन आणि माहिती तयार करण्यास प्रोत्साहित करतात. (HOT) प्रश्नांच्या उदाहरणांमध्ये हे समाविष्ट आहे.




• उच्चस्तरीय प्रश्नांपर्यंत पोहोचण्यापूर्वी विद्यार्थ्यांना LOT अंतर्गत निम्नस्तरीय विचार प्रवर्तक स्तरातील आवश्यक पातळ्या आत्मसात करणे आवश्यक आहे.




</td><td></td><td></td></tr>
</table>

<table>
<tr><th>उपघटक</th><th>आशय</th><th>सुलभक – प्रशिक्षणार्थी आंतरक्रिया</th><th>चिंतनात्मक प्रश्न</th></tr>
<tr><td>HOT आणि LOT यातील फरक<br>(२० मि.)</td><td>HOT आणि LOT यांतील फरक
<table>
<tr><th>घटक</th><th>उच्च स्तर विचार (HOT)</th><th>निम्न स्तर विचार (LOT)</th></tr>
<tr><td>पातळी</td><td>उच्च</td><td>प्राथमिक</td></tr>
<tr><td>उद्‌दिष्ट</td><td>समस्या सोडवणे, सर्जन–शीलता</td><td>माहिती स्मरण आणि समजणे</td></tr>
<tr><td>निष्पत्ती</td><td>निर्णय, नवीन कल्पना</td><td>पाठांतर, पुनरावृत्ती</td></tr>
<tr><td>उपाय–योजना</td><td>सखोल विश्लेषण व मूल्य–मापन</td><td>प्राथमिक ज्ञान व समज</td></tr>
</table></td><td>HOT आणि LOT यांतील फरकाबद्‌दल चर्चा करतात.</td><td></td></tr>
<tr><td>उच्चस्तरीय विचार कौशल्य (HOT) महत्त्व<br>(१० मि.)</td><td>• चिकित्सक विचार<br>• वास्तविक जगातील अनुप्रयोग<br>• संयम<br>• सर्जनशीलता<br>• प्रशंसा</td><td>उच्च स्तर विचार प्रश्नांबाबत (HOT) आणि महत्त्वाबद्‌दल चर्चा करतात.</td><td></td></tr>
<tr><td>उच्चस्तरीय विचार कौशल्य (HOT) आधारित प्रश्नांची उदाहरणे<br>(१५ मि.)</td><td>इयत्ता पाचवी (विज्ञान) :<br>पुरानंतर लोकांनी त्यांचे जीवन सामान्य करण्यासाठी काय करावे लागेल ते लिहा.<br>इयत्ता सहावी (हिंदी) : उपहार<br>उपहार देने की प्रथा का महत्त्व आज की डिजिटल दुनिया में कैसे बदला है?<br>अगर आपको एक ऐसा उपहार देना हो जो किसी व्यक्ती के जीवन में</td><td>उच्चस्तरीय प्रश्नांबाबत (HOT) करतात.<br>• शिक्षकांनी उच्चस्तरीय प्रश्नांची रचना करतात.</td><td></td></tr>
</table>

| उपघटक | आशय | सुलभक – प्रशिक्षणार्थी आंतरक्रिया | चिंतनात्मक प्रश्न |
|---|---|---|---|
| | सकारात्मक बदलाव ला सके, तो आप क्या चुनेंगे और क्यों?<br>• आप कैसे सुनिश्चित करेंगे कि, आपका उपहार पर्यावरण के लिए हानिकारक न हो?<br>• क्या आप जानते हैं कि, उपहार देना और लेना दोनों के लिए समान महत्त्व रखता है? क्यों या क्यों नहीं?<br>**इयत्ता सातवी (इंग्लिश) :**<br>1.5 : Seeing Eyes Helping Hands<br>• Imagine someone has invited your family to a programme and you were the only person at home when the invitation was given orally.<br>• Write a note (4-5 lines) to pass on the message to the other people in your family. Or Write an imaginary conversation in which you pass on the message to your parents.<br>**इयत्ता नववी (मराठी) :**<br>समई<br>• समईचे जीवन संघर्षमय होते, पण तरीही तिने कधी हार मानली नाही. या विधानाचे विश्लेषण करा.<br>• समईने तिच्या जीवनात ज्या मूल्यांचे पालन केले, ती मूल्ये आजच्या समाजासाठी कशी प्रासंगिक आहेत? | | |

| उपघटक | आशय | सुलभक – प्रशिक्षणार्थी आंतरक्रिया | चिंतनात्मक प्रश्न |
| --- | --- | --- | --- |
| | **इयत्ता दहावी (समाजशास्त्र) :**<br>लोकसंख्या<br>• विकसित आणि विकसनशील देशांमध्ये लोकसंख्या वाढीचा दर कसा बदलतो आणि या फरकांना कारणीभूत असलेले मूलभूत घटक कोणते आहेत?<br>• शहरी भागात जलद लोकसंख्या वाढीचे पर्यावरणीय परिणाम काय आहेत आणि शाश्वत विकास या समस्यांचे निराकरण कसे करू शकतो?<br>• वृद्ध लोकसंख्येचे दीर्घकालीन आर्थिक परिणाम काय आहेत आणि समाज या आव्हानांसाठी कशी तयारी करू शकतो? | | |
| गटकार्य<br>(२० मि.) | LOT व HOT प्रश्नांच्या निर्मितीचे गटकार्य | • प्रशिक्षणार्थी गटकार्य करतात.<br>• प्रशिक्षणार्थी गटकार्याचे सादरीकरण करतात. | |

◈◈◈

# १३. अध्ययन निष्पत्तीनुसार प्रश्ननिर्मिती

### गटकार्य १ : प्रश्ननिर्मिती

**अध्ययन निष्पत्ती :**

१) अध्ययन निष्पत्तीवर आधारित प्रश्न निर्माण करतात.

२) विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आणि सर्जनशील क्षमतांचा विकास करण्यासाठी योग्य मूल्यमापन तंत्रांची निवड करतात.

३) गटकार्याद्वारे प्रशिक्षणार्थ्यांमध्ये सहकार्य, संवाद आणि नेतृत्व गुण विकसित होतात.

४) प्रशिक्षणार्थी प्रश्ननिर्मिती प्रक्रियेतील विविधता आणि उपयुक्तता समजून घेतात.

| उपघटक | आशय | सुलभक – प्रशिक्षणार्थी आंतरक्रिया |
|---|---|---|
| विषयनिहाय प्रश्ननिर्मिती | • प्रश्ननिर्मितीची प्रक्रिया<br>• अध्ययन निष्पत्तीनुसार प्रश्न निर्माण करणे.<br>• चाचणी निर्मिती करणे.<br>• उत्तराचे मुद्दे ठरविणे. | • सुलभक विषयनिहाय प्रशिक्षणार्थ्यांचे गट निर्माण करतात.<br>• अध्ययन निष्पत्तीचे महत्त्व समजून घेतात.<br>• चाचणी निर्मिती करतात.<br>• नमुना उत्तरे तयार करतात. |

### गटकार्य २ : सादरीकरण

**अध्ययन निष्पत्ती :**

१) प्रशिक्षणार्थी निर्दोष प्रश्ननिर्मितीचे कौशल्य साध्य करतात.

२) प्रशिक्षणार्थी प्रश्नांचे नमुने तयार करतात.

| उपघटक | आशय | सुलभक – प्रशिक्षणार्थी आंतरक्रिया |
|---|---|---|
| सादरीकरण स्तरनिहाय, विषयनिहाय | • प्रशिक्षणार्थ्यांचे अध्यापनाचा स्तर, विषय समजून घेणे व त्या अनुषंगाने गट करणे.<br>• प्रशिक्षणार्थी गटात सक्रिय सहभागी होतात.<br>• गटात विविध प्रशिक्षणार्थ्यांना समाविष्ट करणे, जेणेकरून अनुभवांची देवाणघेवाण होईल. | • सुलभक सादरीकरणाचे निकष सांगतात.<br>• प्रशिक्षणार्थी निकषानुसार सादरीकरण करतात.<br>• सुलभक सादरीकरणाचे निरीक्षण करतात व नोंदी घेतात. |

## गटकार्य ३ : चर्चा

### अध्ययन निष्पत्ती :

१) प्रशिक्षणार्थी निर्दोष व प्रभावी प्रश्नावर चर्चा करतात.

२) क्षमता आधारित मूल्यांकन प्रक्रियेचे महत्त्व समजून घेतात.

३) विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी उपयुक्त मूल्यमापन तंत्राची निवड करतात.

४) प्रशिक्षणार्थ्यांचे गटकार्यामुळे सहकार्य, संवाद आणि नेतृत्व गुण विकसित होतात.

| उपघटक | आशय | सुलभक – प्रशिक्षणार्थी आंतरक्रिया |
|---|---|---|
| सादरीकरणावर आधारित चर्चा | • सादरीकरणाचा आढावा घेणे.<br>• प्रश्नाची पातळी, विविधता व समावेशकता या घटकावर आधारित प्रश्नाचे मूल्यमापन करणे.<br>• गुणदान योजनेवर प्रश्न पातळीनुसार चर्चा करणे. | • सुलभक चर्चेसाठी सादरीकरणाचा आढावा घेण्यास सांगतात.<br>• प्रशिक्षणार्थी गटामध्ये विषयांच्या प्रश्नाच्या दर्जाबाबत चर्चा करतात.<br>• प्रशिक्षणार्थी विषयांच्या नमुना उत्तराची समर्पकता व अचूकतेविषयी चर्चा करतात. |

◈◈◈

# १४ : समग्र प्रगतिपत्रक (HPC) – संकल्पना व पार्श्वभूमी

**प्रस्तावना :**

राष्ट्रीय शिक्षण धोरण–२०२० (NEP-2020) मध्ये दिलेल्या निर्देशानुसार विद्यार्थ्यांच्या प्रगतीचे समग्र मूल्यांकन करणे गरजेचे आहे. या बरोबरच मूल्यांकनात एकात्मिकता आणण्याकरिता राष्ट्रीय स्तरावर PARAKH (परख) ची स्थापना करण्यात आलेली आहे. परख मार्फत ३६०° समग्र मूल्यांक़नाच्या साध्यतेसाठी समग्र प्रगतिपत्रक (HPC) ची निमिर्ती करण्यात आलेली आहे. शिक्षणाच्या ध्येयाची साध्यता पडताळणे अथवा ध्येये साध्य करण्यासाठी HPC संकल्पना, हेतू/उद्‌देश अभ्यासणे आवश्यक आहे.

**अध्ययन निष्पत्ती :**

१) समग्र प्रगतिपत्रकाची संकल्पना सांगतो.
२) पारंपरिक मूल्यांकन व समग्र प्रगतित्रकाद्‌वारे मूल्यांकन यातील फरक सांगतो.
३) समग्र प्रगतिपत्रकाची वैशिष्ट्यांबाबत चर्चा करतो.
४) समग्र प्रगतिपत्रक कार्यनिती माहिती सांगतो.

| उपघटक | आशय | सुलभक – प्रशिक्षणार्थी आंतरक्रिया | | चिंतनात्मक प्रश्न |
|---|---|---|---|---|
| | | सुलभक कृती | प्रशिक्षणार्थी कृती | |
| समग्र प्रगतिपत्रक व राष्ट्रीय शिक्षण धोरण–२०२० (३ मि.) | • राष्ट्रीय शिक्षण धोरण–२०२० उद्दिष्ट : विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास | • राष्ट्रीय शिक्षण धोरण १९६४–६६, १९६८, १९८६ व २०२० या धोरणांतील शिक्षणाची उद्दिष्टांचा पीपीटीच्या साहाय्याने आढावा घेतात व चर्चा करतात. | • राष्ट्रीय शिक्षण धोरण उद्दिष्ट सांगतात. | • राष्ट्रीय शिक्षण धोरणातील शिक्षणाची ध्येये कोणती आहेत? |
| (२ मि.) | • राष्ट्रीय मूल्यांकन केंद्र (NAC) स्थापना : परख (PARAKH) | • राष्ट्रीय मूल्यांकन केंद्र (NAC) - परख (PARAKH) या संस्थेचा उद्देश स्पष्ट करून सांगतात. | • राष्ट्रीय मूल्यांकन केंद्र, परख याबाबतची माहिती समजून घेतात. | • परखची आवश्यकता का आहे? |

| उपघटक | आशय | सुलभक – प्रशिक्षणार्थी आंतरक्रिया | | चिंतनात्मक प्रश्न |
|---|---|---|---|---|
| | | सुलभक कृती | प्रशिक्षणार्थी कृती | |
| (५ मि.) | • पारंपरिक मूल्यांकन पद्धती : वार्षिक परीक्षा, पाठांतरावर आधारित गुण अथवा श्रेणी पद्धती, विद्यार्थ्यांच्या संपूर्ण शैक्षणिक प्रगतीचे मूल्यांकन होत नाही. | • पारंपरिक मूल्यांकन पद्धती व राष्ट्रीय शिक्षण धोरण–२०२० नुसार मूल्यांकन पद्धती शिफारशी याबाबत पीपीटी–वरील मजकूर व प्रश्न विचारून चर्चा करतात. | • पारंपरिक मूल्यांकन पद्धतीमधील मर्यादा सांगतात. | • विद्यमान मूल्यमापन पद्धतीमध्ये कोणत्या सुधारणा करणे आवश्यक आहे? |
| समग्र प्रगततिपत्रक संकल्पना<br>(५ मि.)<br><br>(५ मि.) | राष्ट्रीय शिक्षण धोरण–२०२० मधील परिच्छेद ४.३५ विद्यार्थ्यांच्या प्रगतीचे ३६०° मूल्यांकन करण्याची शिफारस केली आहे.<br>**समग्र प्रगतिपत्रक व्याख्या :**<br>• विद्यार्थ्यांच्या मूल्यांकनाचा सर्वंकष दस्तऐवज<br>• शाळा व शिक्षक यांना जोडणारा दुवा<br>• विद्यार्थी शैक्षणिक प्रगतीचा सर्वसमावेशक अहवाल | • सुलभक राष्ट्रीय शिक्षण धोरण–२०२० मधील परिच्छेद ४.३५ पीपीटीच्या साहाय्याने दाखवितात व चर्चा करतात.<br>• सुलभक पीपीटीच्या साहाय्याने समग्र प्रगतिपत्रक व्याख्या व अर्थ सांगतात. | • प्रशिक्षणार्थी परिच्छेद वाचन करतात व चर्चेत सहभागी होतात.<br>• प्रशिक्षणार्थी पीपीटीवरील व्याख्या वाचतात व समग्र प्रगतिपत्रकाचा अर्थ समजून घेतात. | |
| समग्र प्रगतिपत्रक हेतू/उद्दिष्टे<br>(१० मि.) | **समग्र प्रगतिपत्रक हेतू/ उद्दिष्टे :**<br>• अध्ययन संपादणूक समजून घेणे.<br>• उपचारात्मक अध्यापन व कृतिकार्यक्रमाचे आयोजन. | • सुलभक समग्र प्रगतिपत्रक हेतू/उद्दिष्टे पीपीटीच्या साहाय्याने स्पष्ट करतात व चर्चा करतात. | • प्रशिक्षणार्थी लक्षपूर्वक ऐकतात व पीपीटीवरील मजकूर वाचतात व चर्चेत सहभागी होतात. | • समग्र प्रगतिपत्रकाचे हेतू कोणते असतील? |

| उपघटक | आशय | सुलभक – प्रशिक्षणार्थी आंतरक्रिया | | चिंतनात्मक प्रश्न |
|---|---|---|---|---|
| | | सुलभक कृती | प्रशिक्षणार्थी कृती | |
| | • विद्यार्थ्यांच्या संपादणूक स्तर निश्चित करणे.<br>• विद्यार्थी संपादणूक माहिती कुटुंबापर्यंत पोहोचवणे.<br>• विद्यार्थ्यांच्या विकासाच्या सर्व पैलूंचे मूल्यांकन करणे.<br>• विद्यार्थ्याच्या संपादणुकीचे गुणांऐवजी वर्णन करणे. | | | |
| समग्र प्रगतिपत्रक, वैशिष्ट्ये, गरज व महत्त्व (१५ मि.) | **समग्र प्रगतिपत्रक वैशिष्ट्ये**<br>• सर्वांगीण प्रगतीवर भर<br>• सर्वसमावेशक मूल्यांकन<br>• ३६०° प्रगती अहवाल.<br>• शाळा व कुटुंब यांमधील दुवा<br>• ध्येयनिश्चिती<br>• बालकाऐवजी क्षमतांचे मूल्यांकन<br>• अध्यापनशास्त्रीय साधन<br>• प्रत्येक विद्यार्थ्यासाठी समग्र प्रगतिपत्रक<br>• स्तरनिहाय प्रगतिपत्रक | • सुलभक समग्र प्रगतिपत्रक वैशिष्ट्ये पीपीटीच्या साहाय्याने स्पष्ट करतात व चर्चा करतात. | • प्रशिक्षणार्थी लक्षपूर्वक ऐकतात व पीपीटीवरील मजकूर वाचतात व चर्चेत सहभागी होतात. | • ३६०° मूल्यांकन करताना कोणकोणत्या पैलूंचा विचार करावा लागेल? |
| समग्र प्रगतिपत्रक गरज व महत्त्व (१५ मि.) | **समग्र प्रगतिपत्रक गरज व महत्त्व**<br>• बालकाची समज जाणून घेणे.<br>• बालकाच्या प्रगतीचा प्राथमिक स्रोत | • सुलभक समग्र प्रगतिपत्रकाची गरज व महत्त्व पीपीटीच्या साहाय्याने स्पष्ट करतात व चर्चा करतात. | • प्रशिक्षणार्थी लक्षपूर्वक ऐकतात व पीपीटीवरील मजकूर वाचतात व चर्चेत सहभागी होतात. | • समग्र प्रगतिपत्रकाची गरज का आहे. |

| उपघटक | आशय | सुलभक – प्रशिक्षणार्थी आंतरक्रिया | | चिंतनात्मक प्रश्न |
|---|---|---|---|---|
| | | सुलभक कृती | प्रशिक्षणार्थी कृती | |
| | • पालक सभेत बालकाच्या शैक्षणिक प्रगतीवर चर्चा<br>• स्तरनिहाय व सत्रनिहाय शैक्षणिक प्रगतीचा आढावा.<br>• शाळा व कुटुंब यामधील दुवा<br>• सर्वंकष मूल्यांकन<br>• शिक्षक मूल्यांकनाबरोबर स्वयं मूल्यांकन, सहाध्यायी मूल्यांकन, पालक अभिप्राय<br>• विद्यार्थ्यांच्या आवडीनिवडी, सामर्थ्य स्थळे, सवयी, आदर्श, भविष्यकालीन नियोजन याबाबतच्या नोंदी. | | | |
| समग्र प्रगतिपत्रक कार्यनिती | • एकात्मिक दृष्टिकोन<br>• एकात्मिक अध्यापन शास्त्रीय साधने<br>१) खेळणी आधारित अध्ययन<br>२) कला एकात्मिक अध्ययन<br>३) क्रीडा एकात्मिक अध्ययन<br>४) अनुभवाधारित अध्ययन<br>५) समुदायाचा सहभाग<br>६) अध्ययनासाठी स्थानिक संसाधनाचा वापर | • एकात्मिक दृष्टिकोनाबाबत चर्चा करतील.<br>• अध्यापनशास्त्रीय साधने व त्यांचे समग्र, मूल्यांकनाच्या दृष्टीने महत्त्व यावर चर्चा करतील. | | • एकात्मिक अध्यापन शास्त्रीय साधनांची आवश्यकता का आहे? |

# १५. समग्र प्रगतिपत्रक (HPC) - स्तरनिहाय स्वरूप

## प्रस्तावना :

समग्र प्रगतिपत्रक (पायाभूत स्तर व पूर्वतयारी स्तर, पूर्वमाध्यमिक स्तर व माध्यमिक स्तर) रचना समजून घेताना सर्वप्रथम समग्र प्रगतिपत्रकातील भाग 'अ, ब व क' या भागात काय दिले आहे, हे समजून घेणे गरजेचे आहे. यातील काही भाग हा शिक्षकांनी शालेय अभिलेखांचा आधार घेऊन व पालकांशी चर्चा करून भरावयाचा आहे. तसेच विकास क्षेत्रानुसार, अध्ययन मानकांनुसार क्षमता व त्याप्रमाणे कृतींचे लेखन कसे करावे, हे समजून घेणे आवश्यक आहे. कृतीनुसार शिक्षक प्रतिसाद, स्वयं-मूल्यांकन, सहाध्यायी मूल्यांकन, पालकांचा प्रतिसाद कसा भरावयाचा, हे समग्र प्रगतिपत्रकाच्या रचना या भागात दिले आहे. यात शैक्षणिक वर्षाचा सारांश हा (प्रमुख कामगिरी दर्शके व बालकांच्या क्षमतेनुसार शिक्षकांचे गुणात्मक अभिप्राय यानुसार) कसा द्यावा हे समजून घेणे महत्वाचे आहे, हीच चर्चा आपण येथे करणार आहे.

## अध्ययन निष्पत्ती :

१) समग्र प्रगतिपत्रकातील (पायाभूत, पूर्वतयारी, पूर्वमाध्यमिक, माध्यमिक स्तरासाठी) भाग अ', ब', व क' ची रचना समजतो.

२) समग्र प्रगतिपत्रकातील (पायाभूत, पूर्वतयारी, पूर्वमाध्यमिक, माध्यमिक स्तरासाठी) नोंदीचे महत्त्व जाणतो.

३) समग्र प्रगतिपत्रकातील (पायाभूत, पूर्वतयारी, पूर्वमाध्यमिक, माध्यमिक स्तरासाठी) रुब्रिकची मांडणी समजून घेतो व मांडणी करतो.

४) समग्र प्रगतिपत्रकातील (पायाभूत, पूर्वतयारी, पूर्वमाध्यमिक, माध्यमिक स्तरासाठी) विकास क्षेत्रे व अध्ययन मानकानुसार कशी मांडणी करतो.

| उपघटक | आशय | सुलभक - प्रशिक्षणार्थी आंतरक्रिया | चिंतनात्मक प्रश्न |
|---|---|---|---|
| १) समग्र प्रगतिपत्रक रचना पायाभूत स्तर (२० मि.) | पायाभूत स्तरासाठी समग्र प्रगतिपत्रकातील<br>**भाग 'अ'**<br>• बालकांची सर्वसाधारण माहिती.<br>• मी व माझा परिसर. | पीपीटीच्या माध्यमातून<br>**भाग 'अ'**<br>• बालकांची सर्वसाधारण माहिती<br>• मी व माझा परिसर हा भाग दाखवितात व त्यावर चर्चा करतात. | • बालकांच्या आवडी निवडी (बालकांच्या स्व जाणिवेसाठी) जाणून घेणे का महत्वाचे आहे? |

| उपघटक | आशय | सुलभक – प्रशिक्षणार्थी आंतरक्रिया | चिंतनात्मक प्रश्न |
|---|---|---|---|
| | पायाभूत स्तरासाठी समग्र प्रगतिपत्रकातील<br>**भाग 'ब'**<br>**१) विकास क्षेत्रे :**<br>• शारीरिक विकास<br>• सामाजिक, भावनिक व नैतिक विकास.<br>• बोधात्मक विकास<br>• भाषा आणि साक्षरता विकास सौंदर्यदृष्टी व सांस्कृतिक विकास<br>• सकारात्मक अध्ययन सवयी<br>**२) अभ्यासक्रमाचे ध्येय व त्यानुसार संबंधित क्षमता :**<br>• पायाभूत स्तरावरील पाच विकास क्षेत्रानुसार अभ्यासक्रमाचे ध्येय व क्षमता<br>**३) कृती/उपक्रम**<br>**४) मूल्यांकनासाठी प्रश्न**<br>**५) कृती/उपक्रमासाठी मूल्यांकन रुब्रिक** :<br>• जाणीवजागृती, संवेदनशीलता, सर्जनशीलता<br>• प्रवाह, पर्वत, आकाश– कामगिरी स्तर<br>**६) शिक्षक प्रतिसाद**<br>**७) स्वयंमूल्यांकन**<br>**८) सहाध्यायी मूल्यांकन**<br>**९) पालकांचा प्रतिसाद** | पीपीटीच्या माध्यमातून<br>• विकास क्षेत्र<br>• अभ्यासक्रमाचे ध्येय व त्यानुसार संबंधित क्षमता<br>• कृती/उपक्रम<br>• कृती/उपक्रमासाठीचे मूल्यांकन रुब्रिक<br>• शिक्षक प्रतिसाद<br>• स्वयंमूल्यांकन<br>• सहाध्यायी मूल्यांकन<br>• पालकांचा प्रतिसाद<br>हा भाग दाखवतात व त्यावर चर्चा करतात. | • पायाभूत स्तरावर विकास क्षेत्र आधारित अभ्यासक्रम ध्येय निश्चिती योग्य की अयोग्य सकारण चर्चा करा.<br>• पायाभूत स्तरावर बाल वाटिका, पहिली ते इयत्ता दुसरीपर्यंत बालकाचा बोधात्मक विकास होण्यामागील कारणे कोणती? तुमचे मत स्पष्ट करा.<br>• पायाभूत स्तरावर सकारात्मक अध्ययन सवयींचे महत्त्व स्पष्ट करा.<br>• जाणीवजागृती, संवेदनशीलता, सर्जनशीलता, प्रवाह, पर्वत, आकाश या कामगिरी स्तराच्या दर्शकांसाठी तुम्ही कोणते समर्पक शब्द सुचवाल.<br>• बालकांच्या स्वयंमूल्यांकनातून कोणती शैक्षणिक बाब साध्य होईल असे तुम्हांला वाटते? |

| उपघटक | आशय | सुलभक – प्रशिक्षणार्थी आंतरक्रिया | चिंतनात्मक प्रश्न |
|---|---|---|---|
| | | | • सहाध्यायी मूल्यांकन ही संकल्पना बालकाच्या विकासात किती प्रमाणात सहाय्यभूत राहील उदाहरणासह स्पष्ट करा. |
| | पायाभूत स्तरासाठी समग्र प्रगतिपत्रकातील<br>**भाग 'क'**<br>• शैक्षणिक वर्षाचा सारांश (प्रमुख कामगिरी दर्शके, बालकांच्या क्षमतेनुसार शिक्षकांचे गुणात्मक अभिप्राय) | पीपीटीच्या माध्यमातून<br>• शैक्षणिक वर्षाचा सारांश (प्रमुख कामगिरी दर्शके, बालकांच्या क्षमतेनुसार शिक्षकांचे गुणात्मक अभिप्राय) हा भाग दाखवितात व त्यावर चर्चा करतात. | • बालकांच्या शैक्षणिक प्रगतीत शिक्षकांच्या गुणात्मक अभिप्रायाचे महत्त्व याबाबत तुमचे मत व्यक्त करा. |
| २) समग्र प्रगतिपत्रक रचना पूर्वतयारी स्तर (२० मि.) | पूर्वतयारी स्तरासाठी समग्र प्रगतिपत्रकातील.<br>**भाग 'अ'**<br>• बालकांची सर्वसाधारण माहिती.<br>• माझ्याबद्दल सर्व<br>• स्वयंमूल्यांकन – 'मला शाळेत कसे वाटते?<br>• सहाध्यायीचा अभिप्राय<br>• पालकांचा अभिप्राय | पीपीटीच्या माध्यमातून<br>**भाग 'अ'**<br>• बालकांची सर्वसाधारण माहिती.<br>• माझ्याबद्दल सर्व<br>• स्वयंमूल्यांकन – 'मला शाळेत कसे वाटते? शाळेत कसे वाटते? सहाध्यायीचा अभिप्राय<br>• पालकांचा अभिप्राय | • 'मला शाळेत कसे वाटते? या प्रश्नासाठी स्वयंमूल्यांकन करताना काय अडचणी येतील असे आपणास वाटते?<br>• 'मला शाळेत कसे वाटते? या प्रश्नासाठी सहाध्यायीच्या अभिप्रायाची चर्चा करा. |

| उपघटक | आशय | सुलभक – प्रशिक्षणार्थी आंतरक्रिया | चिंतनात्मक प्रश्न |
|---|---|---|---|
| | **भाग 'ब'** प्रत्येक अध्ययन मानकाच्या 'प्रगतीचा सारांश' आहे.<br>• 'अभ्यासक्रमाचे उद्दिष्ट'( एक किंवा अधिक), त्या अभ्यासक्रम उद्दिष्टाशी संबंधित असलेली क्षमता (एक किंवा एकापेक्षा जास्त) त्या क्षमतेवर आधारित 'कृती'<br>• मूल्यांकन रुब्रिक – मूल्यांकन रुब्रिकमध्ये जाणीवजागृती, संवेदनशीलता, सर्जनशीलता या मूल्यांकन क्षमतांसाठी प्रारंभिक, प्रवीण आणि प्रगत या कामगिरीच्या स्तरांसाठी क्षमतेनुसार मूल्यांकनाचे रुब्रिक<br>• 'शिक्षकांचा अभिप्राय'<br>• 'निरीक्षणे'<br>• 'अध्ययनार्थ्यांनी कशी कामगिरी केली याबाबत विचार करा.<br>• 'स्वयंमूल्यांकन | पीपीटीच्या माध्यमातून<br>• 'अभ्यासक्रमाचे उद्दिष्ट' (एक किंवा अधिक), त्या अभ्यासक्रम उद्दिष्टाशी संबंधित असलेली क्षमता (एक किंवा एकापेक्षा जास्त) त्या क्षमतेवर आधारित 'कृती'<br>• मूल्यांकन रुब्रिक<br>• 'शिक्षकांचा अभिप्राय'<br>• 'निरीक्षणे<br>• अध्ययनार्थ्यांनी कशी कामगिरी केली याबाबत विचार करा.<br>• 'स्वयंमूल्यांकन'<br>हा भाग दाखवितात व त्यावर चर्चा करतात. | • पूर्वतयारी स्तरासाठी जाणीवजागृती, संवेदनशीलता, सर्जनशीलता, प्रारंभिक, प्रवीण आणि प्रगत हे कामगिरी स्तराच्या दर्शकांसाठी वापरलेले शब्द योग्य आहेत की वेगळे शब्द वापरण्याची गरज आहे? समर्पक चर्चा करा. वेगळे शब्द वापरण्याची गरज आहे. असे वाटल्यास वेगळे शब्द सुचवा.<br>• बालकांच्या मूल्यांकनासाठी कृती तयार करताना कोणत्या अडचणी येतील असे तुम्हांला वाटते?<br>• पूर्वतयारी स्तरासाठी सहाध्यायी मूल्यांकन ही संकल्पना बालकाच्या विकासात सहाय्यभूत ठरते, उदाहरणासह स्पष्ट करा. |

| उपघटक | आशय | सुलभक – प्रशिक्षणार्थी आंतरक्रिया | चिंतनात्मक प्रश्न |
| --- | --- | --- | --- |
| | पूर्वतयारी स्तरासाठी समग्र प्रगतिपत्रकातील<br>**भाग 'क'**<br>• शैक्षणिक वर्षाचा प्रगतीचा सारांश (प्रमुख कामगिरी दर्शके, बालकांच्या क्षमतेनुसार शिक्षकांचे गुणात्मक अभिप्राय) अध्ययन मानकांमध्ये भाषा (R1), भाषा (R2), गणित, आपल्या सभोवतालचे जग, शारीरिक शिक्षण, दृश्यकला, रंगभूमी, संगीत, नृत्य आणि हालचाल | प्रगतीचा सारांश (प्रमुख कामगिरी दर्शके, बालकांच्या क्षमतेनुसार शिक्षकांचे गुणात्मक अभिप्राय) | • 'शिक्षकांचा गुणात्मक अभिप्राय' बालकाच्या गुणवत्ता विकासास सहाय्यभूत ठरतो.' तुमचे मत व्यक्त करा. |
| ३) समग्र प्रगतिपत्रक रचना पूर्व माध्यमिक स्तर<br>(२० मि.) | पूर्व माध्यमिक स्तरासाठी समग्र प्रगतिपत्रकातील<br>**भाग 'अ'**<br>• बालकांची सर्वसाधारण माहिती<br>• माझ्याबद्दल काही...<br>• माझे ध्येय/माझी महत्त्वकांक्षा..<br>• पालकांच्या व शिक्षकांच्या नजरेतून मी... | पीपीटीच्या माध्यमातून<br>**भाग 'अ'**<br>• बालकांची सर्वसाधारण माहिती<br>• माझ्याबद्दल सर्व काही...<br>• माझे ध्येय<br>• पालकांच्या व शिक्षकांच्या नजरेतून मी... हे भाग दाखवितात व त्यावर चर्चा करतात. | • बालकांच्या आवडी निवडी त्याच्या इच्छा अपेक्षा (बालकांच्या स्व जाणिवेसाठी) जाणून घेणे का महत्त्वाचे आहे? |
| | पूर्व माध्यमिक स्तरासाठी समग्र प्रगतिपत्रकातील<br>**भाग 'ब'**<br>**१) विषय रचना**<br>• प्रथम भाषा | पीपीटीच्या माध्यमातून<br>• विषय रचना<br>• अभ्यासक्रमाचे ध्येय व त्यानुसार संबंधित क्षमता | • विद्यार्थी स्वत:बद्दल अथवा मित्राबद्दल वस्तुनिष्ठ नोंदी करू शकेल काय? यावरून या नोंदींची आवश्यकता चर्चा करा. |

| उपघटक | आशय | सुलभक – प्रशिक्षणार्थी आंतरक्रिया | चिंतनात्मक प्रश्न |
|---|---|---|---|
| | • द्वितीय भाषा<br>• तृतीय भाषा<br>• गणित<br>• विज्ञान<br>• सामाजिकशास्त्रे<br>**२) अभ्यासक्रमाचे ध्येय व** त्यानुसार संबंधित क्षमता–पूर्व माध्यमिक स्तरावरील सहा विषयानुसार अभ्यासक्रमाचे ध्येय व क्षमता<br>**३) कृती/उपक्रम**<br>**४) मूल्यांकनासाठीचे प्रश्न**<br>**५) कृती उपक्रमासाठीचे मूल्यांकन**<br>रुब्रिक, जाणीवजागृती, संवेदनशीलता, प्रारंभिक, प्रवीण, प्रगत–कामगिरी स्तर<br>**६) स्वयंमूल्यांकन/आत्मचिंतन**<br>**७) सहाध्यायी अभिप्राय**<br>**८) पालकांचा अभिप्राय**<br>**९) शिक्षक अभिप्राय** | • कृती/उपक्रम<br>• कृती/उपक्रमासाठीचे मूल्यांकन रुब्रिक<br>• स्वयंमूल्यांकन/आत्मचिंतन<br>• सहाध्यायी अभिप्राय<br>• पालकांचा अभिप्राय<br>• शिक्षक अभिप्राय<br>हे भाग दाखवतात व त्यावर चर्चा करतात. | |
| | पूर्व माध्यमिक स्तरासाठी समग्र प्रगतिपत्रकातील<br>**भाग 'क'**<br>• शैक्षणिक वर्षाचा सारांश (प्रमुख कामगिरी दर्शके, बालकांच्या क्षमतेनुसार शिक्षकांचे गुणात्मक अभिप्राय) | पीपीटीच्या माध्यमातून<br>• शैक्षणिक वर्षाचा सारांश (प्रमुख कामगिरी दर्शके, बालकांच्या क्षमतेनुसार शिक्षकांचे गुणात्मक अभिप्राय) स्पष्ट करतील. | • बालकांच्या शैक्षणिक प्रगतीत शिक्षकांच्या गुणात्मक अभिप्रायाचे तुमच्या मते महत्त्व विशद करा. |

# १६. समग्र प्रगतिपत्रक (HPC) - प्रात्यक्षिक

सदर सत्रामध्ये समग्र प्रगतिपत्रक माध्यमातून विद्यार्थ्यांचे प्रत्यक्ष मूल्यांकन कसे करावे याविषयी प्रत्यक्ष नमुनात्मक उदाहरणे यांचे दिग्दर्शन करून अभ्यासाची ध्येये, क्षमता व त्यांवर आधारित मूल्यांकन कृती कशी नियोजित करावी? याविषयी मार्गदर्शन करणे अपेक्षित आहे. तसेच, कृती सादर केल्यानंतर प्रत्यक्ष रुब्रिक कसे तयार करावेत? याविषयी चर्चा करण्यात येणार आहे.

**अध्ययन निष्पत्ती :**

१) विद्यार्थ्यांचे मूल्यांकन कृती आधारित कसे करावे याविषयी सक्षम होतील.

२) अभ्यासक्रमाचे ध्येय, क्षमता यांवर आधारित कृतीची रचना कशी करावी हे अवगत होईल.

३) कृतींची मूल्यांकन करण्यासाठी रुब्रिक कसे करावे, याविषयी प्रत्यक्ष अनुभव घेतील.

४) रुब्रिकच्या मूल्यांकनाद्वारे विद्यार्थ्यांचे मूल्यांकन कसे करावे याविषयी स्पष्टता येईल.

| उपघटक | आशय | सुलभक – प्रशिक्षणार्थी आंतरक्रिया | चिंतनात्मक प्रश्न |
|---|---|---|---|
| • अभ्यासक्रम ध्येये, क्षमता, आशय सहसंबंध (१५ मि.) | • भाषा, विज्ञान, गणित व सामाजिकशास्त्र यांमधील नमुनात्मक ध्येये, क्षमता. (संदर्भ SCF-SE) | • सुलभक प्रत्यक्ष उदाहरणाच्या साहाय्याने अभ्यासक्रम ध्येये, संबंधित क्षमता याविषयी चर्चा करतील. अभ्यासक्रम ध्येये प्राप्त करण्यासाठी कोणत्या क्षमता आवश्यक आहेत. याविषयी विषयनिहाय चर्चा करतील. | • अभ्यासक्रम ध्येये ही कशी निश्चित केली जातात? |
| • क्षमता आधारित कृतींची रचना (३० मि.) | • स्तरनिहाय व विषयनिहाय नमुनात्मक अभ्यासक्रम क्षेत्रे, क्षमता व नमुनात्मक कृती. | • सुलभक वर्गात स्तरनिहाय व विषयनिहाय नमुनात्मक अभ्यासक्रम ध्येय, क्षमता निवडून त्यावर आधारित कृतींची | • क्षमता आधारित कृतींची रचना करताना कोणत्या बाबी विचारात घ्याव्यात. |

| उपघटक | आशय | सुलभक – प्रशिक्षणार्थी आंतरक्रिया | चिंतनात्मक प्रश्न |
|---|---|---|---|
| | | रचना कशी करावी या विषयी चर्चा करतील. प्रत्यक्ष काही नमुना कृती सादर करतील. | |
| • मूल्यांकना–साठी निवडलेल्या कृती करिता मूल्यांकन रुब्रिक (३० मि.) | • रुब्रिकचे घटक जाणीवजागृती, संवेदनशीलता, सर्जनशीलता (Awarness, Sensitivity, Creativity) या घटकावर आधारित प्रवाह, पर्वत व आकाश या स्तरानुसार पदनिश्चयन विधाने. (पायाभूत स्तरासाठी व पूर्वतयारी आणि पूर्वमाध्यमिकसाठी प्रारंभिक, प्रवीण आणि प्रगत या स्तरांनुसार पदनिश्चयन विधाने) | • सुलभक विषयनिहाय व स्तरनिहाय मूल्यांकन कृती सादर करतील. त्यांच्या आधारे रुब्रिकच्या क्षमता स्तरानुसार व विद्यार्थी मूल्यांकन स्तरानुसार रुब्रिकची रचना प्रात्यक्षिकाद्वारे प्रशिक्षणार्थ्यांकडून करून घेतील. | • मूल्यांकन कृतीची रचना कशी करावी? सदर रचना करताना कोणकोणत्या घटकांचा विचार करावा? |
| • मूल्यांकन रुब्रिकच्या आधारे विद्यार्थ्यांचे मूल्यांकन (१० मि.)<br>समारोप | • मूल्यांकन रुब्रिक तयार करताना घ्यावयाची दक्षता<br>सत्राचा सारांश | • मूल्यांकन कृतींची निवड कशी करावी? प्रत्यक्ष मूल्यांकन कसे करावे याबाबत चर्चा करतील. | • स्तरनिहाय कृतींची रचना काठिण्यपातळी कशी वाढविता येईल? |

◈◈◈

# १७. समग्र प्रगतिपत्रक (HPC) – प्रात्यक्षिक

समग्र प्रगतिपत्रकाची रचना व मूल्यांकन रुब्रिक यांच्या आधारे आपण अध्यापन करीत असलेल्या विषयाच्या अनुषंगाने प्रत्यक्ष घटक निवड करून एक नमुना पत्रक कसे तयार करावे? रुब्रिक कसे तयार करावे? समग्र प्रगतिपत्रकात नोंद कशी घ्यावी हे आपण या सत्रामध्ये प्रत्यक्ष एक नमुना तयार करून पाहणार आहोत.

**अध्ययन निष्पत्ती :**

१) आपल्या अध्ययन विषयाशी संबंधित समग्र प्रगतिपत्रक कसे भरावे हे प्रत्यक्ष कृती करून पाहतील.

२) मूल्यांकन रुब्रिक स्वत: तयार करण्यास सक्षम होतील.

३) विद्यार्थ्यांचे समग्र प्रगतिपत्रक कसे तयार करावे याचा प्रत्यक्ष अनुभव घेतील.

| घटक/उपघटक | आशय | सुलभक – प्रशिक्षणार्थी आंतरक्रिया | चिंतनात्मक प्रश्न |
|---|---|---|---|
| समग्र प्रगतिपत्रक – पायाभूत स्तर<br>• पूर्वतयारी स्तर व पूर्व–माध्यमिक स्तर<br>(१० मि.) | • अभ्यासक्रम ध्येये, क्षमता, रुब्रिक | • सुलभक मागील सत्राचा थोडक्यात आढावा घेऊन प्रशिक्षणार्थ्यांना अभ्यासक्रम ध्येये, क्षमता, रुब्रिक इ. संकल्पना समजल्याचे प्रश्नोत्तरांच्या आधारे जाणून घेतील. | • अभ्यासक्रम ध्येये व क्षमता म्हणजे काय?<br>• रुब्रिकमध्ये कोणत्या घटकांचा समावेश होतो? |
| –<br>(५ मि.) | • समग्र प्रगतिपत्रक व पायाभूत स्तर, पूर्वतयारी स्तर व पूर्वमाध्यमिक स्तर टेम्प्लेट | • स्तरनिहाय समग्र प्रगतिपत्रक प्रत्यक्ष तयार करणार असल्याचे सांगतील. स्तरनिहाय समग्र प्रगतिपत्रकातील वेगळेपण सांगतील.<br>• प्रशिक्षणार्थ्यांचे विषयनिहाय गट तयार करतील.<br>• गटामध्ये करावयाच्या कृतीचे सविस्तर स्पष्टीकरण देतील. | • स्तरनिहाय समग्र प्रगतिपत्रक एकसारखेच आहे की वेगळे? वेगळे असल्यास नेमका फरक कोणता? |

| घटक/उपघटक | आशय | सुलभक – प्रशिक्षणार्थी आंतरक्रिया | चिंतनात्मक प्रश्न |
|---|---|---|---|
| –<br><br>(२५ मि.) | • भाषा, गणित, विज्ञान, परिसर अभ्यास व सामाजिक शास्त्रे या विषयांतील निवडक अध्ययन ध्येये व क्षमता यादी व नमुना टेम्प्लेट | • प्रशिक्षणार्थी गटामध्ये आपण शिकवत असलेल्या स्तरानुसार व विषयानुसार पुरविण्यास आलेला नमुना भरण्यास सांगतील.<br>• प्रशिक्षणार्थी गटात काम करतील. गटामध्ये काम करताना सुलभक आवश्यक तेथे साहाय्य करतील. | • अध्ययन विषय व घटक लक्षात घेऊन कोणती अध्ययन कृती निवडावी?<br>• रुब्रिक कसे तयार करावे? |
| –<br>(४० मि.) | • सादरीकरण टेम्प्लेट | • प्रशिक्षणार्थी गटामध्ये सादरीकरण करतील. | |
| –<br><br>(१० मि.) | | • शेवटी सुलभक समग्र प्रगतिपत्रक भरण्याची आवश्यकता व भविष्यातील शिक्षकांची जबाबदारी यांविषयी माहिती देऊन समारोप करतात. | • समग्र प्रगतिपत्रक भरताना शिक्षक म्हणून माझी जबाबदारी काय? |

◈◈◈

# १८. गटनिहाय सादरीकरण

**प्रस्तावना :**

गटांनी तयार केलेले प्रश्न सादर करणे. सादरीकरणावर चर्चा आणि अभिप्राय घेणे. क्षमता आधारित मूल्यांकन गटकार्य सत्र हे एक प्रभावी व्यासपीठ आहे, जे प्रशिक्षणार्थींना भविष्यातील आव्हानांना तोंड देण्यासाठी सक्षम बनवते. असे सत्र केवळ शिक्षणप्रक्रियेला अधिक परिणामकारक बनवत नाही, तर विद्यार्थ्यांच्या ज्ञानाला प्रत्यक्ष जीवनातील समस्यांशी जोडण्यास मदत करते.

अध्ययन निष्पत्ती (Learning Outcomes) आणि क्षमता आधारित (Competency-Based) प्रश्ननिर्मितीसाठी गटकार्य आयोजित करताना प्रशिक्षणार्थ्यांसाठी काही महत्त्वाचे निकष पुढीलप्रमाणे आहेत.

**१) प्रशिक्षणार्थ्यांची पार्श्वभूमी :**

प्रशिक्षणार्थ्यांचे शिक्षण स्तर, विषय आणि पूर्वज्ञान समजून घेणे. विषयातील गोडी व समज प्रगत किंवा प्राथमिक स्तरांवर आहे का याचा विचार करणे.

**२) उद्दिष्टे स्पष्ट करणे :**

गटकार्याचे उद्दिष्ट स्पष्ट करणे. अध्ययन निष्पत्ती म्हणजे काय? आणि क्षमता आधारित शिक्षणाचे महत्त्व. याबाबत माहिती देणे.

**३) गटरचना :**

गटातील सदस्यांची संख्या कमी ठेवणे जेणेकरून प्रत्येकाला सहभाग घेता येईल. गटात विविध इयत्तांच्या प्रशिक्षणार्थ्यांना समाविष्ट करणे, जेणेकरून अनुभवांची देवाणघेवाण होईल.

**४) साधने आणि साधनसामग्री :**

अध्ययन निष्पत्ती आणि क्षमता आधारित शिक्षणावर मार्गदर्शक साहित्य (उदा. उदाहरणे, नमुना प्रश्नपत्रिका). सर्जनशीलतेला चालना देणाऱ्या साधनांचा (उदा. प्रेझेंटेशन, व्हिडिओ क्लिप्स) समावेश करणे.

**५) कृतियोजना :**

प्रत्येक गटाला विशिष्ट अध्ययन निष्पत्ती देणे. गटाने त्या निष्पत्तीवर आधारित ३ ते ५ प्रश्न तयार करायचे आहेत असे स्पष्ट करणे.

प्रश्ननिर्मितीसाठी Bloom's Taxonomy (उदा. आठवणे, समज, अंमलबजावणी, विश्लेषण, सर्जनशीलता) चा आधार देणे.

### ६) निकष किंवा मापन घटक :

- **सुस्पष्टता** : प्रश्न अध्ययन निष्पत्तीशी संबंधित आहेत का?
- **पातळी** : प्रश्न मूलभूत, मध्यवर्ती किंवा प्रगत क्षमतेशी जोडलेले आहेत का?
- **विविधता** : प्रश्न वेगवेगळ्या प्रकारचे आहेत का? (उदा. बहुपर्यायी, वर्णनात्मक, विश्लेषणात्मक)
- **प्रभाविता** : प्रश्न विद्यार्थ्यांना विचार करायला प्रवृत्त करतात का?
- **अंतर्भाव** : प्रश्ननिर्मितीसाठी गटातील सर्व सदस्यांनी योगदान दिले आहे का?

### ७) प्रत्याभरण व पुनरावलोकन :

प्रत्येक गटाने त्यांनी तयार केलेल्या प्रश्नांचे सादरीकरण करावे. इतर गटांनी दिलेला अभिप्राय घेत प्रश्नांमध्ये सुधारणा करावी. प्रशिक्षकांकडून अंतिम प्रत्याभरण देऊन गटकार्य संपन्न करावे.

### ८) प्रेरणा आणि सहभाग :

प्रशिक्षणार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी स्पर्धात्मकता, प्रशंसा यांचा समावेश करणे. कार्यातील सहभाग आनंददायक ठेवणे.

### ९) साधारण वेळेचे व्यवस्थापन :

सत्र ६० ते ९० मिनिटांत पूर्ण होईल याची काळजी घेणे. :

१५ मिनिटे : उद्दिष्टे आणि निकष समजावणे.

३० मिनिटे : गटकार्य.

२० मिनिटे : प्रत्याभरण

१० मिनिटे : निष्कर्ष व सुधारणा.

याप्रमाणे ठरावीक निकषांवर आधारित गटकार्य नियोजन केल्यास अध्ययन निष्पत्ती व क्षमता आधारित प्रश्ननिर्मिती प्रभावी होईल.

## सादरीकरण : उदाहरण – भाषा विषय – मराठी :

मराठी भाषा विषयाच्या इयत्तानिहाय अध्ययन निष्पत्ती व क्षमता आधारित प्रश्ननिर्मिती गटकार्याचे सादरीकरण प्रभावीपणे करण्यासाठी खालील मार्गदर्शक तत्त्वे वापरता येतात. :

### १) सादरीकरणाची उद्दिष्टे :

गटकार्याचे परिणाम इतर गटांसमोर मांडणे. अध्ययन निष्पत्तींशी प्रश्नांचा संबंध स्पष्ट करणे. प्रश्ननिर्मितीची प्रक्रिया आणि विचार स्पष्ट करणे. इतर गटांकडून अभिप्राय घेणे.

## २) सादरीकरणाची पद्धत :

### अ) सादरीकरणाची रचना :

- **परिचय :**

  गटाचे नाव आणि कार्याचे उद्दिष्ट सांगणे. इयत्ता व विषयाचे वर्णन करणे (उदा., इयत्ता पाचवी – कथा समजून घेण्याचे कौशल्य).

- **मूळ अध्ययन निष्पत्ती :** आम्ही या कार्यात कोणती अध्ययन निष्पत्ती लक्षात घेतली? याचे वर्णन करणे. उदा., विद्यार्थी कथा वाचून पात्रांची वैशिष्ट्ये सांगू शकतील.
- **प्रश्नांचे सादरीकरण :** गटाने तयार केलेले प्रश्न क्रमवार मांडणे. प्रत्येक प्रश्नासाठी उद्दिष्ट आणि त्याचा पातळीवरील विचार सांगणे. प्रश्नांसाठी विविध स्वरूप दाखवणे. (उदा., बहुपर्यायी, वर्णनात्मक, प्रत्यक्ष संवाद आधारित.)
- **प्रश्ननिर्मितीची प्रक्रिया :** प्रश्न कसे तयार केले, कोणते स्रोत वापरले याचे वर्णन करणे. उदा., आम्ही कथा वाचून कथेतील पात्रांच्या भावनांवर आधारित प्रश्न तयार केला.
- **सारांश :** गटकार्यातून घेतलेले मुख्य शिक्षण. अध्ययन निष्पत्ती कशा साध्य झाल्या याचे वर्णन करणे.

### ब) सादरीकरणासाठी साधने :

- **चार्ट्स :** प्रश्नांचे नमुने, टेबल्स, किंवा Bloom's Taxonomy वर आधारित स्तर दाखवण्यासाठी.
- **प्रेझेंटेशन स्लाईड्स :** प्रश्न आणि त्याचा उद्देश सोप्या भाषेत दाखवण्यासाठी.
- **व्हिज्युअल साहित्य :** चित्रे, वाचनाचे तुकडे, किंवा कथांचे अंश.

**क) सहभाग :** गटातील प्रत्येक सदस्याने सादरीकरणात सहभाग घ्यावा. प्रश्नांचे वर्णन, उद्दिष्टे आणि निष्कर्ष गटातील वेगवेगळ्या सदस्यांनी सादर करावे.

## ३) प्रभावी सादरीकरणासाठीच्या बाबी –

**संक्षिप्तता :** योग्य व महत्त्वाच्या मुद्द्यांसह सादरीकरण ५ ते ७ मिनिटांत पूर्ण करावे.

**स्पष्टता :** प्रश्न व उद्दिष्टे समजेल अशा सोप्या भाषेत मांडणे.

**दृश्य माध्यमे :** चार्ट, पोस्टर किंवा डिजिटल साधनांचा वापर करून सादरीकरण अधिक आकर्षक बनविणे.

**प्रश्न–उत्तरांचा समावेश :** इतर गटांच्या अभिप्रायांवर आधारित प्रश्नांचे मूल्यांकन सादर करणे. आमच्या प्रश्नांवर विद्यार्थी कशा पद्धतीने विचार करतील? यावर चर्चा करणे.

## ४) अभिप्राय सत्र :

सादरीकरणानंतर उपस्थितांनी गटाला अभिप्राय द्यावा.

**मूल्यांकन निकष :**

प्रश्न स्पष्ट आहेत का?

अध्ययन निष्पत्तींशी प्रश्नांचा थेट संबंध आहे का?

प्रश्न विविध प्रकारचे आहेत का?

इतर गटांकडून प्रश्नांबाबत सुधारणा व सूचनांचे स्वागत करावे.

## ५) प्रशिक्षणार्थ्यांकरिता प्रोत्साहन :

उत्तम सादरीकरण करणाऱ्या गटाला पुरस्कार किंवा प्रशंसापत्र. गटांमध्ये सकारात्मक स्पर्धा निर्माण करणे.

'उत्कृष्ट सर्जनशील प्रश्न' किंवा 'सर्वसमावेशक प्रश्न' यांसाठी विशेष पुरस्कार देणे.

उदाहरण - गट - इयत्ता पाचवी

**अध्ययन निष्पत्ती :** कथा समजून घेऊन कथेतील पात्रांवर आधारित प्रश्न तयार करणे.

**प्रश्न :**

१) कथेतील मुख्य पात्रे कोणती? तिच्या गुणधर्मांवर आधारित २ ओळीत त्यांचे वर्णन करा.

२) कथेच्या शेवटी कोणते नवे मूल्य शिकायला मिळाले?

**प्रक्रिया** : Bloom's Taxonomy च्या पातळ्यांचा वापर.

**अभिप्राय** : 'कथेतील संवादांवर आधारित अधिक प्रश्न विचारले जाऊ शकतात.' सादरीकरण अधिक आकर्षक, सुसंवादी व प्रभावी बनवण्यासाठी या टप्प्यांचा वापर करता येईल.

◈◈◈

## गटनिहाय चर्चा व विश्लेषण

**प्रस्तावना :**

मराठी भाषा विषयाच्या इयत्तानिहाय अध्ययन निष्पत्ती व क्षमता आधारित प्रश्ननिर्मिती गटकार्याचे सादरीकरण झाल्यानंतर चर्चा अधिक उपयुक्त व विचारशील करण्यासाठी खालील मुद्दे लक्षात घेतले जाऊ शकतात.

१) **सादरीकरणाचा आढावा :**

गटाने मांडलेल्या अध्ययन निष्पत्ती स्पष्ट होत्या का? सादरीकरणातील रचना व सुसूत्रता कशी होती? गटाने सादरीकरण प्रभावीपणे केले का?

२) **प्रश्नांचे मूल्यमापन :**

**अध्ययन निष्पत्तींशी संबंधित :** गटाने तयार केलेले प्रश्न संबंधित इयत्तेच्या अध्ययन निष्पत्तींशी जुळतात का? प्रश्नांमध्ये त्या विशिष्ट भाषिक कौशल्यांना हाताळले गेले का? उदा., वाचन, लेखन, व्याकरण, संवाद.

**प्रश्नांची गुणवत्ता :** प्रश्न समजण्यास सोपे आणि स्पष्ट आहेत का? प्रश्न विद्यार्थ्यांना विचार करण्यास प्रवृत्त करतात का? Bloom's Taxonomy च्या विविध स्तरांवर आधारित प्रश्न तयार झाले आहेत का?

३) **प्रश्नांची पातळी :** प्रश्न सोप्या, मध्यम आणि कठीण स्वरूपाचे आहेत का? विविध प्रकारचे प्रश्न विचारले गेले का? (उदा., बहुपर्यायी, वर्णनात्मक, व्यावहारिक, सर्जनशील) विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक पातळीला प्रश्न अनुरूप आहेत का?

४) **विविधता आणि समावेशकता :** प्रश्न सर्व भाषा कौशल्यांचा (वाचन, लेखन, संभाषण) समतोल राखतात का? प्रश्नांमध्ये भिन्न विषय, संस्कृती आणि विद्यार्थ्यांच्या वैविध्यपूर्ण गरजांचा विचार केला आहे का?

५) **सुधारणा व अभिप्राय :** गट आपल्या प्रश्नांमध्ये अजून कशी सुधारणा करू शकतात? सादरीकरणात कोणते मुद्दे अधिक चांगल्या पद्धतीने मांडले जाऊ शकतात? इतर गटांकडून काय शिकता येईल?

६) **विद्यार्थ्यांच्या दृष्टिकोनातून विचार :** विद्यार्थ्यांना प्रश्न सोडवायला आव्हानात्मक पण रंजक वाटतील का? प्रश्न विद्यार्थ्यांच्या दैनंदिन जीवनाशी किंवा प्रत्यक्ष अनुभवांशी निगडित आहेत का? या प्रश्नांमुळे विद्यार्थ्यांची विचारशक्ती व सर्जनशीलतेत कशी वाढ होईल?

७) **कार्यप्रणालीचा आढावा :** गटाने प्रश्ननिर्मितीची प्रक्रिया व्यवस्थित राबवली का? गटातील सदस्यांचे योगदान कसे होते? गटाच्या कामकाजातील सामूहिकता आणि संवाद कसे होते?

८) **भविष्यातील सुधारणा आणि वापर :** तयार केलेले प्रश्न इयत्तेनुसार वापरता येतील का? प्रश्नसंच भविष्यातील उपक्रम किंवा परीक्षांसाठी उपयुक्त ठरतील का? यापुढील गटकार्य अधिक परिणामकारक करण्यासाठी कोणत्या सुधारणा करता येतील?

९) **विशेष गुण आणि प्रेरणा :** गटाच्या सादरीकरणातील कोणते घटक विशेष उल्लेखनीय होते? गटाने वापरलेल्या सर्जनशील किंवा नावीन्यपूर्ण दृष्टिकोनांची प्रशंसा करणे.

१०) **एकत्रित निष्कर्ष :** चर्चेतील मुख्य मुद्दे संकलित करणे. सर्व गटांसाठी सामान्य सुधारणा व शिफारशी देणे. उत्तम सादरीकरणासाठी प्रोत्साहन किंवा कौतुक करणे.

या मुद्द्यांवर चर्चा केल्यास गटकार्याचा परिणाम अधिक सखोल व उपयुक्त होईल, तसेच इतर गटांनाही प्रेरणा मिळेल.

## श्रेयनामावली

| अ.क्र. | तज्ज्ञ सदस्यांचे नाव | पद | कार्यालय |
|---|---|---|---|
| १. | श्रीम. रत्नप्रभा भालेराव | उपसंचालक | राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे. |
| २. | डॉ. राजेश बनकर | प्राचार्य | जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, अहिल्यानगर. |
| ३. | डॉ. नदाफ इब्राहीम | उपसंचालक | राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे. |
| ४. | डॉ. ह. ना. जगताप | सेवानिवृत्त प्राचार्य | सोलापूर. |
| ५. | श्री. बाळकृष्ण वाटेकर | वरिष्ठ अधिव्याख्याता | जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, पुणे. |
| ६. | श्री. राजेंद्र वाकडे | वरिष्ठ अधिव्याख्याता | राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे. |
| ७. | डॉ. प्रभाकर क्षीरसागर | वरिष्ठ अधिव्याख्याता | जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, पुणे. |
| ८. | श्री. योगेश सोनवणे | वरिष्ठ अधिव्याख्याता | राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे. |
| ९. | श्री. विजयकुमार गदगडे | वरिष्ठ अधिव्याख्याता | जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, सांगली. |
| १०. | डॉ. गितांजली बोरूडे | वरिष्ठ अधिव्याख्याता | राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे. |
| ११. | डॉ. दत्ता थिटे | वरिष्ठ अधिव्याख्याता | राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे. |
| १२. | श्री. महादेव वांडरे | वरिष्ठ अधिव्याख्याता | जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, कोल्हापूर. |
| १३. | श्री. अरुण सांगोलकर | वरिष्ठ अधिव्याख्याता | राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे. |
| १४. | डॉ. मनीषा यादव | वरिष्ठ अधिव्याख्याता | राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे. |
| १५. | श्रीम. तेजस्विनी आळवेकर | वरिष्ठ अधिव्याख्याता | राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे. |
| १६. | श्रीम. सरस्वती सूर्यवंशी | वरिष्ठ अधिव्याख्याता | जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, गोंदिया. |

| अ.क्र. | तज्ज्ञ सदस्यांचे नाव | पद | कार्यालय |
|---|---|---|---|
| १७. | श्री. अरुण जाधव | वरिष्ठ अधिव्याख्याता | राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे. |
| १८. | श्रीम. स्वाती पेटकर | अधिव्याख्याता | राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे. |
| १९. | श्रीम. वृषाली गायकवाड | अधिव्याख्याता | राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे. |
| २०. | डॉ. बालमणी नंदाला | अधिव्याख्याता | राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे. |
| २१. | श्री. अशोक पानसरे | विस्तार अधिकारी | राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे. |
| २२. | डॉ. अमोल चव्हाण | सहयोगी प्राध्यापक | कॉलेज ऑफ एज्युकेशन, आंबेगाव बु., पुणे. |
| २३. | डॉ. प्राची चौधरी | अध्यापकाचार्य | सेवासदन अध्यापक विद्यालय, पुणे. |
| २४. | श्री. नवनाथ व्हरकट | मुख्याध्यापक | विद्यामंदिर, वाघापूर, भुदरगड, जि. कोल्हापूर. |
| २५. | डॉ. जगदीश इंदलकर | मुख्याध्यापक | लायन एम. पी. भूता, सायन सार्वजनिक स्कूल, मुंबई. |
| २६. | डॉ. शिवानी लिमये | अध्यापक | फर्ग्युसन महाविद्यालय, पुणे. |
| २७. | श्रीम. सुवर्णा देशपांडे | अध्यापक | न्यू इंग्लिश स्कूल, सातारा. |
| २८. | श्री. योगेशचंद्र देवळालकर | अध्यापक | विमलाबाई गरवारे उच्च माध्यमिक विद्यालय, पुणे. |
| २९. | डॉ. गोविंद कुलकर्णी | अध्यापक | म. ए. सो. आबासाहेब गरवारे महाविद्यालय, पुणे. |
| ३०. | डॉ. गणेश मुडेगावकर | क. म. शिक्षक | संगमेश्वर महाविद्यालय, सोलापूर. |
| ३१. | श्री. प्रमोद आठवले | अध्यापक | संत गाडगे महाराज विद्यालय, जळगाव. |
| ३२. | तौसीफ परवेज | विषय सहायक | राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे. |
| ३३. | डॉ. जितेंद्र काठोळे | पदवीधर माध्यमिक शिक्षक | जि. प. माध्य. व उच्च माध्य. विद्यालय, अकोट, जि. अकोला. |

| अ.क्र. | तज्ज्ञ सदस्यांचे नाव | पद | कार्यालय |
| --- | --- | --- | --- |
| ३४. | डॉ. जगदीश पाटील | पदवीधर शिक्षक | जि. प. मराठी शाळा कंडारी, ता. जि. जळगाव. |
| ३५. | डॉ. अश्विन किनारकर | सहाय्यक शिक्षक | जि. प. प्राथ. शाळा सालई, ता. उमरेड, जि. नागपूर. |
| ३६. | डॉ. पूनम कडलग | उपशिक्षिका | जि. प. शाळा, मेडद, बारामती, जि. पुणे. |
| ३७. | श्री. अजय काळे | उपशिक्षक | जि. प. शाळा, सिद्धेवाडी, तासगाव, जि. सांगली. |
| ३८. | डॉ. बाबासाहेब पवार | पदवीधर शिक्षक | जि. प. प्राथ. शाळा, मिरजगाव मुली, ता. कर्जत, जि. अहिल्यानगर. |
| ३९. | श्रीम. सुवर्णा पवार | उपशिक्षिका | जि. प. शाळा, आर्वी, ता. हवेली, जि. पुणे. |

